दैनिक
अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक

# राष्ट्र सह्याद्री

www.rashtrasahyadri.com

* संपादक : काकासाहेब नवले * RNI No. MAHMAR/2019/82605 * वर्ष ७ वे * पाने ८ * मुल्य रु. ४.००
* अंक ९९ * शनिवार १७ जानेवारी २०२६ * पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282



## महापालिका निवडणूक निकाल

# फडणवीसच धुरंधर...

### २९ पैकी २५ महापालिकांवर महायुतीचा झेंडा



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई : राज्यातील महानगरपालिका निवडणुकांमध्ये भारतीय जनता पार्टी व मित्र पक्षांच्या महायुतीने जबरदस्त मुसंडी मारली. मुंबईतील ठाकरेंच्या युतीचा तर पुणे व पिंपरी चिंचवड मधील पवारांच्या आघाडीचा पॅटर्न फडणवीसांनी धुळीस मिळवत आपणच 'धुरंधर' असल्याचे सिद्ध केले. राज्यभर शहरी मतदारांनी भाजप, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला पसंती दर्शवली. काँग्रेस शिवसेना तसेच शरद पवार यांच्या राष्ट्रवादीला अपवादात्मक यश मिळाले.**

महाराष्ट्रातील २९ महानगरपालिकांसाठी झालेल्या निवडणुकीचा निकाल जाहीर होत असताना महायुती (भाजप + एकनाथ शिंदे गट शिवसेना + अजित पवार गट राष्ट्रवादी) यांनी राज्यातील शहरी भागात प्रचंड बहुमत मिळवले आहे. करोनाकाळ, ओबीसी आरक्षणाचा वाद आणि सर्वोच्च न्यायालयीन सुनावणीनंतर तब्बल ३-९ वर्षांनी पार पडलेल्या या निवडणुकीत मतदानाची सरासरी टक्केवारी ४६-५३% राहिली. मात्र निकालाने शहरी म हाराष्ट्रात भाजपच्या वर्चस्वाची पुष्टी केली आहे.

मुंबई महानगरपालिका ऐतिहासिक पराभव ठाकरेंचा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या २२७ जागांसाठी झालेल्या लढतीत महायुती आघाडीवर आहे. प्राथमिक कलांनुसार भाजप-शिंदे गटाने ११६-१४०+ जागांवर आघाडी घेतली असून, उद्धव ठाकरे गट शिवसेना आणि राज ठाकरे यांच्या मनसे युतीला ८५-९० जागांवरच मर्यादित राहावे लागले. २०१७ मध्ये शिवसेनेच्या एकहाती वर्चस्वानंतर उद्धव-राज यांच्या एकत्र येण्याचा प्रयोग अपयशी ठरला. मुंबईतील मतदारांनी विकास, पायाभूत सुविधा आणि स्थिर प्रशासनाला प्राधान्य दिल्याचे **(पान ४ वर)**

## महाराष्ट्राचे आभार!

### विजय निश्चित होताच : मोदी

महाराष्ट्राचे आभार! राज्यातील उत्साही जनतेने एनडीएच्या जनहितकारी आणि सुशासनाच्या अजेंड्याला आपले आशीर्वाद दिले आहेत! विविध महानगरपालिका निवडणुकांचे निकाल हे दर्शवितात की महाराष्ट्रातील जनतेशी एनडीएचे नाते अधिक दृढ झाले आहे. आमच्या कामगिरीचा अनुभव आणि विकासाची दृष्टी जनतेच्या मनाला भावली आहे. म हाराष्ट्रातील सर्व जनतेप्रती मी मनापासून कृतज्ञता व्यक्त करतो. हा कौल प्रगतीला अधिक गती देणारा , राज्याशी जोडलेल्या गौरवशाली संस्कृतीचा उत्सव साजरा करणारा आहे'.

-नरेंद्र मोदी, पंतप्रधान

### पक्षनिहाय विजयी नगरसेवक

राज्यातील २९ महानगरपालिकांमध्ये एकूण मिळून विजयी झालेले नगरसेवक

| भाजपा | शिवसेना शिंदे गट | काँग्रेस | राष्ट्रवादी अजित पवार गट | शिवसेना (यूबीटी) | एम आय एम |
|---|---|---|---|---|---|
| १३७२ | ३९४ | ३१५ | १५८ | १४९ | ११४ |

### महत्त्वाचे राजकीय निष्कर्ष

- शहरी मतदारांचा कौल - मुंबई, पुणे, नागपूर, नाशिकसारख्या प्रमुख शहरांत भाजप-महायुतीला स्पष्ट पसंती मिळाली. विकास, राष्ट्रीय सुरक्षेचे मुद्दे आणि मोदी-फडणवीस यांच्या नेतृत्वाला प्राधान्य.
- शिवसेना-एनसीपीच्या फुटीचा परिणाम - उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्या मूळ पक्षांना मोठा धक्का. शिंदे आणि अजित पवार यांनी सत्ताधारी युतीत राहून फायदा घेतला.
- महाविकास आघाडीचा पराभव - काँग्रेस, शिवसेना आणि राष्ट्रवादी शरद पवार यांची युती शहरी भागात अपयशी ठरली. मतदारांनी 'विनाश आघाडी' ला नाकारले.
- भविष्यातील संकेत - ही निवडणूक २०२९ च्या विधानसभा निवडणुकीसाठी महत्त्वाची 'सेमीफायनल' ठरली आहे. शहरी मतदारांचा कौल सत्ताधारी युतीसाठी अत्यंत सकारात्मक आहे.

## कोणत्या महापालिकेत कोणाची सत्ता?

१ बृहन्मुंबई - एकूण जागा- २२७ भाजप-शिंदे गट आघाडीवर
२ भिवंडी-निजामपूर- एकूण जागा- ९० काँग्रेस
३ नागपूर - एकूण जागा-१५१ भाजप
४ पुणे - एकूण जागा-१६२ भाजप
५ ठाणे - एकूण जागा-१३१ शिवसेना शिंदे-भाजप
६ अहिल्यानगर - एकूण जागा-६८ भाजप - राष्ट्रवादी
७ नाशिक - एकूण जागा-१२२ भाजप
८ पिंपरी-चिंचवड - एकूण जागा-१२८ भाजप
९ छत्रपती संभाजीनगर - एकूण जागा-११३ भाजप
१० वसई-विरार - एकूण जागा-११५ बहुजन विकास आघाडी
११ कल्याण-डोंबिवली - एकूण जागा-१२२ भाजप-शिंदे गट आघाडीवर
१२ नवी मुंबई - एकूण जागा-१११ भाजप आघाडीवर
१३ अकोला - एकूण जागा-८० भाजप
१४ अमरावती - एकूण जागा-८७ भाजप-राष्ट्रवादी
१५ लातूर - एकूण जागा-७० काँग्रेस-वंचित
१६ नांदेड-वाघाळा - एकूण जागा-८१ भाजप
१७ मीरा-भाईंदर - एकूण जागा-९६ भाजप
१८ उल्हासनगर - एकूण जागा-७८
१९ चंद्रपूर - एकूण जागा-६६ काँग्रेस
२० धुळे - एकूण जागा-७४ भाजप
२१ जळगाव - एकूण जागा-७५ भाजप
२२ मालेगाव - एकूण जागा-८४
२३ कोल्हापूर - एकूण जागा-९२ महायुती
२४ सांगली-मिरज-कुपवाड - एकूण जागा-७८ महायुती
२५ सोलापूर - एकूण जागा-११३ भाजप
२६ इचलकरंजी - एकूण जागा-७६ भाजप
२७ जालना - एकूण जागा-६५ भाजप
२८ पनवेल - एकूण जागा-७८ भाजप आघाडीवर
२९ परभणी - एकूण जागा-६५ ठाकरे-काँग्रेस

## डीपीवर काम करताना कंत्राटी कर्मचाऱ्यांचा मृत्यू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**वैजापूर :** शहरातील बीएसएनएल रोडवरील भूमी अभिलेख कार्यालय समोरील डीपीवर काम करत असताना कंत्राटी झिरो वायरमनचा विजेच्या धक्क्याने मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना शुक्रवार ता.१६ रोजी दुपारच्या सुमारास घडली.

सोमनाथ आसाराम पानडघळे वय २९ वर्षे राहणार आघुर असे घटनेतील मयत तरुणाचे नाव आहे.या घटनेबाबत मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार शहरातील बीएसएनएल ऑफिस रोडवरील भूमी अभिलेख कार्यालय समोरील विद्युत रोहित्रावर काम सुरू होते.दरम्यान अचानक विद्युत तारीमध्ये प्रवाह आल्याने काम करणाऱ्या कंत्राटी कामगार सोमनाथ आसाराम पानडघळे याला विजेचा धक्का लागला.घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी प्रशासनाला माहिती दिली, तातडीने पोलिस प्रशासन,नगर परिषद प्रशासन, म हावितरण कर्मचारी यांनी घटनास्थळी धाव घेतली.दरम्यान अनिल राऊत,मोहन तुपे, केतन आवाळे ,व रुग्णवाहिका चालक वाहेद पठाण यांनी सोमनाथ यांना पोलवरून खाली उतरवत वैजापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. तेथे दुपारी सव्वा एक वाजेच्या सुमारास वैद्यकीय अधिकारी यांनी सोमनाथ यांना तपासून मृत घोषित केले. दरम्यान संतप्त नातेवाईक व ग्रामस्थांनी महावितरण कार्यालयात जमाव केला. दरम्यान पोलिस प्रशासनाने **(पान ४ वर)**

## संग्रामभैय्या, सुजयदादांनी एकतर्फी गड जिंकला!

- अहिल्यानगर महापालिकेवर युतीचा झेंडा, महाविकास आघाडी तोंडघशी
- राष्ट्रवादी २७, भाजप २५ तर शिवसेना १० जागांवर विजयी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** महापालिका निवडणुकीत महायुतीचा दणदणीत विजय झाला. विकासाच्या मुद्द्याने बाजी मारल्याची प्रतिक्रिया आमदार संग्राम जगताप आणि माजी खासदार डॉक्टर सुजय विखे पाटील यांनी दिली. १६ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या मतमोजणीत अहिल्यानगर (अहमदनगर) महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजप-राष्ट्रवादी (अजित पवार गट) युतीने निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले आहे. एकूण ६८ जागांपैकी ५ जागा मतदानापूर्वीच बिनविरोध झाल्या होत्या (भाजपचे ३ आणि राष्ट्रवादीचे २), ज्यामुळे महायुतीला सुरुवातीपासूनच मानसिक आघाडी मिळाली. शुक्रवारी लागलेल्या निकालात भाजपने २५ तर राष्ट्रवादी काँग्रेसने तब्बल २७ जागा जिंकल्या. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने दहा जागी आपली नगरसेवक निवडून आणले.

विरोधी आघाडीतील काँग्रेसला मात्र केवळ दोन जागांवर समाधान मानावे लागले. एकूण महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाले असून अहिल्यानगर शहरावर पूर्णपणे वर्चस्व सिद्ध करण्यात आमदार संग्राम जगताप व माजी खासदार सुजय विखे पाटील यांची जोडी यशस्वी झाली आहे.

मतदानपूर्वीच ५ जागांवर उमेदवार बिनविरोध निवडून आले, ज्यामुळे युतीच्या कार्यकर्त्यांचा उत्साह वाढला. मतदानापूर्वी मिळालेला बिनविरोधचा कौल शुभ संकेत मानला गेला. डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांच्या जोडीने निवडणुकीचे नियोजन, प्रचार आणि रणनीती अतिशय प्रभावीपणे राबवली. दोघांनीही विकासाच्या मुद्द्यावर भर देत मतदारांना आकर्षित केले. निकालानंतर सुजय विखे यांनी म्हटले की, हे ऐतिहासिक निकाल आहे, विकासाला नवी दिशा मिळेल. संग्राम जगताप यांनीही कार्यकर्ते आणि म तदारांचे आभार मानले. **(पान ४ वर)**

### पक्षनिहाय अंतिम निकाल

**पक्षनिहाय अंतिम जागा वाटप:**
**राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट): २७ जागा**
**भाजप: २५ जागा**
**शिवसेना (शिंदे गट): 10 जागा**
**काँग्रेस: २ जागा**
**इतर (बिएपी, एमआयएम इ.): उर्वरित ४ जागा**



### लोकसभेला केलेली चूक दुरुस्त

यापूर्वी लोकसभा निवडणुकीत काही ठिकाणी अपेक्षित यश न मिळाल्याने डॉ. सुजय विखे पाटील यांचा पराभव झाला होता. विलासकामे करण्याऱ्या नेत्याला नकरण्याची त्यावेळी केलेली चूक नगरकरांनी महापालिका निवडणुकीत पूर्णपणे दुरुस्त केली आहे.

### गांधी यांच्यासह दिग्गजांचा पराभव

या निवडणुकीतील सर्वात मोठा धक्का म्हणजे माजी खासदार दिलीप गांधी यांच्या सूनबाई दीप्ती गांधी यांचा पराभव! प्रभाग ११ ब मध्ये प्रतिष्ठेची लढत मानली जाणारी ही जागा विरोधकांनी हिसकावली. हा पराभव युतीच्या प्रचंड ताकदीचे आणि विकासाच्या मुद्द्याला अपवाद ठरला.

## काका-पुतण्यांना नाकारलं

## पुणे, पिंपरी चिंचवडमध्ये पुन्हा कमळ फुललं...

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** पुणे आणि पिंपरी महापालिकेच्या निवडणुकीकडे राज्याचे लक्ष लागले होते. शरद पवार आणि अजित पवार काका पुतण्यांच्या एकीकरणामुळे या महापालिकांम ध्ये पवारांची पावर दिसेल असे बोलले जात होते. मात्र तसे घडले नाही.

दोन्ही महापालिकांवर भाजपने एक हाती सत्ता मिळवली. पवारांना त्यांच्याच होमपीचवर धोबीपछाड देत भाजपने आपले वर्चस्व सिद्ध केले. पुणे महापालिकेत भारतीय जनता पार्टीने ११२ जागा जिंकल्या. तर दोन्ही राष्ट्रवादीला अनुक्रमे २० व २५ जागा जिंकता आल्या. राज्यातील महत्त्वाच्या पालिकांपैकी एक असलेल्या पिंपरी चिचवड महापालिकेच्या सर्व विजयी उमेदवारांची यादी समोर आली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपली संपूर्ण ताकद लावली होती. अजित पवार यांनी प्रचारावेळी थेट भाजप वर टीका करताना भ्रष्टाचाराचे आरोप केले होते. अजित पवार आणि महेश लांडगे या दोन दादांनी एकमेकांवर तोफा डागल्या. मात्र शेवटी पिंपरी चिंचवडच्या जनतेने काका पुतण्याला नाकारत भाजपच्या बाजूने कौल दिला आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेत एकूण १२८ जागा असून बहुमतासाठी ६५ जागांचा आकडा पार करण्याची गरज होती. भाजपने हा आकडा ओलांडला असून त्याहून अधिक जागा भाजपच्या आल्या आहेत. पिंपरी चिंचवडमध्ये भाजप ८४, राष्ट्रवादी ३७, शिवसेना शिंदे ०६ आणि अपक्ष ०१ जागा मिळाली आहे.

## आशियातील सर्वात श्रीमंत महापालिकेवर भाजपचा झेंडा!

### शिवसेना - मनसेचे अपयश: मुंबईत ठाकरेंनी सत्ता गमावली

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** सबंध देशाचे लक्ष लागून असलेल्या मुंबई महापालिकेवर भाजपने आपला झेंडा फडकवला. महायुतीतील मित्र पक्षांच्या मदतीने मुंबईवर आता भाजपचा महापौर राज्य करणार यात शंका नाही. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या एकीच्या बळावर मुंबईवरचे



वर्चस्व टिकवून ठेवण्याचा त्यांचा मनसुबा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी धुळीस मिळविला. आशिया खंडातील सर्वात श्रीमंत असलेल्या या महापालिकेवर आता फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भाजपचा झेंडा फडकला. मुंबई महानगरपालिका निवडणूक निकाल (जाहीर झाला. मुंबई महानगरपालिकेसाठी २२७ जागांसाठी जवळपास ५२.९४ टक्के मतदान झालं. मुंबई महानगरपालिकेत सत्ता स्थापन करण्यासाठी ११४ जागांची गरज असतान हा आकडा कोण गाठणार याकडे सर्वांचं लक्ष होते.. उद्धव ठाकरेंचा शिवसेना ठाकरे गट आणि राज ठाकरेंची मनसेने युती केली. ठाकरे बंधूंच्या या युतीला शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसनेही पाठिंबा दिला. त्यामुळे मुंबईत शिवसेना ठाकरे गट, मनसे आणि शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र लढले.**(पान ४ वर)**

### अहिल्यानगरचे विजयी उमेदवार

१ सागर बोरुडे राष्ट्रवादी (अजित पवार)
शारदा दिगंबर ढवण भाजप
दीपाली नितीन बारस्कर राष्ट्रवादी (अजित पवार)
संदीप विजय बारस्कर राष्ट्रवादी (अजित पवार)
२ रोहिणी प्रवीण भोसले भाजप
महेश शशिकांत तांबे राष्ट्रवादी (अजित पवार)
संध्या बाळासाहेब पवार राष्ट्रवादी (अजित पवार)
निखिल वारे भाजप
३ योगीराज गाडे शिवसेना (उबाठा)
ज्योती अमोल गाडे राष्ट्रवादी (अजित पवार)
गुरुशिलाकर संतलालजी सोही राष्ट्रवादी (अजित पवार) ऋग्वेद गंधे भाजप
४ शेख रहिमान खलिद (एमआयएम)
सय्यद सादिक अहमद (एमआयएम)
खान नाजिया साजिद (काँग्रेस)
खान राशिद समिउल्ला (काँग्रेस)
५ काजल गोवर्धन मोरेले राष्ट्रवादी (अजित पवार)
धनंजय गोवर्धन जाधव (भाजप)
हरप्रीत गुरजीतसिंग गंभीर (राष्ट्रवादी) (अजित पवार)
मोहन महादेव पांडवे राष्ट्रवादी (अजित पवार)
६ मनोज लक्ष्मण दुलम (भाजप)
सोनाबाई तानाजी शिंदे भाजप (बिनविरोध)
सुनीता श्रीकृष्ण कुलकर्णी (भाजप)
करण उदय कराळे (भाजप) (बिनविरोध)
७ बाबू महादेव माने (भाजप)
सुषमा अनिल बोडके भाजप (बिनविरोध)
वंजाळा दीगंबर नारे (भाजप)
बाबासाहेब वाकळे (भाजप)
८ सुनीता किसन भिंगारदिवे राष्ट्रवादी (अजित पवार)
आशाबाई लोभाजी कातोरे (भाजप)
नवनाथ मच्छिंद्र कातोरे (शिवसेना)
कुमार बाबासाहेब वाळके (राष्ट्रवादी अ.प.) (बिनविरोध)
९ संतोष छगनराव शेंडगे (शिवसेना)
रुपाली संदीप दातरंगे (शिवसेना)
वैशाली शाम नळकांडे (शिवसेना)
महेश राम लोंढे (भाजप)
१० श्रीपाद शंकर छिंदम (बसप)
शितल अमर ढोणे (भाजप)
मधुर सुशांत जाधव (भाजप)
सागर राजू मुर्तंडकर (भाजप)
११ गणेश कवडे (शिवसेना)
सुनीता संतोष गेनप्पा (शिवसेना)
आशा डागवाले राष्ट्रवादी (अजित पवार)
सुभाष भगवंत लोंढे (भाजप)
१२ मंगल सुनील लोखंडे (शिवसेना)
सुरेखा संभाजी कदम (शिवसेना)
बाळासाहेब बोराटे (शिवसेना)
दत्तात्रय कावरे (शिवसेना)
१३ सुरेश लक्ष्मण बसमोडे (राष्ट्रवादी ) (अजित पवार)
सुजाता महेंद्र पडोळे राष्ट्रवादी (अजित पवार)
अनिता विपुल शेटिया राष्ट्रवादी (अजित पवार)
अविनाश हरिभाऊ घुले राष्ट्रवादी (अजित पवार)
१४ प्रकाश बाबुराव मागानगरे (राष्ट्रवादी) (अजित पवार)
सुनीता भगवान फुलसौंदर (राष्ट्रवादी) (अजित पवार)
मीना संजय चोपडा राष्ट्रवादी (अजित पवार)
गणेश पुंडलिक भोसले राष्ट्रवादी (अजित पवार)
१५ पौर्णिमा विजय गव्हाळे (राष्ट्रवादी) (अजित पवार)
दत्तात्रय सोमनाथ गाडळकर (भाजप)
गीतांजली सुनील काळे राष्ट्रवादी (अजित पवार)
सुजय अनिल मोहिते भाजप
१६ सविता महेंद्र कांबळे (राष्ट्रवादी) (अजित पवार)
वर्षा सुजित काकडे राष्ट्रवादी (अजित पवार)
विजय मोहनराव पठारे (भाजप)
ज्ञानेश्वर शिवाजी येवले (भाजप)
१७ मयूर कन्हैयालाल बांगरे राष्ट्रवादी (अजित पवार)
अर्चना सुमित लोंढे राष्ट्रवादी (अजित पवार)
कमल जालिंदर कोतकर (भाजप)
मनोज शंकर कोतकर (भाजप)

### झापुक । zupuk

विकासाचा अजेंडा
घेऊन निवडणूक
लढले
सत्तेत आल्यावर
अजेंड्याच्या विकासात
गुंतले

**नवनाथ कुताळ**
**९४२२२३१८२५**

# संपादकीय

## राज्यातील महापालिका भाजपमय

महाराष्ट्रातील २९ महानगरपालिका निवडणुकांनी (जानेवारी २०२६) राज्याच्या राजकीय पटलावर एक नवा अध्याय लिहिला आहे. भाजपने धुमाकूळ घालत मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड, कोल्हापूर, अहिल्यानगर, संभाजीनगर (औरंगाबाद) यांसह अनेक प्रमुख शहरांमध्ये एकतर्फी यश मिळवले. या २९ महानगरपालिकांपैकी भाजपप्रणीत महायुतीने २५ ठिकाणी विजय मिळवला, तर विरोधकांना केवळ ४ ठिकाणी समाधानकारक यश मिळाले. ही निवडणूक भाजपच्या रणनीतीचे यश आणि विकासाच्या मुद्द्याचे प्राबल्य दाखवते.

भाजपची प्रभावी रणनीती भाजपने या निवडणुकीत विकास आणि हिंदुत्व यांचा सुंदर संगम साधला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट म्हटल्याप्रमाणे, ''हिंदुत्व हे आमचे आत्मा आहे; विकासाशी त्याला वेगळे करता येत नाही.'' पक्षाने केंद्र आणि राज्यातील योजनांचा (जसे की इन्फ्रास्ट्रक्चर, मेट्रो, रस्ते, पाणीपुरवठा) प्रचार केला. मुंबईत २२७ प्रभागांपैकी भाजप-शिंदे सेनेची युती ११६+ प्रभागांत आघाडीवर राहिली, ज्यामुळे ठाकरे कुटुंबीयांचे २५ वर्षांचे वर्चस्व संपुष्टात आले. पुणे (१६५ प्रभाग) आणि पिंपरी-चिंचवड (१२८ प्रभाग) मध्ये भाजपने अनुक्रमे ७०+ आणि ८०+ प्रभागांत आघाडी घेतली. कोल्हापूर, संभाजीनगर, अहिल्यानगर, नाशिक यांसारख्या शहरांतही पक्षाने मजबूत कामगिरी केली. रणनीतीत स्थानिक नेत्यांचा वापर, महिला आणि युवा मतदारांवर लक्ष, आणि विरोधकांच्या फुटीचा फायदा घेणे हे प्रमुख होते.विरोधकांच्या अपयशाची कारणे विरोधकांना भाजपच्या अर्ध्यापर्यंतही पोहोचता आले नाही. मुख्य कारणे: ठाकरे बंधूंचा एकत्र येण्याचा प्रयोग फसला ‑ उद्धव आणि राज ठाकरे यांनी २० वर्षांनंतर मुंबई, ठाणे, नाशिकमध्ये 'मराठी माणूस' चा मुद्दा पुढे आणला. मात्र, उत्तर भारतीय आणि दक्षिण भारतीय मतदारांनी हा मुद्दा नाकारला. हिंदी-मराठी वाद आणि हिंसक घटनांनी त्यांचा फटका बसला. मुंबईत त्यांची एकत्रित आघाडी ८५+ प्रभागांतच मर्यादित राहिली.

दोन्ही राष्ट्रवादींचा एकत्र येण्याचा अपयश ‑ शरद पवार आणि अजित पवार यांनी पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये तात्पुरते एकत्र आले, मात्र भाजपने दोन्ही ठिकाणी प्रचंड आघाडी घेतली. पिंपरी-चिंचवडमध्ये अजित गट ३६-४० प्रभागांत, तर शरद गट केवळ १-२ ठिकाणी. मतदारांनी 'पवार ब्रँड' ची एकजूट नाकारली.मराठी माणूस मुद्दा अपयशी ‑ हा मुद्दा मुंबई आणि परिसरात प्रभावी ठरला नाही. मतदारांनी विकासाला प्राधान्य दिले. हिंदी बोलणाऱ्या दुकानदारांवर हल्ले आणि आक्रमक भूमिकेने बहुसंख्याक मतदार दूर गेले.

निवडणूक यंत्रणा हायजॅकचा आरोप विरोधकांनी (ठाकरे, काँग्रेस) मतदानाच्या दिवशी 'इंक' सहज पुसली जाणे, फेक मतदार यादी, ईव्हीएम गोंधळ असे आरोप केले. मात्र, राज्य निवडणूक आयोगाने हे आरोप फेटाळले आणि प्रक्रिया पारदर्शक असल्याचे सांगितले. पुराव्याअभावी हे आरोप मुख्यत्वे राजकीय रणनीती म्हणून दिसतात. निकालाच्या प्रमाणाने हे आरोप कमकुवत ठरले.

हिंदुत्व की विकास? भाजपने दोन्ही मुद्दे एकत्र आणले. हिंदुत्वाने पारंपरिक मतदारांना बांधून ठेवले, तर विकासाच्या कामांनी (मेट्रो, रस्ते, स्वच्छता) युवा आणि मध्यमवर्गीय मतदारांना आकर्षित केले. फडणवीस यांनी म्हटल्याप्रमाणे, ''लोकांनी विकासाची मागणी केली.'' मराठी माणूस मुद्द्यापेक्षा विकासाचे कार्ड अधिक चालले.

आगामी जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणुकीवर परिणाम हे निकाल जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी महत्त्वाचे आहेत. भाजपची शहरी ताकद ग्रामीण भागातही वाढवेल. महायुतीची एकजूट मजबूत होईल, तर विरोधकांची फूट अधिक स्पष्ट होईल. ग्रामीण मतदार विकासाच्या मुद्द्याकडे वळतील, ज्यामुळे भाजपला फायदा होण्याची शक्यता.कंदरीत, ही निवडणूक महाराष्ट्रात भाजपच्या प्रभुत्वाची पुष्टी करते. विरोधकांना एकत्र येण्याचे प्रयोग आणि भावनिक मुद्दे अपयशी ठरले. विकास आणि सुशासन हेच भविष्यातील राजकारणाचे केंद्रबिंदू राहतील.

# वादविवाद स्पर्धेत रौप्य करंडक पुणे महाविद्यालयाकडे

## कनिष्ठ गटात प्रवरेची बाजी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** लोणी येथील पद्मश्री विखे पाटील महाविद्यालयात झालेल्या सहकार महर्षी पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालय रौप्य करंडक वादविवादचा यावर्षीच्या पद्मश्री विखे पाटील रौप्य करंडकावर पुणे येथील कला, वाणिज्य महाविद्यालय वारजे माळवाडी येथील स्पर्धक विद्यार्थ्यांनी आपले नाव कोरले आहे. तर कनिष्ठ गटामध्ये पद्मश्री विखे पाटील कनिष्ठ महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यानी बाजी मारली. या स्पर्धेमध्ये राज्यभरातील ३४ महाविद्यालयांच्या संघाचा सहभाग घेतला.

यावर्षीच्या वादविवाद स्पर्धेचा प्रस्ताव यावर्षी संयोजन समितीने 'कृत्रिम बुद्धिमत्ता (अख) मानवी जीवनाच्या सर्वांगीण विकासास पूरक ठरेल' हा अत्यंत समकालीन आणि जिव्हाळ्याचा विषय वाद-विवादासाठी ठेवला होता. या प्रस्तावाच्या अनुकूल आणि प्रतिकूल बाजूने विद्यार्थ्यांनी

मागील ४४ वर्षापासून अखंड ही वाद विवाद स्पर्धा सुरू आहे. संस्थेचे अध्यक्ष आणि जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुयोग्य नियोजन होत असते. 'कृत्रिम बुद्धिमत्ता (अख) मानवी जीवनाच्या सर्वांगीण विकासास पूरक असली तरी त्याचा अतिरेकी पणा नको हाच संदेश या स्पर्धेच्या माध्यमातून दिला गेला. या स्पर्धेमध्ये राज्यभरातील पुणे, अहिल्यानगर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर येथील महाविद्यालयाचे संघ उपस्थित होते. एकूण ६८ स्पर्धकांनी आपली मते या स्पर्धेच्या माध्यमातून मांडली

अतिशय अभ्यासपूर्ण मते मांडली. ही स्पर्धा वरिष्ठ आणि कनिष्ठ अशा दोन गटात संपन्न झाली. स्पर्धेचा पारितोषिक वितरण भेंडा येथील जिजामाता महाविद्यालयांचे प्राचार्य डॉ.शिरीष लांडगे,सह सचिव भारत घोगरे, डॉ.भास्कर शेळके, संस्थेचे शिक्षण संचालक डॉ.प्रदिप दिघे, शिक्षण संचालिका लीलावती सरोदे,उपप्राचार्य डॉ. आर. ए. पवार,स्पर्धेचे कार्याध्यक्ष डॉ.शांताराम चौधरी,डॉ.दिपक घोलप स्पर्धेचे परीक्षण डॉ.जितेंद्र पाटील,राजेंद्र जोरवर,साहीत्यिक प्रा.शशिकांत शिंदे यांनी केले.

या स्पर्धामध्ये सांघिकमध्ये अनिकेत रामा वनारे आणि नितीन जगन्नाथ गागरे कला आणि वाणिज्य महाविद्यालय वारजे माळवाडी पुणे यांनी करंडक मिळवला. तर वरिष्ठ गटामध्ये आर डी आय के महाविद्यालय बडनेरा येथील आदित्य महादेवराव डोळे यांनी प्रथम , वारजे माळवाडी पुणे येथील अनिकेत रामा वनारे यांनी द्वितीय तर याच महाविद्यालयाचा नितीन जगन्नाथ गागरे यांनी तृतीय क्रमांक तर अळकुटी येथील महाविद्यालयातील मुस्कान ममनौद्दीन शेख यांनी उत्तेजनार्थ पारितोषिक मिळविले तर कनिष्ठ गटात प्रथम- पद्मश्री विखे



पाटील कनिष्ठ महाविद्यालय, लोणी येथील अंकिता संदिप जगताप प्रथम, छत्रपती शिवाजी विद्यालय पाथरे येथील प्रियंका विजय सिनारे व्दितीय,अगस्ती विद्यालय अकोले येथील दर्शन विजय चौधरी तृतीय तर उत्तेजार्थ प्रवरा पब्लिक स्कुल प्रवरानगर येथील स्वरुप गणपत भोसले यांनी यश मिळविले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. आर.ए.पवार यांनी करतांना या वादविवाद स्पर्धेचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. एस .एम. वाकोळे, प्रा. डी.के.खेमनर यांनी तर आभार डॉ.शांताराम चौधरी यांनी मानले.

# खा. गोविंदराव आदिक सेवक पतसंस्थेच्या चेअरमनपदी विजय थोरात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव :** खा.गोविंदराव आदिक ग्रामीण शिक्षण संस्था संचलित सेवकांची सहकारी पतसंस्थेची चेअरमन आणि व्हा.चेअरमन निवडीची सभा अध्यासी अधिकारी आर. एल. गडेकर, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, श्रीरामपूर यांचे अधिपत्याखाली नुकतीच संपन्न झाली. सदर सभेमध्ये न्यू इंग्लिश स्कूल मातापूर या विद्यालयाचे मुख्याध्यापक विजय थोरात यांची चेअरमन पदी तर कै. रघुनाथ औताडे माध्यमिक विद्यालय माळेवाडी या विद्यालयातील सहशिक्षक विलास कुलकर्णी यांची व्हा. चेअरमनपदी बिनविरोध निवड करण्यात आली.

त्यांच्या या निवडीबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय सरचिटणीस तथा राष्ट्रीय प्रवक्ते व खा. गोविंदराव आदिक ग्रामीण शिक्षण संस्थेचे सचिव अविनाश आदिक, श्रीरामपूर नगर परिषदेच्या लोकनियुक्त माजी नगराध्यक्षा अनुराधाताई आदिक, संस्थेचे अध्यक्ष बबन आदिक संस्थेचे सहसचिव ॲड. जयंत चौधरी, गव्हर्निंग कौन्सिल सदस्य नितीन पवार, हंसराज आदिक, सुनील थोरात आदींनी अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. त्याचप्रमाणे विविध कार्यकारी सोसायटी उक्कलगावचे चेअरमन पुरुषोत्तम थोरात, व्हा. चेअरमन शरद थोरात तसेच सदस्य एकनाथ यशवंत थोरात, शिवाजी थोरात, नानासाहेब थोरात पत्रकार दिपक उंडे यांनी देखील नूतन चेअरमन, व्हा.चेअरमन यांचे अभिनंदन केले.



# अशोक महाविद्यालयात प्लेसमेंट सेल अंतर्गत कॅम्पस इंटरव्ह्यू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** माजी आमदार भानुदास मुरकुटे यांच्या मार्गदर्शनाखाली कला,वाणिज्य व विज्ञान महाविदयालय आणि प्रवरा हेल्थ केअर रिमीडीज लिमीटेड श्रीरामपूर यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दिनांक १६ जानेवारी २०२६ रोजी मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते.त्यामध्ये बिजनेस असिस्टंट,बिजनेस मॅनेजर,सेल्स एझिक्यूटीव,ऑफीस असिस्टंट,मिडीया मॅनेजर अशा २९ पदासाठी मुलाखती घेण्यात आल्या. त्यामध्ये महाविद्यालयातील एकूण ४४ विद्यार्थ्यांनी मुलाखती दिल्या.या मुलाखती घेण्यासाठी प्रवरा हेल्थ केअर रेमीडीज लिमीटेड




कंपनीचे संचालक वैभव ढुस, योगेश पतंगे,प्रणव लोळगे,प्रसाद ढुस,रुषिकेश शिरसाट,आणि महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनीता गायकवाड, उपप्राचार्य सुयोग थोरात,प्लेसमेंटसेलचे समन्वयक प्रा.स्वप्नील लांडगे, सह समन्वयक प्रा.शरद आवारी, आयक्यूएसी चेअरमन प्रा.संगीता खंडिझोड इत्यादी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. शरद आवारी यांनी केले.तर सूत्रसंचालन प्रा.स्वप्निल लांडगे यांनी केले.या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे कार्यालयीन अधीक्षक बाबासाहेब पटारे,प्रा. सुधीर शेरकर,प्रा.वैभव गायकवाड, प्रा. हर्षल दौंड. प्रा.ज्ञानेश्वर खिलारी,प्रा.शहाबुद्दीन शेख,डॉ. संदीप सांगळे,प्रा.योगेश राऊत,प्रा. नानासाहेब शिरोळे, प्रा.नवनाथ नागुडे,प्रा.मंदा तांबे,प्रा. राणी पटारे,प्रा.पायल सुराणा,प्रा.हिना शेख,प्रा.अमृता गायके,प्रा.मोहिनी अल्हाट,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सौ.सुशीलामाई काळे महाविद्यालयाची शैक्षणिक सहल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :**कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटीचे सौ. सुशीलामाई काळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांच्या औद्योगिक व शैक्षणिक सहलीचे आयोजन १२ व १३ जानेवारी रोजी करण्यात आले होते. अशी माहिती महाविद्यालयाच्या प्र.प्राचार्य डॉक्टर विजया गुरसळ यांनी दिली. संस्थेच्या सचिव चैतालीताई काळे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थीदशेतच व्यवसायाची आवड निर्माण होऊन भविष्यात व्यवसाय क्षेत्रात यशस्वी करिअर घडावे या दृष्टीने महाविद्यालयाच्या वतीने वाणिज्य मेळाव्याचे आयोजन औद्योगिक सहलीचे आयोजन, विविध तज्ञांची व्याख्याने याद्वारे प्रयत्न केले जातात.



पुस्तकी ज्ञानाला प्रत्यक्ष अनुभवाची जोड देण्यासाठी औद्योगिक सहल मोठी कामगिरी बजावत असते. हाच उद्देश घेऊन सौ सुशीलामाई काळे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील वाणिज्य विभागातील विद्यार्थ्यांना वाई येथील मॅप्रो या कंपनीतील प्रक्रिया, उत्पादन, विक्री अशा विविध विभागांच्या भेटीद्वारे प्रत्यक्ष उत्पादन तंत्रज्ञान, मालाची प्रक्रिया ते विपणन,विक्री यातील सर्व टप्पे तसेच कामाच्या ठिकाणाचे वातावरण याबाबतचा अनुभव घेता आला. विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच धार्मिक स्थळे, भौगोलिक विविधता यांची प्रत्यक्ष माहिती मिळावी, तसेच निसर्गाच्या सानिध्यात जाऊन जीवनाचा आनंद अनुभवता यावा याकरिता एकवीरा देवी, पालीचा गणपती, दिवे आगर समुद्रकिनारा अशा ठिकाणांना देखील भेट दिली.

तसेच या सहलीदरम्यान महाराष्ट्राचा समृद्ध इतिहास, संस्कृती, यांचे महत्त्व आणि जाणीव करून देण्यासाठी ऐतिहासिक रायगड किल्ल्याला भेट दिली.छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची, स्वराज्य स्थापनेची आणि रायगडाच्या अस्मितेची रोमहर्षक व जिवंत साक्ष या भेटीतून विद्यार्थ्यांच्या मनाला भिडली.

या सहलीमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला असून व्यवहार ज्ञान,संघभावना व सामाजिक जाणीव विकसित होण्यास मदत होणार आहे. सहलीदरम्यान वाणिज्य शाखेचे प्राध्यापक नंदकिशोर बोरसे यांच्या नेतृत्वाखाली प्रा. हरिभाऊ कोळपे, प्रा. डॉ. पल्लवी मोरे, व प्रा. ऐश्वर्या शिंदे हे प्राध्यापक विद्यार्थ्यांसोबत उपस्थित होते. या सहलीसाठी महाविद्यालयाच्या प्रा. डॉ. विजया गुरसळ यांचे मार्गदर्शन लाभले.

# अतिवृष्टीग्रस्त विहिरींच्या पंचनाम्यांसाठी मुख्यमंत्र्यांकडे निवेदन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळवाडगांव ।** अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेल्या विहिरींचे पंचनामे अद्यापही न झाल्याने श्रीरामपूर तालुक्यातील शेतकरी शासनाच्या मदतीपासून वंचित राहिले आहेत. या गंभीर प्रश्नाकडे राज्य शासनाचे लक्ष वेधण्यासाठी श्रीरामपूर येथील सामाजिक कार्यकर्ते व भाजपा सोशल मीडिया सेलचे संयोजक पत्रकार संदीप आसने यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन पाठवले आहे.

निवेदनात नमूद केल्यानुसार, श्रीरामपूर तालुक्यात अनेक शेतकऱ्यांच्या विहिरी अतिवृष्टीमुळे खचल्या असून काही विहिरींमध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचून त्या पूर्णतः बुजल्या आहेत. सिंचनाचा मुख्य आधार बंद पडल्याने शेतकरी अडचणीत सापडले आहेत. शासनाने विहिरी दुरुस्तीसाठी मदतीची घोषणा केली असली, तरी प्रत्यक्षात पंचनामे न झाल्यामुळे शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळालेला नाही.

पंचनामे होतील या अपेक्षेने अनेक शेतकऱ्यांनी ऑक्टोबरपासून डिसेंबरपर्यंत प्रशासनाची वाट पाहिली. मात्र विलंबामुळे शेवटी अनेक शेतकऱ्यांना स्वतःच्या खर्चाने विहिरींची दुरुस्ती सुरू करावी लागली असून काही शेतकऱ्यांची दुरुस्ती पूर्णही झाली आहे. अशा शेतकऱ्यांना शासनाच्या योजनेचा लाभ मिळणार का, असा सवालही उपस्थित करण्यात आला आहे. नुकसान होऊनही भरपाई न मिळाल्याने शेतकऱ्यांवर आर्थिक भुर्दंड पडला असून कर्ज काढून दुरुस्ती करावी लागत आहे. प्रशासनाच्या दिरंगाईमुळे शेतकरी आर्थिक मेटाकुटीला आले असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.श्रीरामपूर तालुक्यातील अतिवृष्टीग्रस्त विहिरींचे तातडीने पंचनामे करून, दुरुस्ती केलेल्या शेतकऱ्यांनाही शासन निर्णयाचा लाभ देण्यात यावा, तसेच संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश द्यावेत, अशी मागणी पत्रकार संदीप आसने यांनी निवेदनातून केली आहे.

# मावा गुटखा विक्री खुलेआम

## प्रशासन चुपचाप

**सोनई :** महाराष्ट्रातील चर्चेत असलेला जिल्हा म्हणजे अहिल्यानगर जिल्ह्यात सध्या मावा गुटखा सारख्या धूम्रपान उत्पादनातून कोटी रुपयाची उलाढाल होत असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात १४ तालुके असणारा हा जिल्हा महाराष्ट्रात क्षेत्रफळाने सर्वात मोठा जिल्हा म्हणून गणला जातो तसेच स्वातंत्र लढ्यात ऐतिहासिक कामगिरी असणारा पुरोगामी जिल्हा सध्या मावा गुटखा तस्करीत अडकला असून अनेक युवक या व्यसनात अडकले आहेत परिणामी अनेक जण या व्यसनाच्या आहारी जाऊन मृत्यू मुखी पडले आहेत.

अन्न व भेसळ कार्यालयाने मनावर घेतले तर हा व्यवसाय आणि व्यसनाधीनता काही प्रमाणात आटोक्यात येऊ शकते परंतु सदर कार्यालय कुठेही कारवाई करताना दिसत नाही यामुळे नागरिकांमध्ये नाराजीचा सूर आहे. अन्न व भेसळ विभागाने यामध्ये तात्काळ लक्ष घालून कडक कारवाई करावी अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

# अमेरिका-इराण तणावात दिलासा

## इराणने हवाई क्षेत्र पुन्हा उघडले


**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नवी दिल्ली :** मध्यपूर्वेत वाढलेल्या अमेरिका-इराण तणावामुळे गेल्या काही दिवसांत युद्धसदृश वातावरण निर्माण झाले असताना काल परिस्थितीत काही अंशाने दिलासा देणाऱ्या घटना घडल्या. कतारमधील अमेरिकेच्या अल उदेद लष्करी हवाई तळावरून अमेरिकन विमाने व सैन्याची माघार सुरू झाल्याची माहिती समोर आल्यानंतर काही तासांतच तणाव कमी झाल्याचे संकेत मिळाले.

माघारीनंतर अल उदेद तळावरून हटवण्यात आलेली विमाने पुन्हा हळूहळू तळावर परतू लागली आहेत. यामुळे अमेरिकन सैन्याने तळ पूर्णपणे रिकामा करण्याचा निर्णय स्थगित केल्याचे स्पष्ट झाले आहे.

बुधवारी सकाळी इराणकडून मिळालेल्या हालचाली आणि वाढलेल्या धोका परिस्थितीमुळे अल उदेद हवाई तळावरील सुरक्षा पातळी 'हाय अलर्ट'वर नेण्यात आली होती. खबरदारीचा उपाय म्हणून काही सैनिकी कर्मचाऱ्यांना तात्पुरते तळातून बाहेर जाण्याचा सल्ला देण्यात आला होता. परंतु या तणावानंतर काही तासांनी परिस्थितीतील तीव्रता कमी झाल्याचे निरीक्षणात आल्यानंतर सुरक्षा सतर्कतेची पातळी कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला. दरम्यान, तात्पुरते स्थलांतरित करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना परत तळावर येण्याची परवानगी देण्यात आली आहे.

दरम्यान, या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही इराणविरोधातील भूमिका मवाळ केल्याचे दिसले. इराणमध्ये आंदोलनकर्त्यांवर झालेल्या कारवाईनंतर उभ्या राहिलेल्या फाशीच्या भीतीबाबत ट्रम्प यांनी दिलेला नवा प्रतिसाद अमेरिकेचा सूर काहीसा सौम्य झाल्याचे दर्शवितो. ट्रम्प म्हणाले की, इराणमध्ये आंदोलनकर्त्यांचा मृत्यू झाल्याच्या आकडेवारीत प्राथमिक पातळीवर कमी झाल्याचे संकेत



मिळत आहेत तसेच सामूहिक फाशी देण्याचा कोणताही तातडीचा कार्यक्रम नसल्याची माहितीही प्राप्त झाली आहे. ट्रम्प यांनी यापूर्वी इराणला कडक इशारा देत कठोर परिणामांची तयारी करण्यास सांगितले होते, मात्र बुधवारी त्यांनी 'थांबा आणि पहा' अशी भूमिका स्वीकारल्याचे संकेत मिळाले.

इराणकडूनही तणाव कमी करण्यास हातभार लावणारी माहिती समोर आली. इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाकडून आंदोलनात अटक करण्यात आलेल्या व्यक्तींची फाशी देण्याची कोणतीही तात्काळ योजना नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. कारज शहरात अटक झालेल्या २६ वर्षीय एरफान सोलतानी या आंदोलनकर्त्याच्या फाशीची शिक्षा पुढे ढकलण्यात आल्याची माहिती सरकारी माध्यमांनी दिली. मानवाधिकार संघटनांनीही याची पुष्टी केली असून त्यामुळे देशातील आंदोलनकर्त्यांच्या भवितव्याबाबत उद्भवलेली तीव्र चिंता काहीशी अनुशीत झाली आहे.

मध्यपूर्वेतील वाढत्या तणावाचा थेट परिणाम हवाई वाहतुकीवर झाला. अमेरिका-इराण संघर्षाची भीती निर्माण झाल्यानंतर बुधवारी संध्याकाळी उशिरा इराणने देशाचे हवाई क्षेत्र अचानक बंद केले. अनेक आंतरराष्ट्रीय उड्डाणे थांबली किंवा वळवण्यात आली. भारतातील एअर इंडिया आणि इंडिगोसह अनेक विमान कंपन्यांनी प्रवाशांसाठी ट्रॅव्हल ॲडव्हायजरी जारी केल्या. तथापि, सुमारे पाच तासांनंतर परिस्थिती स्थिर झाल्याचे पाहून इराणने आपले हवाई क्षेत्र पुन्हा उघडले. हवाई क्षेत्र उघडताच इराणी विमान कंपन्यांची उड्डाणे सुरू झाली, जरी हवाई वाहतुकीचा वेग पूर्वीपेक्षा सुस्पष्टपणे कमी होता.

अमेरिका आणि इराण यांच्यातील वैरभाव आणि शक्ती संघर्षामुळे मध्यपूर्वेतील स्थैर्याला पुन्हा धोका निर्माण झाला असताना, बुधवारी झालेल्या या घडामोडींनी दोन्ही बाजूंनी काही अंशी संयम दाखवला असल्याचे चित्र समोर आले. अमेरिकन सैन्याची माघार थांबण्यासह इराणने हवाई क्षेत्र पुन्हा सुरू करणे आणि आंदोलनकर्त्यांच्या फाशीवर तात्पुरता दिलासा मिळणे या तिन्ही घटनांनी संघर्षाचे तापमान कमी होऊ शकते अशी आशा निर्माण झाली आहे.

एकंदरीत, तणाव अद्याप पूर्णपणे संपलेला नाही. तथापि, राजनैतिक पातळीवर मवाळ विधानं आणि व्यावहारिक निर्णय हे परिस्थितीकडे तणावातून संवादाकडे जाण्याचे संकेत देत आहेत.

# प्रवरा पब्लिक स्कूलने रोबो रेस स्पर्धेत उपविजेतेपद पटकावले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर:** लोकनेते पद्मभूषण डॉ बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा पब्लिक स्कूलने रोबो रेस स्पर्धेत उपविजेतेपद पटकावले. अशी माहिती शाळेचे प्राचार्य डॉ. बी. बी. अंबाडे यांनी दिली.

संगमनेर येथील अविनाश सर स्किल्स सेंटर आणि व्हिजन कोचिंग इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या रोबो रेस स्पर्धेत प्रवरा पब्लिक स्कूल प्रवरानगरच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. या स्पर्धेत शाळेने उपविजेतेपद पटकावत चषक, प्रमाणपत्रे व रूपये ७,००० रोख पारितोषिक मिळवले.

या स्पर्धेत शाळेचे विद्यार्थी यश निलकंठ बस्ते आणि अथर्व एकशिंगे यांनी सहभाग घेत उत्कृष्ट तांत्रिक कौशल्य, कल्पकता व संघभावना दाखवली. विद्यार्थ्यांनी आपल्या रोबोटचे अर्डइनोवर आधारित ब्लूटूथ



नियंत्रण प्रणाली यशस्वीरीत्या सादर केली.

बक्षीस वितरण प्रमुख पाहुणे डॉ. विलास शिंदे, , अमृतवाहिनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ऑटोमेशन व रोबोटिक्स विभागाचे डॉ. विलास शिंदे यांच्या शुभहस्ते विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले.

शाळेचे प्राचार्य डॉ बी बी अंबाडे, उपप्राचार्य के टी अडसुळ, पर्यवेक्षिका एम एस जगधने, ए टी एल प्रमुख डी. डी. अरंगले, राजा सिध्दार्थन एलंदस्सेरी यांचे विजेत्या स्पर्धकांना मार्गदर्शन लाभले.

विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा शालिनीताई विखे, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के, संस्थेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे, अतिरिक्त मुख्यकार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ, सहसचिव भारत पाटील घोगरे, अतांत्रिक संचालक डॉ. प्रदीप दिघे, शिक्षण संचालिका लीलावती सरोदे यांनी अभिनंदन केले.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, Emal ID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

दखल

## प्रवरा फळे-भाजीपाला सोसायटीच्या चेअरमनपदी मकरंद गुणे



**आश्वी** : शिर्डी विधानसभा मतदारसंघातील अग्रगण्य प्रवरा फळे-भाजीपाला सोसायटी, प्रवरानगर यांच्या चेअरमनपदी आश्वी खुर्द येथील ज्येष्ठ सहकारी कार्यकर्ते मकरंद दिनकर गुणे यांची निवड झाली. या निवडीमुळे आश्वी परिसरात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. गुणे हे २५ वर्षांपासून आश्वी खुर्द दूध उत्पादक संस्थेचे चेअरमन असून पारदर्शक कारभार, योग्य दर, व वार्षिक रिबेट यासाठी संस्था ओळखली जाते. गेल्या १० वर्षांपासून ते प्रवरा फळे-भाजीपाला सोसायटीचे संचालक म्हणूनही कार्यरत आहेत. सहकार व कृषी क्षेत्रातील अनुभव लक्षात घेऊनच त्यांची चेअरमनपदी निवड झाल्याचे सांगितले जाते. त्यांच्या निवडीबद्दल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह विविध मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या. गुणे यांच्या नेतृत्वाखाली संस्था अधिक सक्षम होऊन शेतकरी व सहकार क्षेत्रात नवे आदर्श निर्माण करतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## सत्यम धसाळ याची केंद्रीय राखीव पोलीस दलात निवड



**राहुरी** : राहुरी तालुक्यातील तांदुळवाडी येथील चि.सत्यम रायभान धसाळ याची नुकतीच केंद्रीय राखीव पोलीस दलामध्ये (सी.आर.पी.एफ.) निवड झाली आहे. सत्यम धसाळ याने मागील काही दिवसांपूर्वीच केंद्रीय राखीव पोलीस दलासाठी घेण्यात आलेल्या परीक्षा, मैदान, वैद्यकीय चाचणी आदी प्रक्रिया पूर्ण केलेल्या होत्या.

संबंधित विषयाचा निकाल जाहीर करण्यात आला यामध्ये त्याची केंद्रीय राखीव पोलीस दल (सीआरपीएफ) मध्ये निवड झाल्याचे जाहीर झाले. तो लोकनेते रामदास पाटील धुमाळ महाविद्यालयाचा वाणिज्य शाखेचा विद्यार्थी असून तांदुळवाडी येथील पत्रकार तथा संजय गांधी निराधार योजना समितीचे अध्यक्ष विनीत आनंदराव धसाळ यांचा पुतण्या आहे. सत्यम धसाळ याचे नियुक्ती बद्दल सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

## आज उंदीरगाव येथे नेत्र तपासणी शिबीर

**शिरसगाव** : श्रीरामपूर तालुक्यातील उंदीरगाव येथे सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयाजवळ मारुती मंदिर या ठिकाणी श्री संत जनार्दन स्वामी हॉस्पिटल कोपरगाव यांच्या संयुक्त विद्यमाने डोळे तपासणी शिबीर सालाबादप्रमाणे आयोजित करण्यात आले आहे.

शिबिरात डोळ्यांना त्रास होणे, डोके दुखणे, मानेच्या शिरा दुखणे, चक्कर येणे, डोळ्यात पाणी येणे, जवळचे व लांबचेकमी दिसणे आदीची तपासणी व त्यासाठी मार्गदर्शन तज्ज्ञ डॉक्टर करणार आहेत. या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन सरपंच प्रतिभा गोलवड व सर्व ग्रामपंचायत सदस्य. तसेच माजी चेअरमन सुरेश गलांडे,संचालक विरेश गलांडे,संचालक राजेंद्र पाऊलबुद्धे,जितेंद्र गोलवंड आदी मान्यवरांनी केले आहे.

## राज्यस्तरीय वाद-विवाद स्पर्धेत पाथरे विद्यालयाची प्रियांका सिनारे द्वितीय



**झरेकाठी** : श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय पाथरे बुद्रुक (ता. राहाता, जि. अहिल्यानगर) येथील कुमारी प्रियांका सिनारे हिने पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील राज्यस्तरीय वाद-विवाद स्पर्धेत कनिष्ठ गटात द्वितीय क्रमांक पटकावला. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) मानवी जीवनाच्या विकासास पूरक ठरेल या विषयावर प्रभावी मांडणी करत तिने राज्यस्तरावर यश मिळविले. तिला स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व २१०० रुपये पारितोषिक माननीय डॉ. शांताराम लांडगे (प्राचार्य, जिजामाता कॉलेज) यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

तिच्या साथीदार रेणुका शिरसाट हिचेही विशेष अभिनंदन करण्यात आले. यावेळी संस्थेचे सहसचिव भारत घोगरे, प्राचार्य डॉ. दिघे, प्रा. डॉ. शशिकांत शिंदे, डॉ. राम पवार आदी उपस्थित होते. प्रियांकाच्या यशाबद्दल ना. राधाकृष्ण विखे, शालिनीताई विखे, खा. डॉ. सुजय विखे आदी मान्यवरांसह संस्थेचे अधिकारी, शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले आहे.

# भाजपच्या विजयाचा श्रीरामपूरात जल्लोष



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : महाराष्ट्र राज्यातील अहिल्यानगर, मुंबईसह महानगरपालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला मिळालेल्या दणदणीत विजयाबद्दल श्रीरामपूर भाजपतर्फे महात्मा गांधी चौक येथे विजयोस्तव साजरा करण्यात आला.

यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या जयघोषाने परिसर दणाणून गेला. या विजयोत्सवासाठी भाजपचे ज्येष्ठ नेते संजय फंड, नगरपालिका गटनेत्या वैशाली चव्हाण, शहराध्यक्ष नगरसेवक जितेंद्र छाजेड, नगरसेविका स्नेहल खोरे, जयश्री पाटील, नगरसेवक आशिष धनवटे, दिपक चव्हाण, संजय गांगड, मनोज लबडे, रवी पाटील, केतन खोरे, शशांक रासकार, मारुती बिंगले, बंडुकुमार शिंदे, पुष्पलता हरदास, विजय आखाडे, धीरज सूर्यवंशी, अर्जुन कर्पे, राजेश गोरे, पृथ्वीराज चव्हाण, सोमनाथ गांगड, विशाल अंभोरे, आनंद बुधेकर, शिवम चव्हाण, किरण पठारे, किरण उईके, चंदन सिंग जुनी, सचिन धोत्रे, राहुल फुलारे, हरजीतसिंग टाक, महेश जोशी, सुबोध शेवतेकर, श्रेयश सुवर्ण पाठकी, मयूर रिंगे, अमोल शेटे, जसपालसिंग सहानी, गुणवंत आठरे, आछडा भाभी, सिद्धांत पाटील, चेतन लोंढे, कुणाल दहिटे आदी उपस्थित होते.

# मयत सचिन गीधेच्या हत्येची चौकशी करा डॉ. पिपाडा यांचे आ. धस यांना निवेदन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : शिर्डीतील सचिन गिधे या तरुणास गुंड दीपक पोकळे याने जिवंत जाळून क्रूर व भीषण हत्या केली. या हत्येची वरिष्ठ स्तरावरून चौकशी करावी अशी मागणी भाजप नेते डॉ. राजेंद्र पिपाडा यांनी मराठवाड्यातील भाजपाचे नेते आमदार सुरेश धस यांचे कडे केले आहे. आ . सुरेश धस यांनी डॉ . राजेंद्र पिपाडा यांच्या निवासस्थानी भेट दिली . यावेळी प्रगतशील शेतकरी शिवाजी आनप, मदनलालजी पिपाडा,नरेंद्रजी पिपाडा,महावीरजी पिपाडा,निखील पिपाडा,योगेश मुनावत,चेतन पिपाडा,रामदास येवले आदी यावेळी उपस्थित होते.

दिलेल्या निवेदनात पुढे म्हटले आहे की, मोक्क्यातील आरोपी दीपक पोकळे हा सराईत गुन्हेगार आहे. गेल्या १५ वर्षापासून राहाता,शिर्डी,कोपरगाव,संगमनेर या तालुक्यात दहशत करतो. राहात्यामध्ये दिनेश भडांगे नावाचा एक गरीब मुलगा चहाचा व्यवसाय करत होता. पोकळे त्याचा गल्ला लुटायला गेला त्याने विरोध केला तर त्याचे मुंडके तोडून २०१४ साली त्याचा खुन केला. साकुरीतील एका हॉटेलमध्ये जेवनाचे बील मागीतले म्हणुन त्याने त्याठिकाणी गोळीबार केला होता. रेशनचे धान्य वाहतूक व्यवसाय करणारे विजय बोबडे यांना रिव्हॉल्वहर लावून त्यांच्याकडून १० लाख रुपये लुटले. त्याचा दि.१३ सप्टेबर २०२ ५ रोजी त्याने संगमनेर तालुक्यातील अनिल आहेर यांच्यावर जीवे मारण्याच्या उद्देशाने धारदार शस्त्राने वार केला. . या गुन्ह्यात अद्याप पर्यंत त्याला अटक केलेली नाही. ४ महिन्यापुर्वीच्या या खुनी हल्ल्यामध्ये पोलिसांनी दीपक पोकळेला जर अटक केली असती तर शिर्डीतील सचिन गिधे या तरुणाचे प्राण वाचले असते. १० डिसेंबर रोजी शिर्डी येथुन आरोपी दीपक पोकळे याने सचिन गिधे या तरुणाचे अपहरण करून टायर व डिजेलच्या सहाय्याने जाळून टाकले.

पोकळे या गुंडाने आता पर्यंत हजारो साईभक्तांच्या गाड्या लुटल्या परंतु त्यापैकी ठरावीकच गुन्हे लुटल्याचे दाखल आहेत. त्याचे विरुद्ध मोक्का,खुन,खुनाचा प्रयत्न,दरोडा,जबरी चोरी,गाड्या लुटणे,घरफोड्या करणे,हप्ते गोळा करणे,अवैध वाळू उपसा करणे असे गुन्हे दाखल आहेत.फिर्यादीला जीवे मारण्याच्या धमक्या देवुन तो फिर्यादीही मागे घ्यायला लावतो अशी त्याची गुंडगिरीची पद्धत आहे. संगमनेर तालुक्यात ४ महिन्यापूर्वी जो त्याचे खुनी हल्ला केला त्यात त्याला पोलिसांनी वेळीच अटक केली असती तर शिर्डीतील तरुणाची निर्घृणपणे जी हत्या केली हा प्रकार टळला असता. तरी राहाता-शिर्डी परिसर हादरवून टाकणार्या अपहरण व हत्याकांडाचा अखेर पर्दाफाश झाला असून सचिन कल्याणराव गिधे याचा निर्घृण खून करण्यात आल्याचे उघडकीस आले आहे.

# संगमनेरला टप्प्याटप्प्याने सर्व पानंद रस्त्यांची कामे होणार : आ. खताळ

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : राज्य शासनाच्यावतीने शेतकऱ्यांच्या हितासाठी सुरू करण्यात आलेल्या मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजनेअंतर्गत संगमनेर तालुक्या तील२२०० रस्त्यांचा समावेश आहे. परंतु विधान सभा मतदारसंघात टप्प्याटप्प्याने सर्व पाणंद रस्ते तयार करण्यात येणार आहे या पानंद रस्त्यांच्या बाबतचा सविस्तर आढावा प्रांताधिकारी यांच्या कार्यालयातील कॉन्फरन्स हॉलमध्ये घेण्यातआलेल्या बैठकीत आमदार अमोल खताळ यांनी अधिकाऱ्यां कडून घेतला येथील प्रांतधिकारी कार्यालयाच्या सभागृहात शुक्रवार( दि. १६) रोजी दुपारी आमदार अमोल खताळ यांच्या उपस्थिती बैठक आयोजित केली होती.



यावेळी प्रांताधिकारी अरुण उंडे, पोलीस उपाधीक्षक डॉ. कुणाल सोनवणे, तहसीलदार धीरज मांजरे, सहाय्यक गटविकास अधिकारी राजेंद्र ठाकूर, वनपरिक्षेत्र अधिकारी सागर केदार, विशाल ताम्हाणे यांसह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. आ.खताळ म्हणाले की शेतकर्यांना शेतीमालाची ने-आण, शेती उपयोगी अवजारे वाहतूक तसेच दळणवळणा साठी आवश्यक असलेले पाणंद रस्ते मुख्यमंत्री बळीराजा पानंद रस्ते या योजनेच्या माध्यमातून विकसित करण्यात येणार आहेत.या योजनेमुळे शेतकऱ्यांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या रस्त्यांच्या समस्या दूर होणार आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्य मंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे तसेच पालक मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली एका राज्यस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीचे अध्यक्ष त्या त्या विधानसभा मतदारसंघाचे आमदार आहेत तर मानद सचिव म्हणून प्रांताधिकारी काम पाहणार आहेत.

संगमनेर तालुक्यातील जवळजवळ २२०० रस्त्यांचा या योजनेमध्ये समावेश आहे तसेच संगमनेर विधान सभा मतदारसंघातील कमी जास्त करत १७०० ते १८०० पाणंद रस्ते तयार करण्यात येणार असून या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या शेतात जाणाऱ्या पाणंद रस्त्यांचे मजबुतीकरण करण्यासाठी समिती च्या माध्यमातून टप्प्याटप्प्याने निधी दिला जाणार आहे., पहिल्या टप्प्यात २५ किलोमीटर लांबीचे रस्ते घेण्यात येणार आहे. पूर्वी शेतकऱ्यांना शेती रस्त्यांमुळे ज्या अडचणींचा सामना करावा लागत होता, त्या समस्या या योजनेमुळे दूर होतील. असेही आ अमोल खताळ यांनी सांगितल.

> शेतात जाण्यासाठी पाणंद रस्ते तयार करताना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी पोलीस बंदोबस्त निशुल्क उपलब्ध करून दिलाजाणार आहे. ही सर्व कामे जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागामार्फत करण्यात येणार असून, रस्त्यांसाठी लागणारे गौण खनिजही शासनाकडून मोफत उपलब्ध करून दिले जाणार आहे. तसेच भूमी अभिलेख विभागामार्फत पाणंद रस्त्यांची तात्काळ मोजणी केली जाईल, या रस्त्यांमुळे शेतकरी वर्गाला मोठा दिलासा मिळणारअसून शेती विकासाला चालना मिळेल,
>
> **अमोल खताळ, आमदार संगमनेर विधानसभा**

# गौतम पब्लिक स्कूलमध्ये ‘खरी कमाई महोत्सव’



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी प्रतिनिधी** : विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबन, उद्योजक वृत्ती आणि प्रामाणिक कष्टातून मिळणाऱ्या कमाईचे महत्त्व रुजवण्याच्या उद्देशाने कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटीद्वारा संचालित गौतम पब्लिक स्कूल, कोळपेवाडी येथे अहिल्यानगर जिल्हा स्काऊट कार्यालयाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या खरी कमाई तीन दिवसीय महोत्सवाचा शुभारंभ मंगळवार (दि.१३) रोजी शाळेचे प्राचार्य नूर शेख यांच्या हस्ते माईज गार्डन येथे करण्यात आला. गौतम पब्लिक स्कूलच्या स्काऊट पथकाचे नाव महाराणा प्रताप तर गाईडचे पथकाचे कल्पना चावला होते. स्काऊट पथकांनी हस्तकला साहित्य, सजावटीच्या वस्तू, खाद्यपदार्थ तसेच पर्यावरणपूरक वस्तू तयार करून त्यांचे आकर्षक स्टॉल मंगळवार पासून गुरुवार पर्यंत उभारले होते.

प्रत्येक स्टॉलवर पथकांनी स्वतः ग्राहक असलेल्या शिक्षक व पालकांशी संवाद साधत वस्तूंची माहिती दिली आणि व्यवहार केला. उपक्रमातून विद्यार्थ्यांना व्यवसाय नियोजन, खर्च-नफा हिशोब, ग्राहक सेवा, वेळेचे नियोजन आणि संघभावना यांचे प्रत्यक्ष ज्ञान मिळाले. केवळ पुस्तकी शिक्षण न राहता प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी खरी कमाई महोत्सवामुळे पथकांना मिळाली. खरी कमाई ही प्रामाणिक मेहनत, कौशल्य आणि सातत्यातूनच मिळते. लहान वयातच स्वावलंबनाची सवय लागल्यास विद्यार्थी भविष्यात आत्मविश्वासाने उभे राहू शकतात असे प्राचार्य नूर शेख यांनी सांगितले.

खरी कमाई सोबतच स्काऊट पथक महाराणा प्रताप व गाईड पथक कल्पना चावला यांनी महोत्सवाच्या कालावधीमध्ये शाळेच्या सुमारे शंभर एकर परिसरात स्वच्छता अभियान राबवून स्वच्छ भारत सुंदर भारत ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवली. यामध्ये माईज गार्डनमधील गुलाब बागेची साफसफाई तसेच गुलाबाच्या झाडांना पाणी देण्याचे उपक्रम विद्यार्थ्यांनी राबवले. स्काऊट, गाईड पथकांमुळे खऱ्या अर्थाने माईज गार्डन हे बहरलेले आहे.

महोत्सवात पथकांची मेहनत व परिश्रम बघून खूप कौतुक वाटते अशा शब्दांमध्ये प्राचार्य नूर शेख यांनी पथकांचे कौतुक केले. यावेळी खरी कमाई करणाऱ्या पथकांचा प्राचार्य नूर शेख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. स्काऊट पथकांना स्काऊट इन्चार्ज नसिर पठाण व सोपान गांगुर्डे यांचे, तर गाईड पथकाला गाईड इन्चार्ज सुनीता शिंदे व कविता चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे चेअरमन मा.आ. अशोकराव काळे, विश्वस्त आ.आशुतोष काळे,सचिव सौ.चैतालीताई काळे यांनी सर्व स्काऊट-गाईड विद्यार्थी व त्यांच्या शिक्षकांचे अभिनंदन आणि कौतुक केले आहे.

# वाहतुकीस अडथळा करणाऱ्या बससह अनेक बेशिस्त वाहनांवर कारवाई



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : नगर मनमाड महामार्ग हा सध्या भारताच्या नकाशावर मोठ्या प्रमाणात झळकत असून राहुरी शहरातून जाणाऱ्या नगर-मनमाड महामार्गावरील वाहतूक कोंडीस राहुरीकर अक्षरशः वैतागले असून राहुरी मध्ये वाहतूक कोंडी ही नित्याची झाली असून व त्यामध्ये रस्त्याचे झालेले हाल व या रस्त्यावर अनेक निरपराधांचा बळी गेलेला असून प्रवाशांचे अतिशय हाल होत आहेत. यामध्ये चुकीच्या दिशेने वाहने घालून वाहतुकीस मोठ्या प्रमाणात अडथळा करणाऱ्या वाहनांना पायबंद घालण्यासाठी राहुरी पोलीस रस्त्यावर उतरले असून त्यांनी अनेक वाहनांवर दंडात्मक कारवाई केली आहे. परंतु विशेष म्हणजे महाराष्ट्र शासनाच्या महामंडळाच्या बस चालक सुद्धा नियम मोडून चुकीच्या दिशेने वाहन घालताना दिसत असून या बस वर सुद्धा राहुरी चे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी दंडात्मक कारवाई करून त्यांना कारवाईचा बडगा दाखविला आहे. वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या चुकीच्या दिशेने धावणाऱ्या वाहनांवर काल शुक्रवारी राहुरी पोलिसांनी कडक कारवाई केली.

या कारवाईत चुकीच्या दिशेने धावणाऱ्या ४ बससह इतर २८ अशी एकूण ३२ वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून, वाहनचालकांकडून एकूण २२ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला. तसेच संबंधित बेशिस्त वाहन चालकांना भविष्यात नियमांचे पालन करण्याची समज देण्यात आली आहे. नगर-मनमाड राज्य मार्गावर सध्या रस्त्याचे काम सुरू असल्याने राहुरी ते राहुरी फॅक्टरी दरम्यान वाहतूक कोंडी नित्याची झाली आहे. या पार्श्वभूमीवर राहुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली बेशिस्त वाहनचालकांविरोधात ही मोहीम राबविण्यात आली. पोलीस रस्त्यावर तैनात असल्याने वाहनांच्या वेगावरही आपोआप नियंत्रण आले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून या राज्य मार्गावर वारंवार होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे प्रवाशांना मोठ्या मनस्तापाला सामोरे जावे लागत आहे. रस्त्यावरून चालताना नागरिकांना मोठी कसरत करावी लागत असून प्रवाशांना तासंतास एकाच जागेवर वाहने उभी करून थांबावे लागत आहे त्यामुळे राहुरी विद्यापीठ राहुरी कारखाना या परिसरात मोठ्या प्रमाणात वाहतुकीची कोंडी होत आहे. त्या बेशिस्त वाहनधारकांच्या विरोधात राहुरी पोलिसांनी मोहीम उघडली आहे.


## जाहीर निविदा

### ग्रामपंचायत घारी, ता. कोपरगाव जि .अहिल्यानगर

ग्रामपंचायत घारी ता. कोपरगाव जि. अहिल्यानगर येथील कामाचे सन २०२५/२६ साठी नोंदणीकृत, ठेकेदार ,पुरवठादार यांच्याकडून सीलबंद निविदा मागवण्यात येत आहे.

| अ क्र. | योजनेचे नाव | कामाचे नाव | अंदाजपत्रकिय रक्कम | निविदा रक्कम | कामाचा कालावधी | निविदा फॉर्म | ठेकेदाराचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १५ वा वित्त आयोग | हनुमान मंदिर परिसरात पेव्हिंग ब्लॉक बसविणे | २६३३६३ | २२०३८७ | ३ महिने | ३०० रू. | मजुर संस्था |
| २ | १५ वा वित्त आयोग | सार्वजनिक परिसर (आदीवासी स्मशानभूमी) स्वच्छता व अनुशंगिक कामे अंतगर्त स्मशानभूमीत तार कंपाऊंड करणे | २४८६५४ | २०८०८७ | ३ महिने | ३०० रू. | मजुर संस्था |
| ३ | १५ वा वित्त आयोग | जी प शाळा सभा स्टेज बांधकाम करणे | १३४७१८ | ११२७३४ | ३ महिने | ३०० रू. | सु.बे |

**अटी व शर्ती** :- १) निविदा फार्म माहितीपत्रक दि.१७/१/२०२६ते २२/१/२०२६ या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालयीन वेळेत मिळतील. २) बी १ निविदा दि. २३/१/२०२६ रोजी स ११ वा उघडण्यात येईल. ३) निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

**ग्रामपंचायत अधिकारी सरपंच**
**घारी, ग्रामपंचायत ता कोपरगाव.**


# हिवाळी शिबिरातून विद्यार्थ्यांमध्ये श्रमसंस्कारांची जोपासना

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लोणी** : समाजाचे काहीतरी देणे लागतो या भावनेतून काम करत असताना श्रम संस्काराबरोबरच आपले आरोग्य ही जपा हा संदेश देत लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील प्रवरा ग्रामीण औषध निर्माणशास्त्र महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर दुर्गापूर या ठिकाणी सुरू आहे शिबिराच्या माध्यमातून आरोग्याबरोबरच पर्यावरण संवर्धन शिक्षण आणि स्वच्छता याचाही संदेश स्वयंसेवकांच्या माध्यमातून दिला जात आहे.

प्रवरा ग्रामीण औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, लोणी यांच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर सुरु आहे. शिबिराचा शुभारंभ लोकनियुक्त सरपंच नानासाहेब पुलाटे, ट्रक वाहतूक संस्थेचे उपाध्यक्ष सुनील जाधव, उपसरपंच सुशीला पुलाटे, पोलीस पाटील दिलीप पुलाटे, महात्मा गांधी तंटामुक्त समितीचे अध्यक्ष मच्छिंद्र जाधव, नबाजी रोकडे,कअरविंद रोकडे, प्राचार्य डॉ. के. मंगाथायारू,डॉ. संजय भवर, अरविंद रोकडे आदी उपस्थित होते.

विद्यार्थी पाणी व्यवस्थापन,आहार आणि आरोग्य,परसबाग, विविध औषधांचा वापर, ग्रामस्वच्छता, श्रमदान, पर्यावरण संवर्धन, सामाजिक प्रबोधन, पाणी साठवण, प्लास्टिकमुक्त गाव, आरोग्य जनजागृती, वृक्षारोपण, सांस्कृतिक कार्यक्रम आदी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. विद्यार्थी श्रमदानातून गावातील रस्ते, परिसर व सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता येणाऱ्या ७ दिवसांत करणार आहेत. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी, प्राध्यापकवर्ग, कर्मचारी व स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. शुभम म्हस्के यांनी करत ते सेवा योजनेच्या माध्यमातून सुरू असलेल्या विविध उपक्रमाची माहिती त्यांनी दिली. सूत्रसंचालन डॉ. मयूर भोसले आणि शुभम मनकर यांनी तर आभार प्रा. वर्षा पाटोळे यांनी मानले.


## जाहीर नोटीस

दि.१७/०१/२०२६

प्रति,
श्री.प्रकाश विलास पवार ऊर्फ प्रेममुनी महानुभाव
वय ४०, धंदा-धर्म प्रसारक,

तमाम लोकांस विशेषतः प्रकाश विलास पवार उर्फ प्रेममुनी महानुभव यांस जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन, मौजे बेलापूर बु, येथील गट नं.१७४/५ श्रेत्र ००हे.८२आर व गट नं.१८०/६ श्रेत्र ००हे. ५३आर हे दोन्ही क्षेत्र श्री चक्रधर महानुभाव आश्रम श्रीरामपूर, यांच्या मालकि वहिवाटीची आहे.

सदर जमिनीबाबत कोर्टात वाद चालू आहेत. सदर जमिनी आश्रमातील भिक्षुक तथा तपस्विनी यांच्या उदर निर्वाहासाठी उत्पन्न वापरले जाते. ते परंपरेने चालत आलेले आहेत. त्या खरेदी खताचा सरम नं.५३९३/२०२५, सरम नं.५३९२/२०२५ असा आहे. ते खरेदी खत बेकायदेशीर असल्याने तथापि ते माझ्या वाचण्यात आल्यानंतर मला कळाले की, ते खोटे आहे. मला फसविले आहे व फसवून माझेकडून लिहून घेतले आहे. प्रकाश विलास पवार ऊर्फ प्रेममुनी महानुभव याने खोटारडेपणा केला आहे. या खरेदी दस्ताच्या आधारे प्रकाश विलास पवार यांच्याशी कोणीही कोणताही व्यवहार करू नये. असे खरेदी खत मी लिहून दिले नाही व तसा मला अधिकार नाही. ती मिळकत महानुभाव पंथाच्या आश्रमाची आहे. ती विकण्याचा अधिकार कोणालाही नसतो. माझी पोकळीस्त नोंद होती. त्या नोंदीचा गैरवापर प्रकाश विलास पवार ऊर्फ प्रेममुनी महानुभाव याने घेतला व खोटा खरेदीचा दस्त लिहून घेतला. दस्त वाचून न दाखविता त्यावर माझी फसवून सही घेतली. तरी त्या खरेदी खतावर कोणी विश्वास ठेवू नये. खरेदी खतात नमूद केलेल्या मिळकतीची मी कधीही मालक नव्हती व मला कधीही प्रकाश विलास पवार यांच्याकडून खरेदी पोटी पैसे मिळालेले नाही. ते खरेदी खत बेकायदेशीर असल्याने रेव्हिनी कोर्टाने प्रकाश विलास पवार उर्फ प्रेममुनी महानुभाव यांची नोंद रद्द केली आहे. पूर्वीपासून मिळकती आश्रमाचे व महंतांच्या ताब्यात आहे. त्यामुळे ते खरेदी खत खोटे असल्याने मी ते रद्द केले आहे. याची नोंद घ्यावी.

नोटीस देणार-
सुदेशबाई गुरु बालेराज शास्त्री आराध्ये
वय ९२ धंदा-धर्मप्रसारक
रा.श्री चक्रधर महानुभाव आश्रम व शिक्षण संस्था
बेलापूर रोड वॉर्ड नं.७, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर

सही/-
सुदेशबाई गुरु बालेराज शास्त्री आराध्ये



## जाहीर प्रकटन

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळिवणेत येते की.,

Mahindra & Mahindra Ltd. कंपनीचा Agriculture Tractor आर टी ओ रजिस्ट्रेशन नं MH-17-CX-0754, यांसी वेसीज व इंजिन आर सी बुक प्रमाणे असुन, वर नमुद ट्रॅक्टर हा मयत विकेश बाळासाहेब कहांडळ यांचे नावावर नोंदणीकृत आहे. विकेश बाळासाहेब कहांडळ हे दि.०८/१०/२०२४ रोजी मयत झालेले आहे.

वर नमुद ट्रॅक्टर यास मयताची पत्नी सविता विकेश कहांडळ या पत्नी या नात्याने कायदेशिर वारस आहे. त्यांनी सदर टॅक्टर हा कोणाचेही नावावर होवू नये याकरीता श्रीरामपूर येथील मे. दिवाणी न्यायाधिश साहेब क. स्तर यांचे कोर्टात रे.मु. नं. २०५/२०२५ चा दाखल केलेला आहे. दरम्यानचे काळात कै. विकेश बाळासाहेब कहांडळ यांचे वडिल व मयताची पत्नी सविता विकेश कहांडळ यांचेत आपआपसांत तडजोड करारनामा होवून एकत्रीत कुटुंबांचे उत्पन्नातुन घेतलेला ट्रॅक्टर हा बाळासाहेब जगन्नाथ कहांडळ यांचे नावे करण्याबाबत तडजोड होवून दावा निकाली काढणार आहेत, तसेच सविता विकेश कहांडळ हिने उपप्रादेशीक परिवहन कार्यालय श्रीरामपूर येथे ट्रॅक्टर हा कोणाचे नावे होवू नये म्हणुन ब्लॅक लिस्ट केलेला आहे. सदरची तक्रार ती स्वतः राजीखुशीने मागे घेणार आहे. त्यामुळे सदरचा ट्रॅक्टर हा मयताचे वडिल बाळासाहेब जगन्नाथ कहांडळ वडिल या नात्याने त्यांचे नावावर वारसा हक्काने होवून मिळणेसाठी उपप्रादेशीक परिवहन कार्यालय श्रीरामपूर येथे प्रकरण दाखल केलेले आहे.

सदर वर नमुद वाहन हे मयत विकेश बाळासाहेब कहांडळ यांचे वडिल बाळासाहेब जगन्नाथ कहांडळ यांचे नावे होण्याकरीता कोणाचाही कसलाही वाद असल्यास अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशिर हक्क व हितसंबंध असल्यास सबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्याचे दिनांका पासुन ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्यावर समक्ष मुळ कागदपत्रासह आमची खात्री करून दयावी. दिलेल्या मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास ज्यांचे कोणतेही, कसलेही हक हितसंबंध असल्यास त्यांनी ते जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत असे समजुन वर नमुद ट्रॅक्टर हा आमचे अशिल बाळासाहेब जगन्नाथ कहांडळ यांचे नावे उपप्रादेशीक परिवहन कार्यालय श्रीरामपूर रेकॉर्डला होवून जाईल. त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी येणेप्रमाणे जाहीर नोटीस दिली असे.

श्रीरामपूर
दि.१६/०१/२०२६

**ॲड. एस. पी. घोरपडे,**
**ऑफिस नं. ४९, मिनी स्टेडीयम,**
**नविन कोर्टा जवळ, वॉर्ड नं. १,**
**ता. श्रीरामपूर, जि. अहमदनगर**
**मो. न. ९७३०६४४१८२**



## जाहीर प्रकटन

क्रमांक / कावि / दंडव्य / हस्ते / २०२५
श्रीरामपूर दिनांक २६/१२/२०२५

ज्याअर्थी श्री./ श्रीम- मोहमद अकील शेख सुन्ना रा. श्रीरामपुर, ता. श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर यांचे कडील दिनांक ०१/१०/२०२५ रोजीचा अर्ज प्राप्त झालेला आहे. सदर अर्जदार यांनी आपल्या अर्जामध्ये नमुद केले आहे की अर्जदार यांची आई नामे हलीमाबी सुन्नाभाई शेख या दिनांक ०४/०६/१९६४ रोजी मौजे श्रीरामपुर, ता. श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर येथे राहाते घरी प्रसुत होऊन अर्जदार नामे ‘‘अकिल’’ यास जन्म दिला आहे. सदर अर्जदार यांचे जन्माची नोंद त्यांना जन्म मृत्यु कार्यालयात मिळुन आलेली नाही. त्यामुळे त्यांनी सदर जन्माची नोंद सरकारी दप्तरी लावण्यासाठी दिनांक ०१/१०/२०२५ रोजी प्रतिज्ञापत्र करुन दिले आहे.

उपरोक्त या जाहीर प्रगटना व्दारे तमाम जनतेला सुचित करण्यात येते की, वरील जन्माचे दाखल्याबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रासह आक्षेप लेखी स्वरूपात या जाहीर प्रगटनाच्या तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबंधित जन्माचा दाखला निर्गमित करण्यात येईल.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार श्रीरामपुर करीता**

## पान १ वरुन

### संग्रामभैय्या, सुजयदादांनी एकतर्फी गड जिंकला!

महाविकास आघाडी (एमव्हीए) आणि इतर विरोधी पक्षांना या निकालाने मोठा धक्का बसला. त्यांचा कमकुवतपणा मतदानाने सिद्ध केला. काँग्रेस आणि शिवसेना (उद्धव गट) मोठ्या नामुष्कीला सामोरे जावे लागले. महायुतीने शहरातील रस्ते, उद्याने, सुशोभीकरण, पाणीपुरवठा अशा विकासाच्या मुद्द्यांवर जोर दिला, ज्याने मतदारांमध्ये सकारात्मक प्रभाव पाडला.

एकंदरीत, ही निवडणूक महायुतीच्या एकजुटी आणि स्थानिक नेत्यांच्या प्रभावी नेतृत्वाची यशोगाथा ठरली आहे. अहिल्यानगरच्या विकासाला आता नवी गती मिळणार, असा विश्वास व्यक्त होत आहे!

### डीपीवर काम करताना कंत्राटी कर्मचाऱ्यांचा मृत्यू

जमावाची समजूत काढून गुन्हा दाखल करण्याचे आश्वासन दिले.या नंतर जमाव शांत झाला.दरम्यान घटना घडली तेव्हा परमिट घेतलेले होते.तरीही विद्युत प्रवाह आला कसा असा प्रश्न उपस्थित होत आहे.तर हा विद्युत प्रवाह जनरेटर मधून रिटर्न सप्लाय आला असावा अशी चर्चा सुरू होती यावर नातेवाईक व गावकऱ्यांनी ही चूक अधिकाऱ्यांची चूक आहे म्हणून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी केली.

### फडणवीसच धुरंधर...

दिसते. भाजपचे नेते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याला लोकांच्या इच्छेचा विजय म्हटले आहे.

### पुणे, पिंपरी-चिंचवड आणि नागपूरमध्ये भाजपचा दबदबा

पुणे महानगरपालिकेत आणि पिंपरी-चिंचवड मध्येही महायुतीने प्रचंड आघाडी घेतली. पुण्यात मेट्रो, वाहतूक आणि स्वच्छता या मुद्द्यांवर महायुतीने प्रभावी प्रचार केला. नागपूरमध्ये भाजपने १५१ पैकी ३५+ जागांवर सुरुवातीला आघाडी घेतली, तर इतर अनेक महापालिकांमध्ये (नाशिक, ठाणे, छत्रपती संभाजीनगर, अमरावती) भाजप-शिंदे गटाने एकहाती किंवा स्पष्ट बहुमत मिळवले.

ठाणे, कल्याण-डोंबिवली, वसई-विरार यांसारख्या भागातील महापालिकांमध्येही महायुतीचेच वर्चस्व दिसते. काही ठिकाणी अपवादात्मक निकाल आले, पण एकंदरीत भाजपने विरोधकांचा फडशा पाडला असा विश्लेषकांचा निष्कर्ष आहे.

### आशियातील सर्वात श्रीमंत महापालिकेवर भाजपचा झेंडा!

तर दुसरीकडे ठाकरेंचा गड काबीज करण्यासाठी भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेना पूर्ण ताकदीनिशी मैदानात उतरले. अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस स्वतंत्र्य मैदानात उतरली. तर काँग्रेस आणि वंचितने एकत्र निवडणूक लढवली. या सर्व लढाईत भाजपने मुसंडी मारली. ८८ जागा जिंकून भाजप एक नंबर वर राहिले. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने २८ जागा जिंकल्या. त्यामुळे महायुतीची बेरीज सत्तेचा आकडा गाठण्यापर्यंत गेली.

उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला ६५ तर मनसेला सहा जागी यश मिळाले. अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला तीन नगरसेवक निवडून आणता आले. शरद पवारांच्या राष्ट्रवादीला केवळ एक जागा मिळाली तर काँग्रेस व मित्र पक्षांनी २४ जागा जिंकल्या. इतर दहा नगरसेवक विजयी झाले आहेत. एकूणच मुंबईवरची अनेक वर्षांपासून ची एक हाती सत्ता ठाकरे बंधूंना एकत्र आल्यानंतर देखील गमवावी लागली.

# गंगापूर नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षपदी अमोल जगताप

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**गंगापूर** :१६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता गंगापूर नगर परिषदेची पहिली सर्वसाधारण सभा नगर परिषदेच्या सभागृहात पार पडली. या सभेचे अध्यक्षस्थान पीठासीन अधिकारी तथा नगराध्यक्ष संजय विठ्ठलराव जाधव यांनी भूषविले.

या सभेमध्ये नगर परिषदेच्या उपाध्यक्ष पदासाठी निवड प्रक्रिया राबविण्यात आली. उपाध्यक्ष पदासाठी अमोल सुभाषराव जगताप यांचा एकमेव अर्ज प्राप्त झाला होता. या अर्जास सूचक म्हणून फैसल चाऊस, तर अनुमोदक म्हणून संतोष आंबीलवादे होते. अन्य कोणताही अर्ज प्राप्त न झाल्याने पीठासीन अधिकारी तथा नगराध्यक्ष संजय विठ्ठलराव जाधव यांनी अमोल सुभाषराव जगताप यांची गंगापूर नगर परिषदेच्या उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड झाल्याची घोषणा केली.





याच सभेमध्ये नामनिर्देशित (स्वीकृत) सदस्यांची निवड जाहीर करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने गटनेते संतोष आंबीलवादे यांनी सौ. सुवर्णा संजय जाधव यांच्या नावाची शिफारस केली, तर भारतीय जनता पार्टीच्या वतीने गटनेते विजय पानकडे यांनी डॉ. शीतल संदेश गंगवाल यांच्या नावाची शिफारस केली. दोन्ही पक्षांची शिफारस पत्रे वाचून पीठासीन अधिकारी संजय विठ्ठलराव जाधव यांनी सुवर्णा संजय जाधव,डॉ. शीतल संदेश गंगवाल यांची नामनिर्देशित सदस्य म्हणून घोषणा केली.

सभेच्या प्रारंभी नगर परिषदेच्या वतीने मुख्याधिकारी संतोष आगळे यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. शांततेत व नियमानुसार पार पडलेली ही पहिली सर्वसाधारण सभा यशस्वीरीत्या संपन्न झाली.

## निधन वार्ता

### सुमन कडू



**शिरसगाव** : इंदिरानगर येथील सुमन शंकरराव कडू (वय ७६) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांचे मागे एक मुलगा.एक मुलगी,नातवंडे असा परिवार आहे. अशोक एज्युकेशन संस्थेत त्यानी ३७ वर्षे शिक्षिका पदावर काम केले. त्या डॉ सुनीता कडू, सुजित कडू यांच्या त्या मातोश्री होत.

### केशव घोरपडे



**शिराळ चिचोंडी** : पाथर्डी तालुक्यातील शिराळ येथील केशव जगन्नाथ घोरपडे (वय ७५) यांचे नुकतेच निधन झाले. जिल्हा मराठा माध्यमिक शाळा शिराळ घोडेगाव येथे त्यांनी शिक्षक म्हणून अत्यंत शिस्तबद्ध व हुशार म्हणून त्यांनी काम केले.

त्यांच्या पश्चात एक भाऊ एक मुलगा दोन मुली सुनबाई नातवंडे पुतण्या असा मोठ्या परिवार आहे.

## संक्रांतीचा सण पारंपारिक पद्धतीने साजरा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : वर्षातला पहिला सण म्हणजे मकर संक्रात या निमित्ताने दि. १४ जानेवारी रोजी सर्वत्रच मकर संक्रांत साजरी करण्यात आली. राहुरी तालुक्यातील व शहरातील विविध मंदिरात महिलांनी सकाळ पासूनच गर्दी करुन पारंपरिक पद्धतीने मकर संक्रांत मोठ्या उत्साहात साजरी केल्याचे दिसून आले.



मकर संक्रात हा वर्षातला पहिला सण, असे मानले जाते कि, मकर संक्रांतीच्या दिवशी संक्रांती देवीने संकारसूर नावाच्या राक्षसाचा वध केला आणि सर्व लोकांना सुखी केले. त्या दिवशी सूर्य मकर राशीत होता, म्हणून त्या दिवसाला मकर संक्राती असे नाव पडले. राक्षसाचा वध केल्यामुळे वाईट आणि नकारात्मकता दूर झाली. म्हणूनच आपण मकर संक्रांतीच्या दिवशी तीळगुळ घ्या गोड बोला असे म्हणतो. पूर्ण महाराष्ट्रात १४ जानेवारी रोजी मकर संक्रांत सण साजरा केला जातो. राहुरी शहरातील वैजिनाथ मंदिर, टिळेश्वर मंदिर आदि मंदिरात

दि. १४ जानेवारी २०२६ रोजी महिलांनी सकाळ पासूनच गर्दी केली होती. यावेळी नववधु व वयोवृद्ध महिलांनी प्रथम देवाचे पुजन केले. त्यानंतर पारंपारिक पद्धतीने एकमेकिंना हळदी कुंकू, तिळगुळ व वाणाचे अदान प्रदान करून एकमेकिंना संक्रातीच्या शुभेच्छा दिल्या. लहान्यांनी मोठ्यांकडून तिळगूळ घेऊन आर्शिवाद घेतले. तसेच बाल गोपाल व तरुणांनी डिजेवर गाणे लावून नाच करत दिवसभर पतंग उडवण्याचा आनंद लुटला. एकंदरीत काल मकर संक्रात हा सण सर्वत्रच मोठ्या आनंदात व उत्साहात साजरा केल्याचे दिसून आले.

## औताडे यांची बदनामी ही राजकीय युक्ती : सिताराम जावळे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव** : सावळिविहीर–पोहेगाव–सोनेवाडी रस्त्याचे काम जाणूनबुजून रखडत असल्याचा आरोप करीत विरोधक राजकारण करत असल्याची टीका कोपरगाव तालुका शेतकरी सेनेचे तालुकाप्रमुख सिताराम जावळे यांनी केली आहे. औताडे यांनी व्यवसायाचे कधीच समाजकारण किंवा राजकारण केले नाही. जिल्हा परिषद निवडणूक डोळ्यासमोर ठेवून विरोधकांनी बदनामीचे षडयंत्र उभारले आहे, असे त्यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे स्पष्ट केले.



जावळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित रस्त्याचे काम दोन वर्षांपूर्वी महायुती सरकारने मंजूर केले असून कंत्राट नितीन औताडे यांना मिळाले आहे. मात्र मागील दोन वर्षांपासून शासकीय निधी अपुरा मिळाल्यामुळे तसेच मे ते नोव्हेंबर २०२५ दरम्यान पावसामुळे अनेक विकासकामे ठप्प होती. महाराष्ट्रातील बहुतेक ठेकेदारांची कामे निधीअभावी बंद होती व बिलांच्या मंजुरीसाठी आंदोलनेही झाली होती. डिसेंबर २०२५ पासून शासनाने बिलांची देयके सोडवल्यानंतर पुन्हा कामे सुरू झाली असून उक्त रस्त्याचे कामही लवकरच सुरू होणार आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

औताडे हे व्यावसायिक अभियंता असून दर्जेदार व वेळेत काम ही त्यांची ओळख असल्याचे जावळे म्हणाले. सोनेवाडी परिसरातील नागरिकांना याची प्रत्यक्ष जाणीव असल्याचेही त्यांनी नमूद केले. विरोधकांनी केलेल्या कामांचा दर्जाही तपासावा, असे आव्हान त्यांनी केले.

पुढे बोलताना जावळे म्हणाले, देवस्थानच्या आडून राजकारण करू नये. पोहेगाव ग्रामपंचायतला ३० वर्षे औताडे यांच्या नेतृत्वाखाली विकासाचा वेग मिळाला. जिल्ह्यातही यशस्वी ग्रामपंचायत म्हणून पोहेगावची ओळख आहे. मयुरेश्वर गणपती मंदिराच्या ट्रस्ट स्थापनेपासून मंदिरातील पाणी व वीज व्यवस्था औताडे कुटुंबाने लोकवर्गणीतून केली असल्याचे त्यांनी सांगितले.

कोपरगाव नगरपालिकेतील पराभवानंतर जिल्हा परिषदेतील पराभव टाळण्यासाठी विरोधक मुद्दाम बदनामीची खेळी खेळत आहेत. मात्र रस्त्याचे उत्कृष्ट काम लवकरच सुरू होणार आहे, असा विश्वासही जावळे यांनी व्यक्त केला.

## लाखो कष्टकऱ्यांचा 'गुंठेवारी' लढा तापला ; प्रशासनाला अंतिम जाब

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**गंगापूर** : आशियातील सर्वात मोठ्या औद्योगिक वसाहतींपैकी एक मानल्या जाणाऱ्या वाळूज औद्योगिक परिसरातील रांजणगाव, जोगेश्वरी, विटावा आणि कमळापूर या भागांमध्ये राहणाऱ्या लाखो कष्टकऱ्यांच्या घरांच्या नियमितीकरणाचा प्रश्न पुन्हा एकदा चांगलाच तापलेला दिसत आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या 'गुंठेवारी नियमितीकरणा'च्या मुद्द्यावरून राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष कृष्णा मच्छिंद्रनाथ लोहकरे यांनी थेट मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना पत्र लिहून प्रशासकीय दिरंगाईबद्दल अंतिम जाब विचारला आहे. जिल्हा परिषद निवडणुकांच्या तोंडावर हा विषय ऐरणीवर आल्याने परिसरात राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय पातळीवर मोठेच हालचाली सुरू झाल्या आहेत.

**संबंधित विभागाला चौकशीचे आदेश...**

''हा केवळ कागदाचा तुकडा नसून लाखो कामगारांच्या अस्तित्वाचा लढा आहे. जोपर्यंत सामान्य नागरिकाला त्याच्या हक्काच्या घराचे मालकी हक्क मिळत नाहीत, तोपर्यंत आमचा संघर्ष थांबणार नाही.''
- कृष्णा मच्छिंद्रनाथ लोहकरे, जिल्हा उपाध्यक्ष, राष्ट्रवादी युवक काँग्रेस.

वाळूज महानगरात मोठ्या प्रमाणावर कामगार आणि निम्न उत्पन्न गटातील नागरिक राहत असून त्यांच्या घरांच्या जमिनी सरकारी नोंदींमध्ये आजही 'ग्रीन झोन' म्हणजेच कृषी क्षेत्र म्हणून दाखवल्या आहेत. प्रत्यक्षात त्या भागात शेतीचे अस्तित्व उरले नसून मोठ्या प्रमाणावर निवासी घरे आणि व्यापारी बांधकामे झाले आहेत. 'सिमेंटची जंगले' उभ्या राहिलेल्या या भागात शासन आणि प्रशासनाने अद्याप एम आर टी पी ॲक्ट च्या कलम ३७नुसार 'यलो झोन' म्हणजेच रहिवासी क्षेत्र घोषित करण्याची प्रक्रिया केलेली नाही. त्यामुळे या नागरिकांची हजारो घरे आजही कागदोपत्री 'अनधिकृत' ठरत असून त्यांना पाणी, रस्ते, ड्रेनेज यांसारख्या नागरी मूलभूत सुविधांपासून वंचित राहावे लागत आहे.

कृष्णा लोहकरे यांनी पत्राद्वारे सरकारला कठोर शब्दांत जाब विचारताना वाळूजला एका बाजूने 'औद्योगिक महानगर' अशी ओळख देताना दुसरीकडे नागरिकांच्या घरांना 'अनधिकृत' म्हणण्याची शासनाची दुटप्पी भूमिका अन्यायकारक असल्याचे म्हटले आहे. गुंठेवारी अधिनियम २०२१ लागू होऊनही वाळूज परिसरात आजतागायत विशेष नियमितीकरण मोहीम न राबवणे ही प्रशासकीय निष्क्रियतेची पराकाष्ठा असल्याचा आरोप त्यांनी केला.

दरम्यान, जिल्हा परिषद निवडणुकांची चाहूल लागलेली असताना, हा प्रश्न ऐरणीवर आल्याने मतदारांमध्ये प्रशासनाविषयी मोठा रोष निर्माण झालेला दिसत आहे. कष्टकऱ्यांच्या रक्तामासातून उभी राहिलेली ही घरे जर सरकारने नियमित केली नाहीत, तर संघर्ष अपरिहार्य ठरेल, असा इशारा लोहकरे यांनी दिला असून, केवळ नमुना ८ किंवा नोटरी यावर अवलंबून न राहता प्रत्येक नागरिकास अधिकृत मालमत्ता पत्रक मिळाले पाहिजे, ही मागणी त्यांनी ठामपणे मांडली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री कार्यालयाने या पत्राची दखल घेत संबंधित विभागाला प्राथमिक चौकशीचे आदेश दिले आहेत, त्यामुळे पुढील काही दिवसांत या प्रश्नावर लक्षणीय हालचाल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.


### नांवात बदल

माझे जुने नांव रोहित राजू कोळगे (KOLAGE)( दहावी मार्कशीट व प्रमाणपत्रावरील नाव) असे असून माझे खरे नविन नांव रोहित राजू कोळगे (KOLGE)( माझे जन्माचा दाखला व आधार कार्ड वरील नांव) असे आहे. दोन्हीही नांवाची व्यक्ती मी स्वतः एकच असून अन्य दुसरी कोणतीही व्यक्ती नाही .

प्रतिज्ञापत्र क्र.
२५५२२४२०४१२६८१००६५०२३४
दिनांक १६/०१/२०२६


## गळफास घेत तरुणाची आत्महत्या

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव शहर** : शहरातील गोरोबानगर येथील युवकाने घरात छताला दोरी बांधून आत्महत्या केल्याची घटना शुक्रवार दि. १६ जानेवारी रोजी सकाळी घडली.



आदित्य ज्ञानेश्वर पवार (वय १७) असे आत्महत्या केलेल्या युवकाचे नाव आहे. घरातील इतर सदस्य घराबाहेर गेलेले असताना. आदित्य हा घरात एकटाच होता. त्याने छताला दोरी बांधून गळफास घेतला. काही वेळातच ही घटना उघड झाली. आत्महत्येचे कारण अद्याप समजु शकले नाही. घटनास्थळी पोहोचल्यानंतर पोलिसांनी पंचनामा केला. आदित्यचा मृतदेह शवविच्छेदानासाठी कोपरगाव ग्रामीण रूग्णालयात पाठविण्यात आला होता. आदित्यच्या पश्चात आई, वडील, भाऊ, चुलते असा परिवार आहे.

## ऊस तोडणी मुकादमास नुकसान भरपाई व सहा महिन्यांची कैद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : कारेगाव भाग शुगर केन ट्रान्सपोर्ट कंपनीस दिलेला धनादेश न वटल्याप्रकरणी ऊसतोडणी कंत्राटदार संतोष उत्तम बोर्डे यास सहा महिन्यांच्या कैदेची शिक्षा आणि कंपनीस ६ लाख ६२ हजार २२८ रुपये नुकसान भरपाई देण्याचे आदेश श्रीरामपूर येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी जितेंद्र डी. जाधव यांनी दिले.

या प्रकरणाची पार्श्वभूमी अशी की, संतोष उत्तम बोर्डे (रा. जेऊर, ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर) याने सन २०११-१२ या गळीत हंगामादरम्यान कारेगाव भाग शुगर केन ट्रान्सपोर्ट कंपनीशी ऊस तोडणी मजूर व वाहतूक यंत्रणा पुरविण्यासाठी करार केला होता. या करारानुसार कंपनीकडून ७ लाख रुपये उचल घेण्यात आली होती.

गळीत हंगामानंतर केलेल्या अंतिम हिशोबात ३ लाख ३१ हजार १२९ रुपये परत देण्याची रक्कम असल्याने बोर्डे यांनी कंपनीस धनादेश दिला. मात्र तो धनादेश न वटल्याने कंपनीच्या वतीने जेठमल बाबुलाल मेहेर यांनी निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टखाली श्रीरामपूर न्यायालयात फिर्याद दाखल केली. सुनावणीनंतर न्यायालयाने कंपनीच्या बाजूने निकाल देत कंत्राटदारास सहा महिन्यांची कैद आणि ६ लाख ६२ हजार २२८ रुपये नुकसान भरपाई देण्याचे आदेश दिले आहेत. ही रक्कम निकालाच्या तारखेपासून एका महिन्यात जमा न केल्यास अतिरिक्त सहा महिन्यांची शिक्षा ठोठावण्यात येईल असेही न्यायालयाने नमूद केले.

या निकालामुळे ऊस तोडणी व वाहतूक कंत्राटदारांकडून घेतलेल्या रकमा परत न मिळण्याचा प्रश्न गंभीर बनला असून कारखान्यांच्या गाळप नियोजनावर याचा विपरीत परिणाम होत असल्याचे उद्योग क्षेत्रातील जाणकारांचे मत आहे. या आदेशामुळे अशा प्रकारच्या कंत्राटदारांवर कायद्याचा धाक निर्माण होण्यास मदत होईल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

या प्रकरणात कारेगाव भाग कंपनीच्या वतीने ॲड. उमेश लटमाळे तसेच ज्ञानेश्वर झिने यांनी काम पाहिले.

## ऑनलाइन प्राध्यापक विकास कार्यक्रमाचा यशस्वी समारोप

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या सिंधू छाया कॅम्पस सिन्नर चिंचोली येथील सर विश्वेश्वरय्या इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, नाशिक येथील रासायनिक अभियांत्रिकी विभागाच्या वतीने एआयसीटीई–अटल अंतर्गत आयोजित सहा दिवसीय ऑनलाइन प्राध्यापक विकास कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न झाला.

संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.सुस्मिता विखे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या
या कार्यक्रमामध्ये देशभरातील विविध अभियांत्रिकी व तांत्रिक संस्थांमधील प्राध्यापकांनी व उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ मान्यवरांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सहा दिवस चाललेल्या या एफडीपीमध्ये संबंधित विषयांवर नामवंत व तज्ज्ञ संसाधन व्यक्तींनी मार्गदर्शन केले. त्यांच्या अभ्यासपूर्ण व सखोल व्याख्यानांमुळे सहभागी प्राध्यापकांना अद्ययावत ज्ञान व व्यावहारिक दृष्टिकोन मिळाला.


### नशिबाची परिक्षा

**शनिवार दि.१७ जानेवारी २०२६**

**मिलनम डे**

उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत

१४० २३० ३०० | ५-८ | १२५ १७० ११६ | जोड ७५-५१-४८-८०-९२

**कल्याण**

उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत

३३० ४८० २२८ | २-४ | १४८ २८० ५३० | जोड ६२-२३-१४-४०-४९

**मुंबई (मेन)**

उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत

१४६ ३२५ ८८० | १-२ | १३८ १२९ ११७ | जोड ७१-१३-६२-२४-३४

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारित आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

### शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 03/11/2025 to 07/11/2025 | 127 04 266 | 259 63 256 | 799 52 679 | 244 00 [illegible] | 490 32 138 |
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 377 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 466 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to [illegible] | 25[illegible] 63 59[illegible] | 34[illegible] 75 34[illegible] | 25[illegible] 71 34[illegible] | 136 05 140 | 12[illegible] 64 69[illegible] |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *


## ३६ व्या वरिष्ठ राष्ट्रीय टेनिस बॉल क्रिकेट अजिक्यपद स्पर्धेसाठी गोवा संघांची घोषणा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पणजी** : नागपूर येथे दि. १९ ते २२ जानेवारी २०२६ दरम्यान होणाऱ्या ३६व्या वरिष्ठ राष्ट्रीय टेनिस बॉल क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धेसाठी गोवा टेनिस बॉल क्रिकेट असोसिएशनने गोवा राज्याच्या पुरुष व महिला संघांची घोषणा केली आहे. या स्पर्धेत देशभरातील सर्वोत्तम संघ सहभागी होणार असून गोवा संघाकडून चमकदार कामगिरीची अपेक्षा आहे.



पुरुष संघाचे नेतृत्व हर्ष गाला करणार असून संघात कन्नय्या गोंदे, विजय हळगेकर, अक्षद नाईक, तनय हरमळकर, प्रतीक नाईक, प्रज्योत नाईक, रंजीत गोसावी, रोहन नाईक, कुंदन गोंदे, वैभव वेलीप, प्रज्योत देसाई, सनीश कुमार, सुशांत सावंत आणि पुनीत खांडेपारकर यांचा समावेश आहे.

महिला संघाचे नेतृत्व दीशा कांबळी करणार असून संघात प्रतीक्षा केरकर, पूर्वा गावडे, कनाक्षा गोंदे, ॲनालिझ गोम्स, लक्ष्मी माजिक, सिद्धी चारी, विभा जल्मी, प्रज्ञा पेडणेकर, फाल्गुली फडते गोंकार, चैत्राली मेस्त्री, राखी गिरी, सोनम रायकर, प्रार्थना बोरकर आणि राई उंटेकर यांची निवड झाली आहे.

दोन्ही संघांचा औपचारिक निरोप समारंभ दि. १५ जानेवारी २०२६ रोजी पोरवोरीम येथील गोवा विधानसभागृहात संपन्न झाला. या वेळी गोवा क्रीडा व युवक व्यवहार मंत्री डॉ. रमेश तवाडकर, जी एफ डी सी चे उपाध्यक्ष धाकू मडकाईकर, क्रीडा संचालक व एसएजीचे कार्यकारी संचालक डॉ. अजय गोंदे, जीटीबीसीए चे सचिव रोपेश नाईक, उद्योगपती चंद्रपाल वर्मा, एस ए जीचे संयुक्त संचालक (लेखा) सर्वोत्कृष्ट सातार्डेकर, डीएसवायए चे एपीईओ राजू पवार, संयोजक विरेंद्र माजिक तसेच प्रशिक्षक व व्यवस्थापक उपस्थित होते.

मान्यवरांनी खेळाडूंना शुभेच्छा देत राष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरीची अपेक्षा व्यक्त केली. निवडलेले संघ दि. १६ जानेवारी रोजी नागपूरकडे रवाना होणार असून दि. २४ जानेवारी २०२६ रोजी गोव्यात परतणार आहेत.

द•ख•ल

## वधू वर सूचक मंडळाचे कार्य कौतुकास्पद : आरोटे

**निघोज** : वधू-वर सूचक मंडळाच्या माध्यमातून समाजासाठी सातत्याने कार्य करणारे राजूकाका देशपांडे यांचे कार्य कौतुकास्पद असल्याचे मत राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेश सचिव डॉ. विश्वास आरोटे यांनी व्यक्त केले. निघोज येथील मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट कार्यालयात देशपांडे यांना मिळालेल्या विविध पुरस्कारांबद्दल आरोटे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. गेल्या आठ-दहा वर्षांत देशपांडे यांनी पाचशेहून अधिक विवाह यशस्वीरीत्या जुळवून समाजात मोलाचे योगदान दिले आहे. डॉ. आरोटे म्हणाले की, आजच्या काळात विवाह जुळवणी अत्यंत जिकिरीची बाब असून याकरिता निस्वार्थी, पारदर्शक मध्यस्थांची गरज आहे. देशपांडे यांनी याच भावनेतून केलेल्या कार्याचा गौरव समाजाकडून पुरस्कृत केला जात आहे. कार्यक्रमाला ट्रस्टचे अध्यक्ष वसंत कवाद, उपाध्यक्ष अमृताशेठ रसाळ, सचिव शांताराम कळसकर, माजी सरपंच ठकारामशेठ लंके आदी उपस्थित होते.

## सावित्री ज्योती महोत्सवाला प्रारंभ बचत गटांच्या वस्तूंचे प्रदर्शन व विक्री

**अहिल्यानगर** : गुलमोहर रोड, सावेडी येथील कोहिनूर मंगल कार्यालयात आज पासून (शनिवार दि.१७ जानेवारी) सावित्री ज्योती महोत्सवाचे प्रारंभ होत असून, नगरकरांनी त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन मुख्य संयोजक तथा जय युवा अकॅडमीचे अध्यक्ष ड. महेश शिंदे यांनी केले आहे. अहिल्यानगर महापालिका, जिल्हा क्रीडा कार्यालय, मेरा युवा भारत, जिल्हा रुग्णालय, अहिल्यानगर बार असोसिएशन, समाजकार्य महाविद्यालय व जिल्हाभरातील स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून बचत गटांचे वस्तूंचे भव्य प्रदर्शन व विक्रीचे आयोजन करण्यात आले आहे. या चार दिवसीय प्रदर्शनात विविध सत्रात पदमश्री पोपट पवार, आमदार संग्राम जगताप, आयुक्त यशवंत डांगे, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे व विविध सत्रात उपस्थित राहणार आहेत. महोत्सवाचे हे दहावे वर्ष असून, या वर्षी मुंबई, नाशिक, पुणे, छत्रपती संभाजी नगर, जळगाव, बीड, हिंगोली, नांदेड, अहिल्यानगर जिल्ह्यातील बचत गट, महिला लघु उद्योगांचे स्टॉल असणार आहेत.

## तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत आदित्य अनापची दणदणीत कामगिरी



**सोनगाव** : महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथील क्रीडांगणावर पार पडलेल्या तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत अनापवाडीच्या आदित्य संतोष अनाप या चौथीतील विद्यार्थ्याने ५० मीटर धावण्याच्या वैयक्तिक क्रीडा प्रकारात तृतीय क्रमांक पटकावून आपली वेगवान क्रीडा क्षमता सिध्द केली. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, अनापवाडीचा हा विद्यार्थी केंद्रस्तरीय प्रथम आलो होता व त्यानंतर तालुकास्तरासाठी पात्र ठरला. तालुक्यातील १४ केंद्रांमधील निवडक धावपटूंमध्ये झालेल्या तीव्र स्पर्धेतही आदित्यने संयम, वेग आणि तंत्राचा प्रभावी मेळ साधत पदक जिंकले. अत्यल्प वयात मिळवलेले हे यश ग्रामीण भागातील सुप्त क्रीडा प्रतिभेचे उदाहरण ठरले आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा श्रीमती पल्लवी सजन, उपाध्यक्ष सुनील माळी, सर्व सदस्य, मुख्याध्यापक तसेच शिक्षकांनी अभिनंदन केले. पालक आणि ग्रामस्थांनीही आनंद व्यक्त केला. या यशामुळे अनापवाडी केंद्राची क्रीडा परंपरा अधिक मजबूत झाली असून ग्रामीण विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळाल्यास ते उच्च स्तरावर चमकू शकतात, असा विश्वास व्यक्त झाला.

## जर्मनीच्या तज्ज्ञ डॉक्टरांचे मोफत प्लास्टिक सर्जरी शिबीर

**शेवगाव** : अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव येथील नित्यसेवा हॉस्पिटलमध्ये इंडो-जर्मन फ्रेंडशिप अंतर्गत जर्मनीतील तज्ज्ञ डॉक्टरांच्या वतीने मोफत प्लास्टिक सर्जरी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. १९ ते २८ जानेवारी २०२६ या कालावधीत होणाऱ्या या शिबिराचा गरजूंनी लाभ घेण्याचे आवाहन शिबीर संयोजक फादर प्रकाश राऊत यांनी केले आहे. या शिबिराची सुरुवात १९ जानेवारीपासून होणार असून २१ जानेवारी रोजी शिबिराचे उद्घाटन केले जाईल. जर्मनीतील सामाजिक कार्यकर्त्या डॉ. पेत्रा कार्कवील या या मोहिमेचे नेतृत्व करत आहेत. या शिबिरात जर्मनीतील तज्ज्ञ डॉक्टरांच्या सोबतीने इंदोर येथील डॉ. प्रकाश छजलानी, डॉ. अमन, हैदराबाद येथील डॉ. सूर्याकुमारी आणि लोणी येथील डॉ. अमोल हे तज्ज्ञ सहभागी होऊन सेवा देणार आहेत. या विशेष शिबिरामध्ये बाल रुग्णांसह जळालेले व भाजलेले रुग्ण, दुभंगलेले ओठ, त्वचेवरील ट्यूमर आणि नाकावरील बाह्य विकृती यावर तज्ज्ञांमार्फत यशस्वी शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत. विशेष म्हणजे, शिबिरासाठी येणाऱ्या रुग्णांना आणि त्यांच्या सोबतच्या नातेवाईकांना १८ ते ३० जानेवारी या कालावधीत मोफत भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. चेहऱ्यावर किंवा शरीरावर कोणतेही व्यंग असणाऱ्या गरजू लाभाथ्यर्थ्यांनी नित्यसेवा हॉस्पिटलशी तात्काळ संपर्क साधून सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन नित्यसेवा हॉस्पिटलचे डॉक्टर्स, सिस्टर्स आणि आरोग्य सेविकांनी केले आहे.

# श्रमसंस्कार शिबारातून गावाचा सर्वांगीण विकास : हर्षदाताई काकडे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव** : महाराष्ट्रातील नव्हे तर भारतातील युवक सोशल मिडियामुळे दिवसेदिवस भरकटत चालला असून एकत्र कुटुंब पद्धती लोप पावत चालली आहे. श्रमसंस्कार शिबिराचे माध्यमातून समाजातील अडीअडचणी युवकांच्या लक्षात येतील. स्वयंसेवकांचा व गावाचा सर्वांगीण विकास शिबिराच्या माध्यमातून होईल. असे प्रतिपादन हर्षदाताई काकडे यांनी बोलताना व्यक्त केले.



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे संचलित कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समुहाचे निर्मलाताई काकडे आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज शेवगाव व राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत मौजे भगूर येथे दि. १६ ते २२ जानेवारी कार्यकाळात शाश्वत विकासासाठी युवक: पाणलोट आणि पडीक जमीन व्यवस्थापन या विषयावर विशेष श्रमसंस्कार शिबिर आयोजित करण्यात आले होते.

या श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन सौ. हर्षदाताई काकडे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी सामाजिक कार्यकर्त्या पूजा दहातोंडे स्नेहालय उडान प्रकल्प अहिल्यानगर), डॉ . हेमंत गांगुर्डे (उच्च शिक्षण विभाग प्रमुख), भगुर गावचे सरपंच मा.वैभव पूरनाळे, उपसरपंच मा.नागेश पुरनाळे, विमल सातपुते, डॉ.मनोज पुरनाळे, मा.मूरदारे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी.ए.दुकळे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे पूजा दहातोंडे बोलताना म्हणाले तरूण वयात संगत गुण किती महत्त्वाचे आहे त्याचबरोबर योग्य संगत असावी तरुण वयात समाजकार्य करावे. मुलींचा बालविवाह झाल्यानंतर मुलीना भविष्यात असंख्य अडचणींचा सामना करावा लागतो त्यासाठी बालविवाह थांबवणे आवश्यक आहे. यासाठी युवकांचा सहभाग महत्वाचा असल्याचे त्यांनी बोलताना सांगितले. डॉ.दुकळे म्हणाले छत्रपती शिवाजीमहाराजाच्या विचारनुसार दूरूदुष्टी ठेऊन समजासाठी काम करावे असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. संतोष निजवे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. सचिन राठोड यांनी केले. तर आभार प्रा.अमोल खोसे यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. पृथ्वीराज कराळे, प्रा. प्रथमेश वावरे, प्रा. दिक्षा सरसे, प्रा. माधुरी पोटफोडे व इतर प्राध्यापक व प्रध्यापाकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व मोठ्या संख्यने स्वयंसेवक सहभागी झाले होते.

## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात जिमखाना डे चे आयोजन



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव** : श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात शुक्रवार, दि. १६ जानेवारी २०२६ रोजी जिमखाना डे कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सुर्यवंशी यांनी केले. त्यांनी महाविद्यालयाच्या उभारणीत शिवाजीराव (बापू) नागवडे यांचे योगदान, तसेच मा. राजेंद्रदादा नागवडे व अनुराधाताई नागवडे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना उपलब्ध होत असलेल्या सुविधा यांचा गौरव केला.

शारीरिक व्यायामाबरोबरच बौद्धिक विकासासाठी खेळ उपयुक्त असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी पुणे विद्यापीठाचे क्रीडा संचालक व शिवछत्रपती पुरस्कार विजेते प्रा. डॉ. सुदाम शेळके होते. त्यांनी विद्यार्थ्यांना संदेश देताना सातत्य व कठोर परिश्रमातूनच यश संपादन होते, तर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रशासकीय व क्रीडा क्षेत्रात महाविद्यालय घडवत असल्याचे कौतुक केले. त्यांनी अभ्यासाबरोबर खेळातील सहभाग अत्यावश्यक असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष सावताजी हिरवे यांनी अध्यक्षीय भाषणात बापू नागवडे यांच्या सहकार, शिक्षण व शेतकरी कल्याणातील कार्याचा उल्लेख केला. कार्यक्रमात विविध स्पर्धांतील विजेत्या विद्यार्थ्यांचा स्मृतिचिन्हे व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. सलाड मेकिंग, रांगोळी, मेहंदी, पाककला स्पर्धा तसेच 'आनंदी बाजार' या उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. कार्यक्रमास विविध मान्यवरांसह प्राध्यापक व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. शंकर गवते तर आभार डॉ. महेश गिरमकर यांनी मानले.

## शालेय विद्यार्थ्यांनी वाहतुकीचे नियम पाळावेत : आरटीओ सुनील मेरुकर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**लिंपणगाव** : शालेय विद्यार्थ्यांनी शाळेत येताना व सुटल्यानंतर परतताना वाहतुकीचे नियम काटेकोर पाळावेत, तसेच अठरा वर्षांखालील मुलांनी दुचाकी किंवा चारचाकी वाहने चालवू नयेत, अन्यथा कायद्याचे उल्लंघन केल्यास दंडात्मक कारवाईसह शिक्षेला सामोरे जावे लागेल, असा इशारा अहिल्यानगरचे आरटीओ सुनील मेरुकर यांनी दिला. श्रीगोंदा तालुक्यातील लोणी व्यंकनाथ येथील श्री व्यंकनाथ विद्यालय व जुनिअर कॉलेजला आरटीओ सुनील मेरुकर यांनी सदिच्छा भेट दिली.

यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी मुक्त संवाद साधत वाहतुकीचे नियम, अटी, अपघातांचे दुष्परिणाम आणि विधीमंडळाच्या तरतुदी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. मेरुकर म्हणाले की, ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी परवाना नसताना वाहन चालवतात. हे कायद्यानुसार गंभीर गुन्ह्यात मोडते. पात्रता नसताना वाहन चालवल्यामुळे अपघाताची शक्यता वाढते आणि अशा प्रकरणांत विद्यार्थ्यांसह पालकांना पाच हजार रुपये दंड तसेच शिक्षेची तरतूद आहे. शाळेत किंवा महाविद्यालयात वाहन घेऊन येणेही नियमबाह्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दंड व कारवाई टाळण्यासाठी अठरा वर्षांखालील विद्यार्थ्यांनी वाहन हातात घेऊ नये, असेही ते म्हणाले. प्राचार्य बाळासाहेब जठार यांनी आरटीओ मेरुकर यांचे स्वागत करताना सांगितले की, मेरुकर हे व्यंकनाथ विद्यालयाचे माजी विद्यार्थी आहेत. ते आज उच्च पदावर पोहोचले आहेत ही विद्यालयासाठी अभिमानाची बाब आहे. विद्यार्थ्यांनीही वाहतुकीचे नियम पाळावेत, अन्यथा त्याचे दुष्परिणाम विद्यार्थी व पालकांना भोगावे लागतात, असे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी रस्त्याच्या कडेने चालायचं गड्या हे गीत सादर करून वाहतुकीची जाणीव दृढ केली. कार्यक्रमास नागवडे कारखान्याचे माजी संचालक विलासराव काकडे, स्कूल कमिटी सदस्य पुरुषोत्तम लगड, मधुकर पवार, मुख्याध्यापक शिवाजीराव गवळी, अनिल जाधव, पत्रकार नंदकुमार कुरुमकर आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन ज्ञानदेव धायगुडे यांनी तर आभार शिक्षक अभिषेक उदमले यांनी मानले.

## कुंभमेळ्यापूर्वीच शिर्डीतील विकासकामे पूर्ण करा : आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : आगामी नाशिक - त्र्यंबकेश्वर कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शिर्डीत येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी सुरू असलेली विकासकामे निर्धारित वेळेत पूर्ण होणे आवश्यक आहे. शिर्डी विमानतळ विस्तारीकरण व रस्त्यांच्या कामांचा वेग वाढवून ती कुंभमेळ्यापूर्वीच पूर्ण करावीत. तसेच, गर्दीचे नियोजन करताना प्रशासकीय सोयीपेक्षा भाविकांसाठीच्या सोयी- सुविधांना सर्वोच्च प्राधान्य द्यावे, अशा सूचना नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा नाशिक विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी आज येथे दिल्या.

आगामी नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळ्याच्या (२०२६-२७) अनुषंगाने शिर्डी-शिंगणापूर येथील भाविकांच्या गर्दी नियोजनाबाबत साईबाबा मंदिर सभागृहात आयोजित आढावा बैठकीत डॉ. गेडाम बोलत होते. यावेळी कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी (जि.प.) आनंद भंडारी, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर आदी उपस्थित होते. श्री.गेडाम म्हणाले, शिर्डी विमानतळ विस्तारीकरणाच्या कामांचा वेग वाढविण्यात येऊन पुढील सहा महिन्यांच्या आत कामे पूर्ण करण्यात यावीत. रेल्वे स्थानकावरील ताण कमी करण्यासाठी 'कोपरगाव पॅटर्न' राबविण्यात यावा. शिर्डी हे टर्मिनस असल्याने गाड्या वळवण्यासाठी वेळ लागतो.

त्यामुळे लांब पल्ल्याच्या गाड्यांना कोपरगावला थांबा देऊन तिथून बसेसद्वारे भाविकांना शिर्डीत आणण्याचे नियोजन करण्यात यावे. शिर्डी-राहाता बायपासच्या कामाचा दर्जा उत्तम राहील, याची अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी. आपण स्वतः या कामाची व साहित्याची पाहणी करणार असून, त्रुटी आढळल्यास काम पुन्हा करण्यास सांगितले जाईल. नगर-मनमाड महामार्गाचे काम डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने करावे.

नाशिकमधील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी व भाविकांचा वेळ वाचवण्यासाठी 'शिर्डी ते त्र्यंबकेश्वर' थेट बस सेवा सुरू करण्यात यावी. तसेच, जड वाहनांमुळे होणारी कोंडी टाळण्यासाठी मनमाडकडून येणारी वाहने 'येवला - वैजापूर - गंगापूर - नेवासा - अहिल्यानगर' या मार्गाने वळवण्यात यावीत. एस.टी. महामंडळातर्फे पर्वणी काळात दररोज ६८० फेऱ्यांचे नियोजन करण्यात आले असल्याचे यावेळी एस.टी महामंडळाचे विभाग नियंत्रक यांनी यावेळी सांगितले.

पार्किंग क्षेत्रातील कचरा उचलण्यासाठी घंटागाड्यांऐवजी ट्रॅक्टरचा वापर करण्याचे निर्देश विभागीय आयुक्तांनी दिले. तसेच स्वच्छतेसाठी ५०० अतिरिक्त कर्मचारी नियुक्त करण्यात यावेत. पिण्याच्या पाण्यासाठी टँकरऐवजी पाईपलाईनवर भर देण्यात यावा, यासाठी निळवंडे कालव्यावरून पाणी उचलण्याचे नियोजन करावे. अखंडित वीज पुरवठ्यासाठी बाभळेश्वर येथून पर्यायी लाईन टाकण्यात यावी, अशा सूचनाही श्री.गेडाम यांनी दिल्या. कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह यांनी गर्दी नियंत्रणासाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरावर भर दिला जाणार असल्याचे सांगितले. ते म्हणाले, शिर्डीच्या १५ कि.मी. आधीपासून मराठी, हिंदी व इंग्रजी अशा तीन भाषांमध्ये दिशादर्शक फलक लावण्यात येतील. पार्किंगच्या उपलब्धतेची माहिती देण्यासाठी 'डिजिटल स्क्रीन्स' उभारण्यात येणार असून, संपूर्ण परिसर सीसीटीव्ही व पब्लिक अनाउन्समेंट सिस्टीमने जोडला जाईल. प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्यासाठी स्पेशल युनिट व अतिरिक्त मनुष्यबळ वापरण्याचे निर्देश देण्यात येणार आहे.

कुंभमेळ्यात मोबाईल नेटवर्क सुरळीत राहण्यासाठी १४ नवीन टॉवर्स व ५ फिरते टॉवर्स उभारण्यात येणार आहेत. तसेच, अग्निशमन सेवेसाठी प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची मागणी नाशिकच्या एकत्रित प्रस्तावात समाविष्ट करण्याच्या सूचना बैठकीत देण्यात आल्या. या बैठकीला महसूल, जिल्हा परिषद, साईबाबा संस्थान, शिर्डी नगरपरिषद, पोलीस, सार्वजनिक बांधकाम, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, शिर्डी विमानतळ, रेल्वे, एस.टी.महामंडळ व महावितरण या विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## कोपरगाव तालुक्यात योजनेतील प्रकरणे मार्गी लावा : कोल्हे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव** : कोपरगाव तालुक्यातील संजय गांधी निराधार योजना आणि श्रावण बाळ योजनेतील शेकडो प्रकरणे गेल्या सहा ते सात महिन्यांपासून प्रलंबित असून, एकही प्रकरण मंजुरीस न गेल्याने वयोवृद्ध नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.

संबंधित प्रकरणे तात्काळ मार्गी लावावीत, अशी मागणी कोपरगावच्या माजी आ. स्नेहलताताई कोल्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात कोल्हे यांनी म्हटले आहे की, कोपरगाव तालुक्यातील अनेक गरजवंत नागरिकांनी संजय गांधी निराधार योजना व श्रावण बाळ योजने अंतर्गत अर्ज दाखल केले आहेत. तथापि, तहसील कार्यालयात या प्रकरणांवर कोणतीही सुनावणी होत नसल्याने वयोवृद्ध नागरिकांना महिनोनमहिने तहसील कार्यालयात चकरा माराव्या लागत आहेत. यामुळे वेळ आणि आर्थिक खर्च दोन्ही वाढत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. या प्रलंबित प्रकरणांबाबत तहसील कार्यालयातील संबंधित विभागाशी संपर्क साधल्यास दस्तऐवजांच्या संदर्भात मीटिंग झालेली नाही, असे उत्तर मिळत असल्याचेही स्नेहलताताई यांनी नमूद केले. गेल्या सहा ते सात महिन्यांत तहसील कार्यालयाने एकही प्रकरण मंजूर केले नसल्याने अनेक फायली धुळखात पडलेल्या असल्याचे तिने निदर्शनास आणून दिले. वयोवृद्ध व गरजूंना शासनाच्या योजनांचा लाभ वेळेवर मिळणे अत्यावश्यक असून, प्रशासकीय प्रक्रियेतील विलंबामुळे त्यांचे हाल होणे योग्य नाही, असे स्नेहलताताई कोल्हे यांनी स्पष्ट केले.

त्यांनी मुख्यमंत्री, महसूलमंत्री, जिल्हाधिकारी, प्रांताधिकारी व तहसीलदार यांनी या बाबीकडे तातडीने लक्ष देऊन संबंधित अधिकाऱ्यांना योग्य सूचना द्याव्यात, अशी मागणी केली. यामुळे कोपरगाव तालुक्यातील संजय गांधी निराधार व श्रावण बाळ योजनेतील सर्व प्रलंबित प्रकरणे त्वरित मंजुरीस येऊन गरजूंना दिलासा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## महायुतीचा ऐतिहासिक विजय : गोकुळ दिघे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**झरेकाठी** : संपूर्ण राज्यात झालेल्या महानगरपालिका निवडणुकांमध्ये भाजप-शिवसेना महायुतीचा भगवा फडकला असून हा विजय जनतेच्या विश्वासाचा आणि विकासाच्या राजकारणाचा कौल आहे, अशी प्रतिक्रिया भाजपचे तालुकाध्यक्ष गोकुळ दिघे यांनी व्यक्त केली आहे. पुढे बोलताना गोकुळ दिघे म्हणाले की, संपूर्ण राज्यातील महापालिका निवडणुकीमध्ये महायुतीने विजय मिळवला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार, अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील, युवा नेते सुजय दादा विखे पाटील, आमदार संग्राम जगताप , यांच्या नेतृत्वाखालील अहिल्यानगर, नगरपालिकेच्या निवडणुकीत ऐतिहासिक विजय,महायुती सरकारने गेल्या काळात राज्यात विकासाची घडी बसवली आहे. पायाभूत सुविधा, नागरिकाभिमुख योजना, शहरी विकास आणि प्रशासनातील पारदर्शकता यामुळेच जनतेने महायुतीवर विश्वास टाकला आहे. हा विजय म्हणजे महायुतीच्या कार्यकर्त्यांच्या मेहनतीला आणि जनतेच्या अपेक्षांना मिळालेली पावती आहे. महानगरपालिकांमधून महायुतीला मिळालेला कौल हा केवळ राजकीय विजय नसून राज्याच्या सर्वांगीण विकासाला गती देण्याची जबाबदारी अधिक वाढवणारा आहे. मात्र, दुर्दैवाने संगमनेरकरांनी नगरपालिका निवडणुकीमध्ये विकासाला डावललं. परंतु आम्ही झालेल्या निकालाचा सन्मान करून संगमनेर शहराच्या.व संगमनेर तालुक्यातील गावांचा विकासाला कटिबद्ध राहणार आहे.

# शिवचरित्र आचरणात आणावे : डॉ. शिवरत्न शेटे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**ढोरजळगांव** : राष्ट्र मोठे करायचे असेल तर आपल्या कामाविषयी आस्था निर्माण करा. माणसं मोठी झाली की समाज आणि राष्ट्र आपोआप मोठे होते. शिवचरीत्र नुसते ऐकून चालणार नाही. तर आचरणात आणावे लागले, असे प्रतिपादन शिव व्याख्याते डॉ. शिवरत्न शेटे यांनी केले. न्यू आर्टस महाविदयालयाने वाघोली ता.शेवगाव येथे आयोजीत केलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबीराच्या समारोप्रसंगी शेटे बोलत होते.



जिल्हा मराठा शिक्षण संस्थेचे सहसचिव मुकेश मुळे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी निर्मला काटे, सरपंच सुश्मिता भालसिंग, उपसरपंच कल्पना भालसिंग, प्राचार्य पुरुषोत्तम कुंदे, उमेश भालसिंग, राजेंद्र जमधडे आदी प्रमुख उपस्थित होते. यावेळी डॉ.शेटे म्हणाले की, महापुरुषांचे विचार ऐकून ते आचरणात आणल्याशिवाय त्यांना अभिप्रेत असलेला समाज निर्माण होणार नाही. शिवजयंती व भिमजयंती डीजेमुक्त व व्यसनमुक्त वातावरणात व्हायला हव्यात. त्या ख-या आदर्शत्वाच्या संकल्पना आहेत.

जमिनीशी नाळ जुळलेला उमेश भालसिंग यांच्या सारखा एक तरुण समर्पित भावनेने काम करुन गाव बदलून दाखवतो. असे तरुण शिवभक्त गावागावात निर्माण व्हायला हवेत. यावेळी तेजस साबळे, सिमा फलके, गायत्री मरकड, शुभम तांबे, राजेंद्र जमधडे, निर्मला काटे, ऋषी ब्राम्हणे आदींनी मनोगत व्यक्त केले. नारायण चेमटे, आरती तेलोरे, गीता कुलाडे, तृप्ती भालेराव, श्रावणी आव्हाड, करण डवले, श्रीमंत बल्लाळ, शुभम तांबे, चंद्रशेखर मुरदारे आदींचा उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून गौरव करण्यात आला.

मान्यवरांच्या हस्ते वाघोली वेबसाईडचे औपचारीक उदघाटन करण्यात आले. गहिनीनाथ शेळखे, छाया भालशंकर, गोकुश क्षिरसागर , रवींद्र वैदय, युवराज सुडके, ग्रामसेवक जनाबाई फटाले, राजेंद्र जमधडे, बाबासाहेब गाडगे, काकासाहेब लांडे, अशोक वांढेकर, विष्णू घनवट आदींसह विदयार्थी, ग्रामस्थ उपस्थित होते. प्रास्तविक उमेश भालसिंग यांनी तर सुत्रसंचालन सोमेश्वर शेळके यांनी केले. गहीनीनाथ यांनी आभार मानले.

# महानगरपालिका निवडणुकीत महायुतीचा ऐतिहासिक विजय

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**झरेकाठी** : संपूर्ण राज्यात झालेल्या महानगरपालिका निवडणुकांमध्ये भाजप-शिवसेना महायुतीचा भगवा फडकला असून हा विजय जनतेच्या विश्वासाचा आणि विकासाच्या राजकारणाचा कौल आहे, अशी प्रतिक्रिया आमदार अमोल खताळ यांनी व्यक्त केली आहे. पुढे बोलताना आमदार खताळ म्हणाले की, संपूर्ण राज्यातील महापालिका निवडणुकीमध्ये महायुतीने विजय मिळवला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने गेल्या काळात राज्यात विकासाची घडी बसवली आहे. पायाभूत सुविधा, नागरिकाभिमुख योजना, शहरी विकास आणि प्रशासनातील पारदर्शकता यामुळेच जनतेने महायुतीवर विश्वास टाकला आहे. हा विजय म्हणजे महायुतीच्या कार्यकर्त्यांच्या मेहनतीला आणि जनतेच्या अपेक्षांना मिळालेली पावती आहे. महानगरपालिकांमधून महायुतीला मिळालेला कौल हा केवळ राजकीय विजय नसून राज्याच्या सर्वांगीण विकासाला गती देण्याची जबाबदारी अधिक वाढवणारा आहे. मात्र, दुर्दैवाने संगमनेरकरांनी नगरपालिका निवडणुकीमध्ये विकासाला डावललं. परंतु आम्ही झालेल्या निकालाचा सन्मान करून संगमनेर शहराच्या विकासाला कटिबद्ध राहणार आहे. आगामी काळात शहरे अधिक स्वच्छ, सुरक्षित आणि सुविधा-संपन्न करण्यासाठी महायुती कटिबद्ध राहील, असा विश्वासही आमदार अमोल खताळ यांनी व्यक्त केला.

द•ख•ल

## पुणे ग्रँड चॅलेंज टूर २०२६ सायकल स्पर्धा ; वाहतूक बदल आदेश

**नाझरे सुपे :** पुणे जिल्हा प्रशासन आणि सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या सहकार्याने आयोजित पुणे ग्रँड चॅलेंज टूर २०२६ मधील टप्पा क्रमांक दोन २१ जानेवारी रोजी पार पडणार आहे. स्पर्धेदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सकाळी ८ ते सायं. ६ या वेळेत विविध मार्गांवरील वाहतूक बंद किंवा पर्यायी मार्गाने वळविण्याचे आदेश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी जारी केले आहेत. या टप्प्यात सासवड, राजगड, वेल्हे व हवेली पोलीस हद्दीत एकूण ९०.२५ किमी अंतर समाविष्ट आहे. सासवड कोंढवा रोड, सासवड-कापूरहोळ रोड तसेच बोपदेव आणि चिव्हेवाडी घाट मार्गावरील वाहतूक पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहे. राजगड व वेल्हे हद्दीत काही ठिकाणी पर्यायी मार्ग नसल्याने स्पर्धा संपेपर्यंत वाहतूक थांबविण्यात येईल. तसेच सिंहगड किल्ल्याकडे जाणारी पर्यटक वाहतूकही तात्पुरती बंद राहणार असून पानशेतमार्गे पुणे शहरासाठी पर्यायी मार्ग उपलब्ध करून देण्यात आला आहे.

## मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया

**नगर** - एकदंत गणेश मंदिरतर्फे सोमवार दि. १९ जानेवारी २०२६ रोजी स. १० ते दु.३ या वेळेत दातरंगे मळा,एकदंत कॉलनी, अ.नगर येथे मोफत नेत्र,दंत व आरोग्य तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया व औषधे वाटप शिबीराचे आयोजन करण्यात आले.

आज संगणक, टीव्ही व प्रदुषणमुळे डोळ्यांवर व आरोग्यावर दुष्परिणाम होऊ लागले आहेत. काही शहरी व ग्रामीण भागात डोळ्यांची व आरोग्याची निगा राखण्यामध्ये जनतेचे दुर्लक्ष होत चालले आहे. त्यातच मोतीबिंदू सारख्या सुमारे १५ ते २० हजार रुपयांच्या शस्त्रक्रिया सामान्यांच्या आवाक्याबाहेरच्या असतात. म्हणून आम्ही हे शिबीर आयोजित केले आहे.

एच.व्ही.देसाई नेत्र रुग्णालय,पुणे यांच्या सहकार्याने हे शिबीर होणार आहे. नेत्रतपासणीपासून ते मोतीबिंदू पर्यंतचे सर्व सोपस्कार मोफत करण्यात येणार आहेत. यामध्ये रुग्णांचा नगर ते पुणे प्रवास, भोजन, निवास व काळा चष्मा आदि बाबींचा समावेश आहे, शस्त्रक्रियेसाठी निवडण्यात आलेल्या रुग्णांवर पुण्यात मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

## थकीत वेतनावरून 'शिक्षक भारती' आक्रमक;

**अहिल्यानगर**- गेल्या दोन वर्षांपासून प्रलंबित असलेली न्यायालयीन प्रकरणे आणि शिक्षकांची थकीत वेतन देयके अदा करण्यास टाळाटाळ करणाऱ्या प्रशासनाविरुद्ध 'शिक्षक भारती' संघटनेने आता थेट राजकीय आणि प्रशासकीय संघर्षाचे हत्यार उपसले आहे. नाशिक पदवीधर मतदारसंघाचे आमदार सत्यजित तांबे यांनी या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन शिक्षण संचालक महेश पालकर यांच्याशी दूरध्वनीवरून सविस्तर चर्चा केली. प्रशासकीय दिरंगाईमुळे शिक्षकांवर होणारा अन्याय आता सहन केला जाणार नाही, असा इशारा यावेळी देण्यात आला.

नेमके प्रकरण काय? शिक्षक भारती संघटनेने दिलेल्या निवेदनानुसार, उच्च न्यायालयाचे स्पष्ट आदेश असतानाही गेल्या दोन वर्षांपासून शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची थकीत देयके रोखून धरण्यात आली आहेत. शिक्षण संचालकांनी १३ जून २०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार ५ जुलै २०२५ पर्यंत ही देयके शाळा स्तरावरून ऑनलाइन अपलोड करणे बंधनकारक होते. मात्र, आजही ही देयके शिक्षणाधिकारी (माध्यमिक) अहिल्यानगर व वेतन अधीक्षक (माध्यमिक) कार्यालय, अहिल्यानगर येथे प्रलंबित असल्याचे संघटनेने निदर्शनास आणून दिले आहे.

## जेऊर-कोल्हार रोडवरील विजेचे खांब, प्रवाशांच्या जीवाला धोका

**अहिल्यानगर :** जेऊर-कोल्हार रस्त्याच्या दुतर्फा सध्या विद्युत वाहक तारांचे खांब बसविण्याचे काम सुरू असून, हे खांब रस्त्यालगत अतिशय कमी अंतरावर उभारण्यात येत असल्याने प्रवाशांच्या जीवाला गंभीर धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर जय हिंद फाउंडेशनच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देत सदर खांब रस्त्यापासून किमान १० फूट अंतरावर हलविण्याची तातडीची मागणी करण्यात आली आहे.

जेऊर येथील वाघवाडी परिसरात असलेल्या डोंगरावर शासनाच्या माध्यमातून सोलर प्रकल्पाचे काम सुरू आहे. या प्रकल्पातून निर्माण होणारा विद्युत प्रवाह जेऊर सब-स्टेशनला जोडण्यासाठी विद्युत खांब व मुख्य विद्युत वाहक तारा टाकण्याचे काम सध्या प्रगतीपथावर आहे. मात्र, हे खांब डांबरी रस्त्यापासून अवघ्या तीन फूट अंतरावर बसविण्यात येत असल्याने वाहनचालक, दुचाकीस्वार, पादचारी तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे.

या खांबांवरून मोठ्या क्षमतेच्या विद्युत वाहक मुख्य तारा ओढल्या जाणार असल्याने, भविष्यात एखादा अपघात घडल्यास मोठी जीवितहानी होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही.

## राजमाता जिजाऊ जयंतीनिमित्त केडगावमध्ये वृक्षारोपण

**अहिल्यानगर :** राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त प्रभाकरम फाऊंडेशनच्या वतीने केडगाव परिसरात वृक्षारोपणाचा उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत विविध देशी, औषधी व पर्यावरणपूरक वृक्षांची लागवड करण्यात आली. पर्यावरण संवर्धन, जैवविविधतेचे संरक्षण करण्याचा संदेश या उपक्रमाच्या माध्यमातून देण्यात आला.

राजमाता जिजाऊ यांचे विचार समाजात रुजविणे व पर्यावरण रक्षणाची जबाबदारी प्रत्येकाने घेण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. केवळ वृक्षारोपण करून थांबायचे नाही, तर लावलेल्या वृक्षांचे संगोपन व संवर्धन करण्याचा संकल्प उपस्थित सर्वांनी यावेळी केला. या कार्यक्रमास प्रभाकरम फाऊंडेशनचे अध्यक्ष विपुल तापकीर, उपाध्यक्ष अभिषेक थोरात, रविंद्र टकले, भाऊ घुले, शिवम थोरात, श्रीकर कुलकर्णी, निखिल बहिरट यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जेसीबी मशीन व ट्रॅक्टर लंपास करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश ; ७७ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोमेश्वरनगर :** शेतकऱ्यांची फसवणुक करुन जेसीबी मशीन व ट्रॅक्टर लंपास करणाऱ्या टोळीचा सुपा पोलीस स्टेशनकडुन पर्दाफाश मिळालेल्या माहितीनुसार नांदेड धाराशिव येथील शेतकऱ्यांची जेसीबी मशीन भाडधाने घेऊन ते पुरंदर तालुक्यातील सासवड येथील नव्याने होणाऱ्या विमानतळ कामाकरिता लावतो असे म्हणून शेतकऱ्याशी करारनामा करून घेऊन त्या जेसीबी वाहनांची विक्री करणाऱ्या टोळीचा सुपा पोलीस स्टेशनने पर्दाफाश केला आहे. बालाजी गोविंदराव गादेवाड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सुपा पोलीस स्टेशन येथे दि ०६ रोजी गुन्हा दाखल आहे. शेतकरी बालाजी गोविंदराव गादेवाड यांच्याबरोबरच शेतकरी अनिल शिवाजी वरखडे बाबुराव व आप्पाराव पांढरे यांच्याशी आरोपी यांनी शंभर रुपयाचे स्टॅम्प वरती करार करून त्यांना तुमचे जेसीबी वाहन सासवड येथील नव्याने होणाऱ्या विमानतळाचे कामावर लावतो असे म्हणून सदरचे काम हे आमचे बी.जी. कंट्रक्शन कंपनीला मिळाले आहे. आम्ही



तुमचे जेसीबी वाहन पेऊन जाऊन प्रति महिना एक लाख रुपये प्रमाणे भाडे देतो असे सांगून आरोपी अजय संतोष चव्हाण रा. सरतळे ता. जावळी जि. सातारा ,दिनेश भाऊराव मोरे रा. इकलीबोर ता. नायगाव जि. नांदेड , निलेश अण्णा थोरात राहणार मोरगाव तालुका बारामती जिल्हा पुणे , तुषार शहाजी शिंदे रा.येडशी ता. धाराशिव जि धाराशिव यांनी फसवणूक केली आहे.

आरोपी अजय संतोष चव्हाण व निलेश बोरात यांनी दिनेश भाऊराव मोरे, तुषार शिंदे यांच्याशी संगणमत करून डिसेंबर / २०२५ मध्ये शेतकऱ्यांकडून जेसीबी मशीन विक्री करण्याच्या उद्देशाने ते सुपे ता. बरामती जि. पुणे येथे घेऊन आले होते. पोलिसांनी त्याबाबत करारनामा तसेच आरोपी अजय चव्हाण, निलेश थोरात व तुषार शिंदे यांनी बनावटीकरण करून तयार केलेले बी.जी. कंट्रक्शन कंपनीचे बनावट कागदपत्रे तपासामध्ये हस्तगत करण्यात आली आहेत.

आरोपी निलेश थोरात हा सदरच्या जेसीबी वाहनांचा विक्री करून त्याची विल्हेवाट लावीत होता असे तपासामध्ये निष्पन्न झाले आहे. तपासामध्ये धाराशिव येथील दोन ट्रॅक्टर तसेच नांदेड येथील तीन जेसीबी आरोपी निलेश थोरात यांच्याकडून हस्तगत करण्यात आलेले आहेत आरोपी निलेश थोरात यास अटक केली आहे त्यास दि. १६ जानेवारी २०२६ पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मंजूर झाले आहे. पोलीस कस्टडी मध्ये असताना आरोपी निलेश थोरात याने दोन ट्रॅक्टर मांडवगण फराटा ता. शिरुर जि. पुणे येथील शेतकऱ्यांना फायनांन्स कंपनिचे ट्रॅक्टर असल्याचे सांगुन त्याचे कागदपत्रे घोड्याच दिवासात देतो असे सांगुन सदरचे ट्रॅक्टर विकी केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे सुपा पालीस स्टेशन गु.र.न. १/२०२६ मधील ३ जेसीबी मशीन तसेच कळंब पोलीस स्टेशन जि. धाराशिव येथील गु.र.न.४५८/२०२५ मधील १ ट्रॅक्टर व इतर १ ट्रॅक्टर असे एकूण ३ जेसीबी मशीन व २ ट्रॅक्टर असे ७७ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल आरोपीतांकडुन हस्तगत करण्यात आलेला आहे. सदर गुन्हाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक जिनेश कोळी हे करीत आहेत.

सदरची कामगीरी ही मा. संदीप सिंह गिल्ल सो, पोलीस अधिक्षक पुणे गमीण, मा. गणेश बिरादार सो. अपर पोलीस अधिक्षक, बारामती विभाग, मा. सुदर्शन राठोड सो. उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभाग बारामती, यांचे मार्गदर्शनाखाली सुपा पोलीस स्टेशनचे सहा. पोलीस निरीक्षक मनोजकुमार नवसरे सो. पोलीस उपनिरीक्षक जिनेश कोळी, पोलीस हवलदार राहुल भाग्यवंत, पोलीस हवलदार संदीप लोंढे, पोलीस हवलदार रुपेश सांळुखे, पोलीस हवलदार दत्ता धुमाळ, पोलीस हवलदार संतोष पवार, पोलीस हवलदार विशाल गजरे, पोलीस शिपाई किसन ताडगे, पोलीस शिपाई महादेव साळुंखे, पोलीस शिपाई तुषार जैनक, पोलीस शिपाई सागर वाघमोडे, पोलीस शिपाई निहाल वणवे, पोलीस शिपाई सचिन कोकणे, पोलीस शिपाई सचिन दरेकर, पोलीस शिपाई योगेश सरोदे, पोलीस शिपाई पियुष माळी, पोलीस शिपाई आदेश मवाळ यांनी केली आहे

## मराठा शौर्य दिनानिमित्त राजेंद्र पवार यांची अष्टधान्यतुला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** महावितरणचे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांची मराठा शौर्य दिनानिमित्त दि. १४ जानेवारीला येथील ऐतिहासिक लालमहालमध्ये अष्टधान्यतुला करण्यात आली.

पानिपतवीर श्रीमंत महाराज यशवंतराव पवार यांचे तसेच सर्व पानिपतवीरांना वंदन करण्यासाठी श्रीमंत राजे पवार घराणे सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने मराठा शौर्य दिनाचे ऐतिहासिक लालमहालमध्ये आयोजन करण्यात आले. विद्युत क्षेत्रात गेल्या ३६ वर्षांमध्ये सामाजिक बांधिलकी जोपासत प्रामुख्याने नाशिक, पुणे जिल्ह्याच्या दुर्गम दऱ्याखोऱ्यांत तसेच वाड्यावस्त्यांमध्ये विद्युतीकरणाला वेग देणारे आणि



अनेक सामाजिक संस्थांच्या माध्यमातून समाजाभिमुख उपक्रमांत सक्रीय असलेले महावितरणचे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांची या कार्यक्रमात अष्टधान्यतुला करण्यात आली.

यावेळी प्रमुख म्हणून प्रतिष्ठानचे अध्यक्ष सागर पवार, गजानन पवार, स्मिता पवार, महावितरणचे अधीक्षक अभियंता सिंहाजी गायकवाड यांच्यासह प्रतिष्ठानचे पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

## नगरपरिषदेत नूतन सदस्यांचा सत्कार व तिळगुळ वाटप कार्यक्रम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** नात्यांमध्ये गोडवा, प्रेम आणि आपुलकी कायम राहावी म्हणून नगरसेवक गोरख पारसे यांच्या वतीने नगराध्यक्ष उपनगराध्यक्ष, तसेच सर्व नगरसेवकांना बारामती नगर परिषदेमध्ये तिळगुळ वाटप करण्यात आले.

बारामती नगरपरिषदेमध्ये (दि:१६) रोजी सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेमध्ये उपनगराध्यक्ष म्हणून श्वेता योगेश नाळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. त्यानंतर चार स्वीकृत नगरसेवक म्हणून सोमनाथ गजाकस,अमोल कावळे, गणेश जोजारे, राहुल शहा वाघोलीकर याची निवड करण्यात आली. यावेळी त्यांना मकर संक्रांतीच्या हार्दिक शुभेच्छा देऊन तिळगुळ वाटप करून पुढील वाटचालीसाठी नवनिर्वाचित नगरसेवक गोरख पारसे यांनी शुभेच्छा दिल्या.



यावेळी पारसे यांनी बोलत असताना सांगितले की, ज्या मकर संक्रांतीनिमित्त आपण तिळगुळ देऊन सर्वांचे तोंड गोड करतो तसेच प्रभाग क्रमांक १६ मधील नागरिकांना त्यांची विकास कामे करून त्यांच्या मनात गोडवा निर्माण करणार असे मत नगरसेवक गोरख पारसे यांनी व्यक्त केले

# ससाणेंच्या स्वच्छतेचा साक्षात्कार, श्रीरामपूर बसस्थानक चकाचक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** वापरलेले चहाचे कप, प्लास्टिक पिशव्या, घाण रद्दी, भेळीचे कागद गुटखा पुड्या यासह इतरही मोठ्या प्रमाणातील घानीचा निपटारा श्रीरामपूर नगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून करण्यात आला आहे. नूतन नगराध्यक्ष करण ससाणे यांच्या दूरदृष्टीचा हा साक्षात्कार असून बसस्थानक स्वच्छतेमुळे चकाकले आहे.

''इच्छा असेल तर मार्ग सापडेल, या उक्तप्रमाणे नवनिर्वाचित नगराध्यक्ष करण ससाणे यांच्या सूचनेनुसार श्रीरामपूर बसस्थानकाची संपूर्णपणे स्वच्छता करण्यात आली आहे. या कामगिरीमुळे नागरिकांनी ससाणे यांना धन्यवाद दिले आहेत.

यापूर्वी गेल्या कित्येक वर्षांपासून श्रीरामपूर बसस्थानकाची अशा पद्धतीने स्वच्छता झाली नव्हती. सर्वत्र



पसरलेला कचरा कागदाचे तुकडे, प्लास्टिक ग्लास, चहाचे वापरलेले ग्लास वापरलेली रद्दी अशा वेगवेगळ्या घाणीने श्रीरामपूर चे हे बसस्थानक पूर्णपणे माखले गेले होते.

बसस्थानकात आरोग्य कर्मचारी साफसफाईसाठी उपलब्ध असले तरी त्यांच्याकडून संपूर्ण स्वच्छता होणे अशक्य असते. नगराध्यक्ष करण ससाणे यांनी बसस्थानकाची ही दुर्दशा पहिली आणि नगरपालिकेचे आरोग्य विभाग प्रमुख रावसाहेब घायवट यांना या संदर्भात सूचना केली. घायवट यांनी क्षणाचाही विलंब न करता शहरातील स्वच्छते वर परिणाम होणार नाही याची दक्षता घेत या बसस्थानकाची कोपरा न कोपरा स्वच्छता केली आहे.

घायवट यांनी देखील समय सूचकता पाळत या बसस्थानकाची स्वच्छता केल्याने बसस्थानक चकाचक दिसू लागले आहे. नगरपालिकेच्या आरोग्य विभागाचे स्मारक ५० कर्मचारी या स्वच्छतेसाठी तैनात करण्यात आले होते. अत्यंत बारकाईने या बसस्थानकाचा संपूर्ण परिसर तसेच प्रत्येक कोपरा पूर्णतः स्वच्छ करण्यात आला आहे. यामुळे बसस्थानकाला झळाळी मिळाली आहे.

या बसस्थानकाचा जिल्ह्यासह पर जिल्ह्यातून प्रत्येक तालुक्यातून खेड्यापाड्यातून महाविद्यालयीन विद्यार्थी विद्यार्थिनी ये जा करतात. तालुक्याचे ठिकाण म्हणून या बसस्थानकाला सर्वाधिक गर्दी असते. मात्र घाणीच्या साम्राज्यामुळे तेथे फार प्रवासी थांबू शकत नव्हते. नगराध्यक्ष करण ससाने आरोग्य विभागाचे प्रमुख रावसाहेब घायवट आणि त्यांचे सर्व कर्मचारी यांच्या या दूरदृष्टी मुळे शेकडो प्रवाशांना मोठा दिलासा आणि आधार मिळाला आहे.

दरम्यान बसस्थानका सह शहरातील प्रत्येक रस्ता न रस्ता देखील अतिशय बारकाईने स्वच्छ करण्यात आले आहेत. यामुळे शहरातील कचऱ्यामुळे शहराला प्राप्त झालेले रौद्ररूप पुसले गेले आहे. नगराध्यक्ष करण ससाणे यांच्या या स्वच्छतेच्या उपक्रमाबद्दल नागरिकांकडून त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

## राष्ट्रपुरुषांच्या चरित्रातूनच राष्ट्रचरित्र निर्माण होते : प्रशांत अवचट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे, :** राष्ट्रपुरुषांच्या चरित्रातूनच राष्ट्र चरित्र निर्माण होते तर राष्ट्र इतिहास आणि संस्कृती राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या चरित्रातूनच शिकावी लागेल असे गौरवोद्गार थंब क्रिएटिवचे संस्थापक अध्यक्ष पर्यावरण तज्ञ प्रशांत अवचट यांनी व्यक्त केले आहे.

विठ्ठलवाडी (ता. शिरुर) येथील श्री पांडुरंग विद्यामंदिर विठ्ठलवाडी येथे राजमाता राष्ट्रमाता जयंती व स्वामी विवेकानंद जयंती राष्ट्रमाता जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती तसेच मकर संक्रातच्या निमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना थंब क्रिएटिवचे संस्थापक अध्यक्ष पर्यावरण तज्ञ प्रशांत अवचट हे बोलत होते, याप्रसंगी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पुणे जिल्हा विभाग प्रमुख संभाजी गवारे, मुख्याध्यापक भाऊसाहेब वाघ, माजी व्हॉइस चेअरमन रायचंद शिंदे, संचालक महादेव गवारे, संभाजी शिंदे, चक्रधर गवारे यांसह आदी मान्यवर उपस्थित होते. दरम्यान यावेळी बोलताना प्रखर राष्ट्रनिष्ठा म्हणजे स्वामी विवेकानंद व



विठ्ठलवाडी (ता. शिरुर) येथील कार्यक्रमात बोलताना पर्यावरण तज्ञ प्रशांत अवचट.

(छायाचित्र आकाश भोरडे)

स्वराज्याला दोन छत्रपती देणाऱ्या जिजाऊ मासाहेब जगातील सर्वात दूरदर्शी आणि आदर्श माता असल्याचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पुणे जिल्हा विभाग प्रमुख संभाजी गवारे यांनी सांगितले, तर माही गवारे व आरोही शितोळे या इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी तसेच इंग्रजी विषयाचे अध्यापक विशाल कुंभार यांनी राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंदांविषयी माहिती दिली आणि आईच्या मदतीने विद्यार्थ्यांनी घरी तिळगुळ तयार केलेल्या तिळगुळाचे वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## कृषीक २०२६ शेतकऱ्यांसाठी आजपासून

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :**एग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट संचलित कृषी विज्ञान केंद्र बारामती मार्फत आयोजित कृषीक या आंतरराष्ट्रीय कृषी प्रदर्शनाचे तयारीचा आढावा (दि:१६) रोजी ट्रस्टचे चेअरमन राजेंद्र पवार, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रो. निलेश नलावडे, विश्वस्त सौ. सुनंदाताई पवार, रणजीत पवार यांनी घेतली.

या प्रदर्शनामध्ये १७० एकर प्रक्षेत्रावरती असलेले विविध पिके पाहत असताना शेतकऱ्यांचा फ्लो कसा असावा विविध प्लॉटवरती माहिती फलक, तज्ञ व्यक्ती शेतकऱ्यांशी माहिती देण्याची व्यवस्था कशी आहे. स्टॉल मधील नियोजन, औजारे यंत्रे दालनातील नियोजन, देशभरातून येणाऱ्या शेतकऱ्यांना भोजन निवास सोय, शेतकऱ्यांना पाण्याची सोय, स्वच्छता ग्रह इत्यादी बाबत नियोजन व सूचना दिल्या,

शेतकऱ्यांची गर्दी लक्षात घेऊन यावर्षी हे प्रदर्शन दि.१७ ते २४ जानेवारी २०२६ दरम्यान आठ दिवसाचे केल्यामुळे सुट्टीच्या दिवशी शेतकऱ्यांनी गर्दी करण्यापेक्षा इतर दिवशी शेतकऱ्यांनी प्राधान्य द्यावे असेही सूचित करण्यात आले संस्थेचे विश्वस्त रणजीत पवार यांच्या मार्गदर्शनाखाली भीमथडी अश्वप्रदर्शन दिनांक १७ व १८ जानेवारी रोजी करण्यात आले




आहे. त्याचाही आढावा घेतला. दि. १९ ते २२ जानेवारी दरम्यान डॉग शो चे आयोजन केले आहे. पशुपक्षी प्रदर्शन सर्व दिवस असणार आहे यादरम्यान एचएफ कालवडींचा ब्युटी शो असणार आहे. विश्वस्त सुनंदा पवार यांचे मार्गदर्शनखाली भीमथडी जत्रेत शेतकऱ्यांची भोजन व्यवस्था, चहापान इत्यादीचाही आढावा घेतला शेतकऱ्यांची गर्दी लक्षात घेता तब्बल पन्नास एकर वरती पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे. त्या बाबत सूचना दिल्या. प्रक्षेत्रावर मान्यवरांचे हस्ते उद्घाटन झाल्यानंतर आप्पासाहेब पवार सभागृह शारदानगर येथे मान्यवर शेतकऱ्यांना संबोधित करणार आहेत.

## धंगेकर पराभूत जेलमधील सोनाली आंदेकर विजयी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** ज्या निवडक लढतींकडे संपर्ण राज्याचं लक्ष लागून राहिलं होतं त्या आंदेकर आणि धंगेकरांच्या प्रभागात आंदेकरांचा विजय झाला आहे. जेलमधून निवडणूक लढवलेल्या सोनाली आंदेकर विजयी झाल्या असून प्रतिभा रवींद्र धंगेकर यांचा पराभव झाला आहे.

आंदेकर विरुद्ध धंगेकर अशी काँटे की टक्कर झाली होती चौथ्या फेरीत सोनाली आंदेकर ८५६ मतांनी आघाडीवर होत्या. अखेर त्यांचा विजय झाला आहे. सोनाली आंदेकर ह्या गुंड बंडू



आंदेकरची सून आहेत.सोनाली आंदेकरांवर आयुष कोमकर हत्येचा कट रचल्याप्रकरणी गुन्हा दाखल आहे. त्यामुळे त्यांनी तुरुंगातून लढत दिली होती. पुण्यासह राज्यात या निवडणुकीची चर्चा होती.दरम्यान, याच प्रभागात आंदेकर कुटुंबातील आणखी एक सदस्य लक्ष्मी आंदेकर यादेखील राष्ट्रवादीच्या तिकिटावर निवडणुकीत उतरल्या होत्या. दोघींना न्यायालयाने उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी सशर्त परवानगी दिली होती, परंतु जामीन अर्ज फेटाळले आहेत.रवींद्र धंगेकर ज्या कसबा विधानसभा मतदारसंघातून विधानसभेची पोटनिवडणूक जिंकले होते, त्याच मतदारसंघात प्रभाग क्रमांक २३ येतो. जेव्हा रवींद्र धंगेकर यांनी पोटनिवडणूक लढली होती, तेव्हा आंदेकर कुटुंब हे राष्ट्रवादी काँग्रेसच्या सोबत असल्याने त्यांची मदत धंगेकर यांना झाली होती. आता मात्र परिस्थिती बदलली. त्यामुळे प्रतिभा धंगेकरांना पराभव पत्करावा लागला.

# बारामती नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षपदी श्वेता नाळे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** बारामती नगर परिषदेच्या उपनगराध्यक्षपदी श्वेता योगेश नाळे यांची निवड करण्यात आली असून स्वीकृत नगरसेवक पदासाठी सोमनाथ गजाकस, अमोल कावळे, राहुल वाघोलीकर शहा तसेच गणेश जोजारे यांची निवड करण्यात आली आहे.

या निवडीमुळे बारामतीच्या स्थानिक राजकारणात नव्या चर्चांना आणि अपेक्षांना उधाण आले आहे. नगरपालिका प्रशासनाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या या निवडी सामाजिक, शैक्षणिक तसेच प्रशासकीय अनुभवाच्या आधारे करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. स्वीकृत



नगरसेवक हे निवडणुकीतून न येता त्यांच्या कार्याची दखल घेऊन नियुक्त केले जात असल्याने, नगरपालिकेच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये त्यांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

उपनगराध्यक्षपदासाठी झालेल्या निवड प्रक्रियेत श्वेता योगेश नाळे यांच्या नावावर एकमताने शिक्कामोर्तब करण्यात आले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सूचनेनुसार ही निवड झाल्याने पक्ष संघटन आणि स्थानिक प्रशासनात समन्वय राखण्यावर भर देण्यात आल्याचे दिसून येते.श्वेता योगेश नाळे या यापूर्वीही सामाजिक व विविध उपक्रमांमध्ये सक्रिय राहिल्या आहेत. त्यांच्या अनुभवाचा लाभ उपनगरातील नागरी समस्या, मूलभूत सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्ते व विकासकामांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. सोमनाथ गजाकस हे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात सक्रिय असून विविध लोकहिताच्या उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग राहिला आहे. स्थानिक नागरी समस्या, विकासकामे आणि नागरिकांच्या प्रश्नांबाबत त्यांची ठाम भूमिका ओळखली जाते.

द • ख • ल

## शिवजयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी मीरा खेडके, उपाध्यक्षपदी चेतना मांगडे



**श्रीगोंदा** : येथे आज सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीची महत्त्वपूर्ण बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीत समितीच्या नवीन पदाधिकाऱ्यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. अध्यक्षपदी मीराताई खेडके यांची निवड जाहीर होताच उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन केले. उपाध्यक्षपदी चेतना मांगडे, खजिनदारपदी बाळू मखरे, तर सचिवपदी सुनील ढवळे यांची निवड करण्यात आली. शिवजयंती उत्सव अधिक शिस्तबद्ध, प्रेरणादायी आणि भव्य स्वरूपात साजरा करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.नूतन पदाधिकाऱ्यांनी शिवजयंती उत्सवात ऐतिहासिक परंपरा जपत समाजप्रबोधन, युवक सहभाग आणि सांस्कृतिक उपक्रमांना प्राधान्य देण्याचा संकल्प व्यक्त केला. उपस्थित मान्यवरांनी सर्व नूतन पदाधिकाऱ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.या बैठकीस अरविंद कापसे, श्याम झरे, दिलीपजी लबडे, नाना शिंदे, दीपक मखरे, नगरसेवक सोनू कोथंबिरे, नगरसेवक बाबु धुमाळ, नगरसेवक अनिल औटी, सतीश मखरे, अजिज शेख, पारे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांनी अहंकारमुक्त सकारात्मक जीवन जगावे : शिवव्याख्याते डॉ. शेटे



**शेवगाव** : राष्ट्रीय सेवा योजना ही राष्ट्रनिर्माणासाठी संस्कारबळ देणारी योजना असून विद्यार्थ्यांच्या मनात सकारात्मक विचारांचे 'सॉफ्टवेअर' बसविण्याचे कार्य करते. विद्यार्थ्यांनी या शिबिरातून घेतलेले संस्कार आयुष्यभर जपावेत व अहंकारमुक्त, सकारात्मक जीवन जगावे, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध शिवव्याख्याते डॉ. शिवरत्न शेटे यांनी केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संचलित न्यू आर्ट्स, कॉमर्स अॅन्ड सायन्स कॉलेज, शेवगाव यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे 'शाश्वत विकासासाठी युवक : पाणलोट व पडिक जमीन व्यवस्थापन' या अभियानांतर्गत विशेष श्रमसंस्कार शिबिराचा समारोप अलीकडे झाला. याप्रसंगी डॉ. शेटे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

अध्यक्षीय भाषणात सहसचिव मुकेश मुळे म्हणाले की, आज समाजात व्यसनाधीनतेचे प्रमाण वाढत असून तरुणांनी किमान महापुरुषांच्या जयंतीदिवशी तरी व्यसनमुक्त राहण्याचा संकल्प करावा. निर्मलाताई काटे यांनी शिबिरातील स्वयंसेवक व आदर्श गाव उपक्रमाचे कौतुक केले.

या सात दिवसांच्या शिबिरात वाघोली गावात स्वच्छता, मंदिर साफसफाई, स्मशानभूमी स्वच्छता, व्यायाम व कवायती, पथनाट्य, झाडे लावणे व त्यांना ठिबक बसविणे असे उपक्रम राबविण्यात आले. शिबिराचा अहवाल कार्यक्रम अधिकारी डॉ. गोकुळ क्षीरसागर यांनी सादर केला. ग्रामस्थ, शाळा, सरपंच, उपसरपंच यांचे सहकार्य लाभल्याचेही त्यांनी नमूद केले.

उत्कृष्ट स्वयंसेवक व ग्रुप यांचा सत्कार करण्यात आला. स्वयंसेविका विभागात आरती तेलोरे प्रथम, गीता कुल्हाडे द्वितीय, तृप्ती भालेराव तृतीय तर स्वयंसेवकांमध्ये नारायण चेमटे प्रथम, यश काटे द्वितीय, अमन वाघमारे व साहिल शेख तृतीय ठरले. विविध उपक्रमांमध्ये कर्तव्यवीर ग्रुप, राजमुद्रा ग्रुप व युवाशक्ती ग्रुप आदींना पारितोषिके देण्यात आली.

समारोप प्रसंगी प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कुंदे यांनी स्वागतपर भाषण करत स्वयंसेवकांचे कौतुक केले. मान्यवरांच्या हस्ते वाघोली गावच्या वेबसाईटचे लोकार्पणही झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोमेश्वर शेळके तर आभार डॉ. गहिनीनाथ शेळके यांनी मानले.

# वैजापूरच्या उपनगराध्यक्षपदी रियाज अकिल शेख

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर** : वैजापूर नगर परिषदेच्या उपनगराध्यक्ष पदी राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक व भाजप राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वैजापूर शहर विकास आघाडीचे उमेदवार शेख रियाज अकिल गब्बू शेठ यांची शुक्रवारी निवड झाली. त्यांना राष्ट्रवादीच्या नगरसेविका सुवर्णा ठोंबरे यांनी सूचित केले तर नगरसेविका शेख सुमैय्या सोहेल यांनी अमुमोदन दिले. वैजापूर नगर परिषदेच्या निवडणुकीत आमदार सतीश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली व माजी उप नगराध्यक्ष हाजी अकिल शेख यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आठ जागा लढवून चार ठिकाणी विजय मिळवत भाजपला चांगली साथ दिली होती. त्यामुळे भाजपाचे डॉ दिनेश परदेशीं यांनी दिलेला शब्द पाळला आहे व आम्हाला न्याय दिला आहे अशी प्रतिक्रिया उपनगराध्यक्ष रियाज शेख यांचे वडील अकिल शेख यांनी माध्यमाना दिली.

सकाळी दहा ते बारा या वेळेत मुख्याधिकारी भागवत बिघोत यांच्या उपस्थितीत निवडणूक प्रक्रिया राबवण्यात आली. नगराध्यक्ष डॉ दिनेश परदेशीं यांच्यासह सर्व नगरसेवक हजर होते. यावेळी उपनगरध्यक्ष पदासाठी भाजपतर्फे विशाल जीवनलाल संचेती यांनी देखील अर्ज दाखल केला. त्यांना नगरसेविका मोनाली खैरे यांनी सूचित केले तर राजेश गायकवाड यांनी अनुमोदन दिले. तथापि विशाल संचेती यांना वैजापूर शहर विकास आघाडीची शिफारस नसल्याने त्यांचा अर्ज अवैध ठरवण्यात आला.

## स्वीकृत सदस्यांचीही निवड


उपनगराध्यक्ष रियाज अकिल शेख


प्रकाश चव्हाण


प्रशांत कंगले


संजय बोरनारे

### उपनगराध्यक्ष निवडणुकीत ट्विस्ट

उपनगराध्यक्ष पदाची निवडणूक बिनविरोध होईल अशी चर्चा मागील काही दिवसांपासून रंगत असताना निवडणूकीच्या दिवशी भाजप राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने वैजापूर शहर विकास आघाडी स्थापन करून आघाडीतर्फे रियाज शेख यांना उमेदवारी दिली. असे असतानाही भाजपतर्फे या पदासाठी विशाल संचेती यांनी स्वतंत्र अर्ज भरल्याने या निवडणुकीत नवीन ट्विस्ट निर्माण झाला होता.

नामनिर्देशित अर्थात स्वीकृत सदस्यांसाठी वैजापूर शहर विकास आघाडीतर्फे प्रकाश पंढरीनाथ चव्हाण व प्रशांत प्रभाकरराव कंगले यांचे तर शिवसेनेतर्फे संजय नानासाहेब बोरनारे यांचे अर्ज प्राप्त झाले. या अर्जाची छाननी होऊन तसेच अहर्ता तपासून त्यांना नगर परिषदेचे नामनिर्देशित अर्थात स्वीकृत सदस्य म्हणून घोषित करण्यात आले व त्यांची नावे वैजापूर शहर विकास आघाडीचे गट नेते डॉ दिनेश परदेशी व शिवसेनेचे गट नेते पारस घाटे यांना कळवण्यात आल्याचे प्रशासनाने म्हंटले आहे.

# सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांमुळे महिलांचा सन्मान वाढीस : डॉ. क्षितिज घुले

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**एरंडगाव / ढोरजळगाव** : शेवगाव तालुक्यातील दहिगाव-ने छत्रपती शिवाजी महाराज तरुण मित्र मंडळ व राजमाता जिजाऊ महिला मंडळ यांच्या वतीने मकरसंक्रांतीचे औचित्य साधून डॉ. क्षितिज नरेंद्र घुले यांच्या वाढदिवसानिमित्त हळदी कुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रम अत्यंत उत्कृष्ट नियोजन, शिस्तबद्ध व्यवस्था व सामाजिक जाणिवेतून यशस्वीरीत्या पार पडला.

या कार्यक्रमास राजश्रीताई चंद्रशेखर घुले व तेजस्विनीताई क्षितिज घुले व युगंधरा क्षितीज घुले यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमादरम्यान परिसरातील महिलांचा सन्मानपूर्वक सहभाग नोंदवण्यात आला. हळदी कुंकू, भेटवस्तू व स्नेहपूर्ण वातावरणात महिलांचा आदर व सन्मान करण्यात आला.

महिलांच्या सहभागातून सामाजिक ऐक्याचा संदेश देणारा हा कार्यक्रम मकर संक्रांतीची परंपरा जपत साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या उत्कृष्ट नियोजनामुळे उपस्थित महिलांमध्ये समाधान व उत्साहाचे वातावरण दिसून आले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल ग्रामस्थ व उपस्थित महिलांनी आयोजकांचे विशेष कौतुक केले. अशा सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांमुळे महिलांचा सन्मान वाढीस लागून समाजात सकारात्मक संदेश जात असल्याचे मत यावेळी डॉ क्षितीज घुले यांनी व्यक्त करण्यात आले.

डॉ क्षितीज घुले यांचा वाढदिवस आयोजकांकडून मोठ्या जल्लोषात व उत्साहात साजरा करण्यात आला.



यावेळी सरपंच राजूभाऊ पाऊलबुद्धे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे कार्याध्यक्ष राजेंद्र तांबे, रामकीसन जाधव, सुभाष पवार, बाळासाहेब मरकड, सुभाष पानसरे,अमोल गर्जे, कुमार मरकड, संदीप घुले, माऊली आहेर, प्रितम टाक, कृष्णा मोरे, गोरव काशीद, अक्षय ओहाळे, सतीश टाक, अक्षय काशीद,अरुण चव्हाण बंडु भुमकर,अण्णासाहेब गर्जे ,डॉ संदीप आहेर,भाऊसाहेब तांबे,बाळासाहेब टाक,भाऊसाहेब ठोकळ, आसाराम ओहळे, नारायण मरकड ,बाळासाहेब काशिद, बाळासाहेब गर्जे ,संतोष टाक, यांसह विविध संस्थेचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी,कार्यकर्ते तसेच महिलांचीही मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.

# उसतोडणी कामगारांसाठी आरोग्य शिबिरे गरजेची : विश्वास महाले



**कोपरगाव** : संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे, माजी आमदार स्नेहलता कोल्हे व कारखान्याचे युवा अध्यक्ष विवेकभैय्या कोल्हे यांनी सतत प्रत्येकाच्या आरोग्याची काळजी घेतली असुन उसतोडणी कामगारांसाठी आरोग्य शिबीरे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन संचालक विश्वासराव महाले यांनी केले.

सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखाना व संवत्सर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या संयुक्त विद्यमाने कार्यस्थळावरील उसतोडणीसाठी आलेल्या मजुर, मुकादम, कामगार, महिला भगिनी, लहान मुले-मुली यांची मोफत आरोग्य तपासणी शिबिर गुरूवारी आयोजित करण्यांत आले होते त्याचे उदघाटन करतांना ते बोलत होते.

प्रारंभी कारखान्याचे आरोग्य अधिकारी डॉ. मनोज बत्रा यांनी उपस्थितांचे स्वागत केले. उसविकास विभागाचे संदिप गवळी यांनी कारखान्याचे युवा अध्यक्ष विवेकभैय्या कोल्हे यांच्या संकल्पनेतुन उसतोडणी कामगारांचे आरोग्य सदृढ रहावे यासाठी हे शिबीर भरविल्याची माहिती दिली. डॉ. ओकांर दिघे यांनी प्रास्तविक केले. संवत्सर प्राथमिक आरोग्य केंद्राचे प्रमुख डॉ. राजेंद्र पारखे यांनी उसतोडणी मजुरांची कामानिमीत्त नेहमीच भटकंती सुरू असते त्यामुळे त्यांचे आरोग्याकडे दुर्लक्ष होते, गर्भवती महिलांना वेळेवर वैद्यकिय मदत व मार्गदर्शन मिळायला पाहिजे यासाठी शासनाचा आरोग्य विभाग सतत विविध उपक्रम राबवत असतो. स्त्री रोगतज्ञ डॉ. योगेश बनकर याप्रसंगी बोलतांना म्हणाले की, उसतोडणी कामगारांची आर्थीक परिस्थिती हलाखीची असल्यांने त्यांच्या आरोग्याची नेहमीच हेळसांड होते. गर्भवती महिलांना थळांत काम करतांना काय काळजी घ्यावी याचेही पुरेसे ज्ञान नसते, अशा महिलांनी वेळच्यावेळी रक्त , लघवी चाचण्याबरोबरच सोनोग्राफी, रक्तदाब तपासणी केली पाहिजे. गर्भवती महिलांचा पोषक आहार कसा असावा याचीही माहिती करून घेवुन त्यानुसार दररोजचे भोजन असावे म्हणजे येणा-या बाळाचे आरोग्य पोषक राहते. नियमीत लोहयुक्त गोळया घेतल्या पाहिजे असेही ते म्हणाले.

याप्रसंगी संचालक बापूसाहेब बारहाते, रमेश घोडेराव, डॉ. विनया ढाकणे, डॉ. अश्विनी जाई बहार, आदि खातेप्रमुख, उपखातेप्रमुख उपस्थित होते. शेवटी मुख्य शेतकी अधिकारी नारायण चौधरी यांनी आभार मानले.

# लाडकी बहीण योजनेतील केवायसीला मुदतवाढ द्या : आ.आशुतोष काळे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी** : कोपरगाव मतदारसंघातील मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचा लाभ मिळणाऱ्या अनेक महिलांचे ई-केवायसी करायचे राहिल्याने व अज्ञानापोटी किंवा नजरचुकीने चुकीची माहिती भरली गेल्याने असंख्य महिलांना लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळणे बंद झाले आहे. तरी मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेच्या ई केवायसी दुरुस्तीला मुदतवाढ द्यावी अशी मागणी आ.आशुतोष काळे यांनी महिला व बाल विकास विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांच्याकडे लेखी पत्राद्वारे केली आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा मूळ उद्देश महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे आहे व त्यासाठी ई केवायसी करणे अत्यंत गरजेचे आहे. मात्र ई केवायसी करताना येणाऱ्या तांत्रिक अडचणी व माहिती भरताना अज्ञानाअभावी चुकीची माहिती



भरली गेल्यामुळे अनेक महिलांची मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे दर महिन्याला मिळणारे दीड हजार रुपये बंद झाले आहेत.

राज्यातील महिलांना स्वावलंबी आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महायुती शासनाने मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना सुरु केली आहे. या योजनेचा अपात्र असणाऱ्या व्यक्तींकडून गैरफायदा घेतला जावू नये यासाठी राज्य शासनाकडून ई-केवायसीच्या माध्यमातून फेर तपासणी केली आहे. परंतु कोपरगाव मतदारसंघातील अनेक लाडक्या बहिणींची ई-केवायसी करायची राहिली. तर काहीची ई-केवायसी प्रक्रियेच्या दरम्यान नजरचुकीने चुकीची माहिती भरली गेली असल्याने अनेक लाडक्या बहिणींना अपात्र ठरविले असल्याने कोपरगांव मतदारसंघातील बहुसंख्य महिलांना लाडकी बहिण योजनेचे पैसे मिळणे बंद झाले आहे.

त्यामुळे ज्या महिला भगिनींची ई केवायसी अभावी किंवा ई केवायसी करतांना चुकीची माहिती भरली गेल्यामुळे लाडकी बहीण योजनेचे पैसे बंद झाले आहेत अशा महिलांसाठी ई केवायसी करण्यासाठी मुदतवाढ द्यावी. या महिलांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचे महिन्याला मिळणारे दीड हजार रुपये पूर्ववत सुरू करावे यासाठी आपण पाठपुरावा करावा असे आ. आशुतोष काळे यांनी अहिल्यानगर जिल्ह्याचे महिला व बाल विकास विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे.

# सकल मराठा समाजाच्यावतीने शंभू राज्यभिषेक सोहळा

**कर्जत** : सकल मराठा समाज कर्जत यांच्यावतीने शहरातील छत्रपत्री शिवाजी महाराज चौकात छत्रपती संभाजी महाराज यांचा राज्यभिषेक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्रमुख समन्वयक रावसाहेब धांडे यांच्यासह शिवप्रेमींनी संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन केले. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज यांच्या घोषणांनी परिसर दुमदुमला होता.



शुक्रवार, दि १६ जानेवारी सकाळी १० वाजता कर्जत शहरात सकल मराठा समाज कर्जत तालुक्याच्यावतीने छत्रपती संभाजी महाराज यांचा राज्यभिषेक दिन साजरा करण्यात आला. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सिंहासन रूढ छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन सकल मराठा समाज कर्जत तालुक्याचे प्रमुख समन्वयक रावसाहेब धांडे यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. यावेळी सर्वपक्षीय राजकीय पदाधिकारी आणि शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराज की जय, छत्रपती संभाजी महाराज की जय या घोषणांनी शिवप्रेमींनी परिसर दणाणून सोडला होता.

# अन्नसुरक्षा वाऱ्यावर

## प्रशासन बोलबच्चन भूमिकेत

दादा सोनवणे । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : आज मानवाचे अन्न हे जीवन आहे, आणि जीवनाशी खेळ झाला तर ते केवळ निष्काळजीपण नाही तो गंभीर गुन्हा असतो. मात्र श्रीगोंदा तालुक्यात आजची स्थिती अशी की अन्नसुरक्षा वाऱ्यावर, अन्न उघड्यावर, भेसळ भरपूर, आणि प्रशासनाची भूमिका मात्र फक्त बोलबच्चन.भूमिकेत असल्यामुळे नागरिकांच्या जीवनाशी खुलेआम खेळ सुरु आहे.




आज श्रीगोंदा तालुक्यातील शहरी भागासह ग्रामीण भागात रस्त्याच्या कडेला उघड्यावर मिळणारे अन्न म्हणजे बाजारात, रस्त्यावर किंवा बस स्तानक रेल्वे स्टेशन आशय अनेक ठिकाणी उघड्यावर विकले जाणारे पदार्थ, ज्यात वडापाव, पाणीपुरी,समोसा,चहा,फळे, फराळाचे पदार्थ इत्यादींचा समावेश होतो, जे आरोग्यासाठी हानिकारक असू शकतात कारण ते दूषित पाणी, धूळ आणि अस्वच्छतेमुळे रोग पसरवू शकतात; म्हणून ताजे, झाकलेले आणि स्वच्छ ठिकाणी तयार केलेले अन्न खाणे आरोग्यासाठी महत्त्वाचे आहे असे असताना श्रीगोंद्यात नागरिकांच्या जीवनाशी खुलेआम खेळ सुरूच आहे तसेच गोदामांच्या आवारात, पावसात धुळीत उघड्यावर ठेवलेले धान्य हा रोजचा देखावा झाला आहे. पोती फाटलेली, धान्य माती-किडीच्या संपर्कात, तरीही तेच धान्य उद्या लाभार्थ्यांच्या ताटात जाणार हा विचारच अंगावर काटा आणणारा असला तरीही हा प्रकार खुलेआम घडत आहे तालुक्यात अनेक ठिकाणी भेसळ, वजनकपात, दर्जाहीन माल याबाबत तक्रारींचा ढीग आहे; पण तपासण्या कागदावर आणि कारवाई घोषणांपुरतीच.अन्नपुरवठा, अन्न व औषध प्रशासन, स्थानिक यंत्रणा हे सगळेच जण जणू सगळं ठीक आहे या शब्दावर वर ठाम तर वास्तव मात्र वेगळं सांगतात. सर्वसामान्य गरीब, मजूर, ज्येष्ठ नागरिक, महिला यांच्यासाठी प्रशासन ही हक्काची ढाल असायला हवी; इथे ती धोक्याचं तिकीट बनते आहे.त्यास अधिकाऱ्यांच्या अर्थपूर्ण वागणे यामुळे तालुक्यातील नागरिकांच्या जीविताशी खेळ सुरु आहे याबबत जरी नागरिकांनी तक्रार दाखल करण्याचा प्रयत्न केला तरीही अधिकार्याकडून वेगवेगळी करणे देत बोलबच्चन भूमिका बजावत असल्यामुळे मोठ्या प्रमाणत नाराजी व्यक्त केली जात आहे त्यामुळे भेसळयुक्त अन्नापासून वाचविण्यासाठी जनतेचा वाली तरी कोण असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

### हे तयार होते तालुक्यात

श्रीगोंदा तालुक्यात बनावट दूध खवा,मावा,तूप,पनीर यासह विविध बेकरी उत्पादने यासह मिठाई यामध्ये मोठ्या प्रमाणात भेसळ असल्याची माहिती मिळत असून हे सर्व पदार्थ तयार करण्यासाठी मानवी जीवनास घातक पदार्थांचा वापर केला जात आहे मात्र हे सर्व तालुक्यातील अन्न सुरक्षा अधिकारी याना माहित असताना त्यावर कारवाई होत नसल्यामुळे यामध्ये नेमके काय गौडबंगाल आहे. याचा प्रशासनाने शोध घेण्याची गरज निर्माण झाली आहे.

### जनतेचा प्रश्न

उघड्यावर पडलेलं, भेसळयुक्त अन्न जर माणसाच्या पोटात जात असेल, तर जबाबदारी कोणाची? प्रशासनाने आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. तपासण्या, नमुना चाचण्या, दोषींवर तात्काळ कारवाई हे केवळ फाईलमध्ये नव्हे तर रस्त्यावर दिसायला हवं. अन्यथा श्रीगोंद्यात अन्नसुरक्षेचा हा तमाशा लवकरच लोकांच्या आरोग्यावरचा घातक प्रयोग ठरेल.

### आरोग्यासाठी धोके :

साथीचे रोग यामध्ये दूषित पाण्यामुळे आणि अस्वच्छतेमुळे डायरिया, टायफॉईडसारखे आजार होऊ शकतात. तसेच पोटाचे विकार होण्यासाठी शिळे, आंबवलेले किंवा उघड्यावर ठेवलेले अन्न खाल्लूयाने पोटदुखी आणि अपचन होऊ शकते.तसेच कीटक आणि उंदीर यांच्या संपर्कात आलेले उघड्यावर ठेवलेल्या अन्नावर माशा, कीटक बसतात, ज्यामुळे रोगजंतू पसरतात.हे अनेक आजारांना निमंत्रण आहे याकडे कोण लक्ष देणार असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

### हे मिळते उघड्यावर

उघड्यावर मिळणाऱ्या अन्ना मध्ये स्ट्रीट फुड: वडापाव, भजी, पाणीपुरी, भेळ, समोसा, मिसळ.पेये मध्ये अस्वच्छ ठिकाणी तयार केलेला चहा, कॉफी, लिंबू सरबत.फळे आणि भाज्या मध्ये धूळ आणि माश्यांनी दूषित झालेली फळे.बेकरी उत्पादनात अस्वच्छतेत बनवलेले बिस्किटे, केक.आदी पदार्थ उघड्यावर मिळतात.

### अन्न परवाना नसल्यास !

सरकारी नियमानुसार अन्न परवाना नसेल तर कायद्यानुसार दंड भरावा लागू शकतो, जो छ५ लाखांपर्यंत असू शकतो, आणि काही प्रकरणांमध्ये व्यवसाय बंद होऊन तुरुंगवासही होऊ शकतो. मात्र श्रीगोंद्यात परवाना काय असतो हे लोकांना माहीतच नसल्यामुळे सगळ एकाही आलबेल असल्याचे बोलले जात आहे.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
शनिवार, दि.१७ जानेवारी २०२६ । अहिल्यानगर । पान नं. ८

## मंदिर परिसरातील तळ्यात पडून वृद्धाचा मृत्यू

**राहुरी :** तालुक्यातील कनगर येथे एका ७४ वर्षीय वृद्ध व्यक्तीचा तळ्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना काल समोर आली आहे. कनगर येथील रहिवासी नारायण आनंदा लाहुंडे या वयोवृद्ध इसमाचा कणकावती देवी मंदिरासमोरील तळ्यातील पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी समोर आली आहे. ही घटना लक्षात येताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. तातडीने मृतदेह तळ्याच्या बाहेर काढून रवी देवगिरे यांच्या रुग्णवाहिकेतून राहुरी येथील ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आला तेथील वैद्यकीय अधिकारी यांनी त्यांना तपासुन मयत घोषित केले त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला.नारायण लाहुंडे हे रोज सकाळी देवींदर्शनासाठी जात असायचे रोजच्या प्रमाणे ते आज देखील मंदिराकडे जात असताना त्यांचा पाय घसरून ते तळ्यात पडल्याने त्यांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला असे समजते. काही नागरिकांच्या तळ्यातील पाण्यात बुडाल्याचे लक्षात आले व लगेच स्थानिक नागरिकांच्या मदतीने मृतदेह बाहेर काढण्यात आला.आणि पोलीस पाटील यांनी राहुरी पोलीस स्टेशन ला खबर देऊन पुढील कार्यवाही केली.मयत नारायण लाहुंडे यांच्या मागे दोन मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. या घटनेने कनगर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# आशा स्वयंसेविकांचे सेवानिवृत्ती वय ६५ करा

## दरमहा ५ हजार पेन्शन द्या; सरकारला इशारा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री




**अहिल्यानगर :** आरोग्य विभागात काम करणाऱ्या आशा स्वंयसेविकांच्या सेवानिवृत्तीचे वय ६५ करा किंवा दरमहा ५ हजार रुपये पेन्शन द्यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य आशा गटप्रवर्तक व आरोग्य कर्मचारी संघटनेने राज्य सरकारकडे केली आहे.यावर सरकारने निर्णय न घेतल्यास उच्च न्यायालयात याचिका दाखल करु, असा इशाराही संघटनेचे अध्यक्ष शंकर पुजारी यांनी दिला आहे. शंकर पुजारी म्हणाले, राष्ट्रीय आरोग्य अभियान (एनएचएम) अंतर्गत २००५ पासून कार्यरत आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक कार्यरत आहेत. आशा व गटप्रवर्तकांचे सेवानिवृत्ती वय ६५ वर्षे करा, अशा मागणीचे पत्र सरकार व सार्वजनिक आरोग्य विभागाला दिले आहे. हा निर्णय त्वरित न घेतल्यास दरमहा ५ हजार रुपये पेन्शन व ग्रॅच्युइटी देणे शासनावर बंधनकारक ठरेल. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश ६५ वर्षांपर्यंत सेवा देतात. मग आरोग्य क्षेत्रात प्रत्यक्ष जनतेच्या जीवाशी निगडित काम करणाऱ्या आशा स्वंयसेविकांना ६० वर्षांनंतर कामापासून वंचित ठेवणे हा दुहेरी निकष व सामाजिक अन्याय असल्याचे पुजारी यांनी सांगितले. आशा स्वंयसेविकांना वर्षानुवर्षे वेतन चिठ्ठ्या न देणे, शहरी भागात अत्यल्प

> अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये आशा स्वयंसेविकांकडून मोबदल्याशिवाय कामाची सक्ती केली जात आहे, ऑनलाईन सर्वेक्षण, डेटा एन्ट्री, प आधारित कामे बळजबरीने करून घेतली जातात. काम न केल्यास सेवेतून काढून टाकण्याच्या धमक्या, मानसिक छळ व अपमानास्पद वागणूक मिळते. तरीही शासनाने आजपर्यंत दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई केलेली नाही.
>
> **– शंकर पुजारी,**
> अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य आशा गटप्रवर्तक व आरोग्य कर्मचारी संघटना

आशा व गटप्रवर्तक नेमणुका करून हजारो लोकसंख्येचा भार टाकणे, ऑनलाईन कामासाठी आवश्यक अँड्रॉइड मोबाईल व डेटा पॅक न देणे, प्रसूती रजा, किमान वेतन, जननी सुरक्षा योजनेचा मोबदला रोखून धरणे हे सर्व प्रकार कामगार कायदे,महिलांच्या हक्कांचे कायदे व मानवी हक्कांचे उल्लंघन आहे. जर शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन आशा व गट प्रवर्तकाच्या मागण्या मान्य केल्या न केल्यास उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करु, असा इशाराही पुजारी यांनी दिला.




# अवैध मुरूम-खडी वाहतूक नागरिकांच्या जीवावर बेतू लागली

## प्रशासनाची बघ्याची भूमिका..!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** राहुरी तालुक्यात अवैध मुरूम व खडी वाहतूक मोठ्या प्रमाणावर सुरू असून ही वाहतूक आता थेट नागरिकांच्या जीवावर बेतू लागली आहे. यापूर्वी या बेकायदेशीर वाहतुकीमुळे अनेकांना आपला जीव गमवावा लागला असून काही नागरिक कायमचे अपंग झाले आहेत. मात्र, वारंवार घडणाऱ्या गंभीर अपघातांनंतरही प्रशासन व संबंधित यंत्रणा याकडे सातत्याने दुर्लक्ष करत असल्याचे चित्र आहे. राहुरी तालुक्यातील कनगर,ताहराबाद परिसरातून मोठ्या प्रमाणावर अवैध मुरूम-खडी उत्खनन व वाहतूक केली जात आहे.येथून भरधाव वेगाने धावणारी मुरूम-खडीने भरलेली अवजड वाहने दिवसरात्र रस्त्यांवरून धाव घेत आहेत. ही वाहने राहुरी फॅक्टरी, प्रसादनगर, चिंचविहिरे यांसारख्या दाट लोकवस्तीच्या भागातून जात असल्याने नागरिकांमध्ये तीव्र भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

अनेक वेळा ही वाहने क्षमतेपेक्षा अधिक मुरूम-खडी भरून, वाहतूक नियम धाब्यावर बसवून चालवली जात आहे. परिणामी रस्त्यांची अवस्था दयनीय झाली असून अपघातांची शक्यता दिवसेंदिवस वाढत आहे. शालेय विद्यार्थी, महिला व ज्येष्ठ नागरिकांना या वाहतुकीचा सर्वाधिक त्रास सहन करावा लागत आहे.विशेष म्हणजे, यापूर्वी घडलेल्या गंभीर अपघातांनंतरही अवैध वाहतुकीवर कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. प्रशासनाने तात्काळ अवैध मुरूम-खडी वाहतुकीवर कठोर कारवाई करावी, नियमभंग करणाऱ्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करत ही वाहतूक पूर्णतः बंद करावी, अशी जोरदार मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

# शिर्डीकरांनो सावधान, शिस्तीत राहाल तर फायद्यात रहाल

## उपनगराध्यक्ष शेळके ॲक्शन मोडवर

अशोक दुशिंग । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** शहरात यापुढे कोणत्याही अनाधिकृत व्यवसाय करणारांची गय केली जाणार नसून साईच्या नगरीत व्यवसाय करणाऱ्याला अडथळा नाही मात्र वेगळया मार्गाने पैसा कमावल्यास चुकीला माफी नाही. शिस्तीत रहाल तर फायद्यात रहाल असा सज्जड इशारा नवनिर्वाचित उपनगराध्यक्ष अभय शेळके यांनी दिला आहे. काल त्यांनी पदभार स्वीकारताच धडाकेबाज कामास सुरवात केली आहे. शेळके यांनी सर्व नगरसेवकांना बरोबर घेत थेट बाजार पेठ गाठली ते बाजार पेठेत धडकताच सर्व व्यापारी शिस्तीचे पालन करताना दिसले तसेच फेरीवाल्याची अचानक पळापळ सुरू झाली.

यावेळी उपनगराध्यक्ष अभय शेळके म्हणाले की महिनाभराच्या आत शिर्डी स्वच्छ करणार आहे ज्यांचे तोंडात गुटखा त्याला दोनशे रुपये दंड व जो गुटखा खाऊन थुकेल त्याला पाचशे रुपये दंड पान टपरीवर गुटखा विक्रेते यांच्यावर सुद्धा गुन्हे दाखल करणार तसेच होलसेल गुटखा विकणाऱ्यांच्या घरात घुसून त्यांना ठोकून काढल्याशिवाय राहणार नाही. हातात साईबाबांचे साहित्य विकणारे मुले यांना सुधार गृहात पाठवून त्यांच्या आई-वडिलावर गुन्हे दाखल करण्यात येतील .वेश्याव्यवसाय चे गैरकृत्य करणाऱ्यांची हयगय केली जाणार नसून ज्यांच्या हॉटेल समोर अशा प्रकारच्या महिला दिसतील त्यांच्यावर कारवाई करून शिर्डीतून वेश्या व्यवसाय हद्दपार केल्याशिवाय आम्ही स्वस्त बसणार नाही. त्यासाठी एम एस एफ चा पूर्ण वापर करणार असून व्यवसायिकांची अतिक्रमण सीमा आखून देणार आहे . तसेच व्यवसायिकांचे व्यवसाय वाढवण्यासाठी प्रयत्न होणार आहेत.

त्यांचे व्यवसाय वाढवण्यासाठी आम्ही प्रयत्नशील असून रोडवर व्यवसाय करणाऱ्या स्थानिकांनी या कामी सहकार्य करणे गरजेचे आहे .फुलहार प्रत्येक दुकानात रेट बोर्ड असली पाहिजे बेशिस्त दिसल्यास हॉटेल व दुकानावर कारवाई करण्यात येईल साईच्या नगरीत व्यवसाय करणारे अडथळा नाही. परंतु वेगळ्या मार्गाने पैसे कमावण्याचा धंदा केल्यास चुकीला माफी होणार नसल्याचे शेळके यांनी सांगितले. या कामी आमचे सर्व नगरसेवक प्रत्यक्ष शिर्डीत फिरून हे सर्व काम हाती घेणार आहे डॉ. सुजय विखे व ना. राधाकृष्ण विखे यांचे बरोबर लवकरच याविषयी बैठक घेऊन अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे. साधारण एक महिन्यात शिर्डीत स्वच्छ तर दिसेलच परंतु या ठिकाणी शिर्डीस बदनाम ठरणाऱ्या सर्व व्यवसायावर निर्बंध घातले जाणार असल्याचे शेळके म्हणाले. नगरसेवक रवींद्र गोंदकर म्हणाले की जे लोक शिर्डीला स्वच्छ करतील त्यांना शिस्त लावण्याचे काम आम्ही करणार आहोत पंचवीस वर्षे सभागृहाचे सभासद असलेले अभय शेळके हे आता आमच्याबरोबर आहेत त्यामुळे आम्ही सभागृहात नवीन आहे असे समजत नाही. गावच्या बदनामीला ज्या ज्या गोष्टी कारणीभूत असतील त्या त्या गोष्टी आम्ही कमी करण्याचा प्रयत्न करणार आहोत. स्वच्छ सुंदर हरित अशी शिर्डी आम्ही निर्माण करू यापूर्वी शिर्डीत काय चालत होतं काय चालत नव्हतं यात आम्ही पडणार नाही. मात्र यापुढे असे कोणते प्रकार खपवून घेतले जाणार नाही व अनधिकृत कामे होणार नाही याची आम्ही काळजी घेणार आहे. दरम्यान नगरपालिकेच्या या पहिल्याच दिवसाच्या डॅशिंगबाज कामाने शिर्डी पुन्हा चर्चेत आली असून गेल्या नऊ वर्षानंतर नगरपालिकेचा खरा कारभार सुरू झाल्याचे दिसत होते. अभय शेळके यांची शिस्त संपूर्ण गावाला माहीत असून ते जे डोक्यात घेतात ते करतातच अशी त्यांची ख्याती आहे .त्यामुळे आजच्या पहिल्या दिवशी सर्व नगरपालीका कर्मचारी अर्लट मोडवर दिसत होते.

# पत्रकार हत्या प्रकरणातील आरोपी पांगारकर विजयी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**जालना :** पत्रकार गौरी लंकेश हत्या प्रकरणातील आरोपी श्रीकांत पांगारकर जालना महानगरपालिका निवडणुकीत विजयी झाले आहेत. श्रीकांत पांगारकर हे प्रभाग क्रमांक १३ मधून अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवली.

या प्रभागात त्यांच्या विरोधात भाजपसह इतर राजकीय पक्षांचे उमेदवार रिंगणात होते. मात्र एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून या प्रभागात कोणताही उमेदवार देण्यात आलेला नव्हता. या महानगरपालिका निवडणुकीत श्रीकांत पांगारकर यांनी २ हजार ६२१ मते मिळवत विजय संपादन केला आहे.

श्रीकांत पांगारकर यांनी नोव्हेंबर २०२४ मध्ये विधानसभा निवडणुकीपूर्वी शिंदे गटाच्या शिवसेनेत प्रवेश केला होता. मात्र त्यांच्या पक्षप्रवेशावर जनतेतून तीव्र प्रतिक्रिया उमटल्याने अवघ्या एका दिवसात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या पक्षप्रवेशास स्थगिती दिली होती. श्रीकांत पांगारकर हे २००१ ते २००६ या काळात शिवसेनेचे जालना नगरपरिषदेचे नगरसेवक होते. २०११ मध्ये पक्षाकडून तिकीट न मिळाल्याने त्यांनी उजव्या विचारसरणीच्या हिंदू जनजागृती समितीत प्रवेश केला होता. ऑगस्ट २०१८ मध्ये महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने (TS) राज्यातील विविध ठिकाणांहून स्फोटके आणि शस्त्रसाठा जप्त केल्याप्रकरणी श्रीकांत पांगारकर यांना अटक केली होती. या प्रकरणात त्यांच्यावर स्फोटक कायदा, स्फोटक पदार्थ कायदा तसेच बेकायदेशीर क्रियाकलाप प्रतिबंधक कायदा (UP) अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले होते.

दरम्यान, पत्रकार गौरी लंकेश हत्या प्रकरणात कर्नाटक उच्च न्यायालयाने सप्टेंबर २०२४ मध्ये श्रीकांत पांगारकर यांना जामीन मंजूर केला आहे. ५ सप्टेंबर २०१७ रोजी बंगळुरूमधील त्यांच्या निवासस्थानाबाहेर पत्रकार गौरी लंकेश यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. या घटनेने देशभरात खळबळ उडाली होती आणि या प्रकरणाची मोठी चर्चा रंगली होती. या हत्या प्रकरणात कर्नाटक पोलिसांनी आतापर्यंत १८ संशयितांची ओळख पटवली असून १७ जणांना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणाचा खटला जुलै २०२२ पासून सुरू आहे. दरम्यान, गौरी लंकेश हत्या प्रकरणातील आरोपी असलेल्या श्रीकांत पांगारकर यांनी जालना महानगरपालिका निवडणुकीच्या रिंगणात अपक्ष उमेदवार म्हणून उमेदवारी अर्ज दाखल करत निवडणूक लढवली. या निवडणुकीत त्यांनी २ हजार ६२१ मते मिळवत विजय संपादन केला आहे. विजयानंतर प्रतिक्रिया देताना पांगारकर म्हणाले की, मला जनतेच्या न्यायालयात न्याय मिळाला आहे. गौरी लंकेश हत्या प्रकरण न्यायप्रविष्ट असून मी निर्दोष आहे. माझ्यावरील आरोप अद्याप सिद्ध झालेले नाहीत.

## शेतात पाणीवाटपाच्या वादातून ९ वर्षांच्या भावाची हत्या; मुख्य आरोपीला जन्मठेप

**बीड :** शेतातील पाणी पुरवठ्याच्या वादातून ९ वर्षाच्या चुलत भावाचा गळा आवळून हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात मुख्य आरोपीला जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे. तर पुरावा नष्ट करण्यास मदत केल्याबद्दल अन्य तिघांना तीन वर्षांची सक्तमजुरी आणि दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. ही सुनावणी अंबाजोगाई येथील जिल्हा व सत्र न्यायालयात गुरुवारी सायंकाळी पार पडली.

बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील चांदापूर गावात अनिकेत गित्ते आणि अतुल गित्ते यांची शेती शेजारी असून पाणी देण्यासाठी वापरली जाणारी पाइपलाईन सामायिक होती. याच कारणावरून दोन्ही कुटुंबामध्ये वारंवार वाद होत होते. १५ डिसेंबर २०१८ रोजी हा वाद टोकाला गेला. अतुल गित्ते याने कट रचला आणि आपल्या चुलत भावाचा सुती दोरीने गळा आवळून निर्घृण हत्या केली. हत्या केल्यानंतर पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह घरातील पाण्याच्या हौदात उभा करून ठेवण्यात आला होता. या घटनेची माहिती मिळताच परळी ग्रामीण पोलीस घट्नातशाली दाखल झाले. त्यांनी पंचनामा केला आणि गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी सखोल तपास करून दोषारोपपत्र अंबाजोगाई येथील सत्र न्यायालयात सादर केले. या प्रकरणात एकूण १२ साक्षीदार तपासण्यात आले असून फिर्यादी, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तसेच वैद्यकीय तज्ज्ञांची साक्ष अत्यंत निर्णायक ठरली. अखेर जिल्हा व सत्र न्यायाधीशांनी सरकारी पक्षाचा युक्तिवाद मान्य करत आरोपी अतुल गित्ते याला दोषी ठरवले.

# ४०० कोटींची लूट !

## प्रकरणाचा छडा लावण्यासाठी 'SIT' मैदानात

**नाशिक :** घोटी वाडीवऱ्हे शिवारात ऑक्टोबर २०२५ मध्ये अपहरण, ठार मारण्याची धमकी, खंडणी आणि तब्बल ४०० कोटी रुपयांच्या नोटांचे कंटेनर लुटल्याचा कथित प्रकार उघडकीस आला आहे. या गंभीर स्वरूपाच्या प्रकरणात दाखल झालेल्या गुन्ह्यांचा सखोल व निष्पक्ष तपास करण्यासाठी जिल्हा पोलीस प्रशासनाने विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन केले आहे.

ही घटना नाशिक जिल्ह्यातील घोटी वाडीवऱ्हे परिसरात घडल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या परिसरातून मोठ्या प्रमाणावर रोख रकमेची वाहतूक होत असल्याचा दावा केल्याने प्रकरणाला अधिक गंभीर वळण मिळाले आहे.

या प्रकरणी नाशिक रोड येथील रहिवासी संदीप दत्ता पाटील यांनी फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीत जयेश कदम, विशाल नायडू, सुनील धुमाळ, विराट गांधी आणि जनार्दन धायगुडे (सर्व रा. मुंबई) अशी संशयित आरोपींची नावे नमूद आहेत. आरोपींनी पिस्तूलचा धाक दाखवत अपहरण केले, तसेच फिर्यादी व त्यांच्या कुटुंबीयांना ठार मारण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे. याच आरोपींपैकी चौघांनी ४०० कोटी रुपयांच्या नोटांचे कंटेनर लुटल्याचा दावा फिर्यादीत करण्यात आला आहे.

हा कथित प्रकार ऑक्टोबर २०२५ मध्ये घडला असून, अलीकडेच या संदर्भात सविस्तर वृत्त प्रकाशित झाल्यानंतर पोलिस व प्रशासन स्तरावर हालचालींना वेग आला. त्यानंतरच एसआयटी स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. फिर्यादीत उल्लेख करण्यात आलेली ४०० कोटी रुपयांची रक्कम ही चलनातून बाद झालेल्या नोटांची असल्याचे सांगितले जात आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात जुन्या नोटांचा साठा कुठून आला, तो कोणाच्या मालकीचा होता आणि नेमका कुठे नेला जात होता, हे प्रश्न तपासाच्या केंद्रस्थानी आहेत. प्रकरणाचे आर्थिक मूल्य प्रचंड असल्याने तसेच यात प्रभावशाली व्यक्तींचा सहभाग असण्याची शक्यता लक्षात घेता, हा तपास अत्यंत संवेदनशील मानला जात आहे. जिल्हा पोलिस अधीक्षकांच्या नेतृत्वाखाली स्थापन करण्यात आलेल्या एसआयटीचे मार्गदर्शन पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील करणार आहेत. अपर पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर आणि उपविभागीय पोलिस अधिकारी हरीश खेडकर यांच्या देखरेखीखाली तपास चालणार आहे. या पथकात अनुभवी व वरिष्ठ अधिकाऱ्यांसह आर्थिक गुन्हे शाखा, सायबर तज्ज्ञ आणि तांत्रिक विश्लेषकांचा समावेश करण्यात आला आहे. मोबाईल डेटा, आर्थिक व्यवहारांचे डिजिटल पुरावे, सीसीटीव्ही फुटेज आणि इतर तांत्रिक साधनांच्या आधारे तपास अधिक खोलात नेला जाणार असल्याचे पोलिस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

या प्रकरणातील सत्य बाहेर आणण्यासाठी एसआयटीकडून सर्व बाजूंनी तपास केला जाईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

# बिबट्या जेरबंद ; मात्र भीती कायमच!



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी :** तालुक्यातील पाडळी परिसरात बिबट्यांचा वाढता वावर नागरिकांसाठी चिंतेचा विषय ठरत असताना, अवघ्या आठवडाभरात वनविभागाने दुसऱ्या बिबट्याला जेरबंद केले आहे. असे असले तरी गावकऱ्यांमधील भीती अजूनही कमी झालेली नसून, प्रशासनाविरोधात संताप व्यक्त केला जात आहे.

बिबट्यांच्या धोक्याची गंभीर पार्श्वभूमी असताना देखील महावितरणकडून दिवसा वीजपुरवठा न देता मुद्दाम रात्रीच वीज दिली जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. याबाबत वारंवार निवेदन देऊनही कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे.

हे प्रशासनाचे दुर्लक्ष आहे की निष्काळजीपणा? की मग जनतेच्या जीवाशी चाललेला खेळ? असा सवाल संतप्त ग्रामस्थ करत आहेत. पाडळी गावात सध्या कांदा, गहू, हरभरा यासह ऊसाची मोठ्या प्रमाणावर लागवड आहे. पिकांना पाणी देण्याचा हा अत्यंत महत्त्वाचा कालावधी असताना, रात्री वीज मिळत असल्याने शेतकऱ्यांना जीव धोक्यात घालून शेतात जावे लागत आहे. बिबट्यांचा मुक्त संचार असताना रात्री शेतात जाणे म्हणजे मृत्यूला आमंत्रण देण्यासारखे असल्याची भावना गावात सर्वत्र व्यक्त होत आहे.

यावेळी ग्रामस्थ गणेश गर्जे, वसंत कचरे, संतोष गर्जे, किशोर भोर्डे, नवनाथ कचरे, राहुल कचरे, धर्मनाथ गर्जे, विष्णू कराळे, पप्पूशेठ गर्जे, युवानेते हरिभाऊ गर्जे, विश्वास कांबळे यांच्यासह अनेकांनी प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली.

दरम्यान, प्रशासन व महावितरणने तातडीने परिस्थितीची गंभीर दखल घेऊन दिवसा वीजपुरवठा सुरू करावा, अन्यथा पाडळी ग्रामस्थ रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडतील, असा इशारा देण्यात आला आहे. भविष्यात कोणतीही अनुचित घटना घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाचीच असेल, असे स्पष्टपणे ग्रामस्थांनी सांगितले आहे.

### पाडळी गावचे उपसरपंच गणेश कचरे यांनी ठाम भूमिका

दिवसा वीजपुरवठा देणे ही फक्त शेतकऱ्यांची मागणी नसून नागरिकांच्या सुरक्षिततेशी संबंधित बाब आहे. एखादी दुर्दैवी घटना घडल्यावरच प्रशासन जागे होणार का? असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला.